CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

लातूर | बुधवार, ६ मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ५८ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



नियोजनेद्वारे चालवले जाणारे किंवा स्वीकारलेला प्रत्येक कार्यक्रम दूरगामी परिणाम करणारा आहे. जी योजना हाती घेतली आहे ती संपूर्ण शक्तिनिशी पूर्ण करा. योजना पूर्ण करण्यात अपयश आले तर आपल्या प्रयत्नांतील त्रुटींचा विचार करा. त्या सुधारण्यासाठी परिश्रमपूर्वक काम करा आणि पुन्हा प्रयत्न करून योजना पूर्ण करा. सतत प्रयत्न करणे हाच यशाचा एकमेव मार्ग आहे.

**- स्व. दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# नराधमांना पॅरोल नकोच

## कायद्यात बदल करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश



**◆ मुंबई, ५ मे**

**पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या पाशवी अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र संतापाने धुमसत आहे. या क्रूर घटनेची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नराधमांविरुद्ध निर्णायक पाऊल उचलले आहे. लैंगिक शोषणातील गुन्हेगारांना भविष्यात कधीही मोकळा श्वास घेता येऊ नये, यासाठी राज्य सरकार चक्क कायद्यातच बदल करणार असून, तसा स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिला आहे.**

**काय आहे नेमकं प्रकरण?**

**नसरापूरमध्ये शुक्रवारी (१ मे) एका साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून दगड मारून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. नराधमाने तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून क्रूरतेची परिसीमा ओलांडली होती. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी पुणे-बंगळुरू महामार्ग रोखून धरला होता. सोलापूरपासून पुण्यापर्यंत या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत.**

मंगळवारी झालेल्या कॅबिनेट बैठकीत या संतापजनक घटनेवर सविस्तर चर्चा झाली. वारंवार गुन्हे करूनही पॅरोलवर (पेरॉल) सुटणाऱ्या गुन्हेगारांमुळे समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. नसरापूर प्रकरणातील मुख्य आरोपी भीमराव कांबळे याच्यावर यापूर्वीही विनयभंग आणि पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल होते, तरीही तो समाजात उजळ माथ्याने वावरत होता. कायद्यातील याच त्रुटीवर बोट ठेवत, आता लैंगिक शोषणातील गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत पॅरोल मिळू नये, यासाठी विधी व न्याय विभागाने तात्काळ कायद्यात दुरुस्ती करावी, असा निर्देश आदेश मुख्यमंत्र्यांनी दिला आहेत.

तपासासाठी एसआयटी सज्ज

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी आता विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली असून, आरोपी भीमराव कांबळे सध्या पोलीस कोठडीत आहे. समाजात वावरणाऱ्या अशा लांडग्यांना कायद्याचा कायमचा धाक बसावा आणि त्यांना कारागृहाबाहेर येण्याची कोणतीही संधी मिळू नये, यासाठी सरकारने घेतलेला हा कायदेशीर बदलाचा निर्णय अत्यंत ऐतिहासिक मानला जात आहे. सरकारच्या या आक्रमक पवित्र्यामुळे नराधमांना आता जेलमध्येच सडावे लागणार, हे स्पष्ट झाले आहे. ◂(वृत्तसंस्था)

## तरुणीला ब्लॅकमेल करणाऱ्याला अटक

**◆ जळगाव, ५ मे**

नाशिक, परतवाडा येथील घटना ताज्या असतानाच जळगावातही युवतीला ब्लॅकमेल करून पैसे उकळणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. प्रथम प्रेमाच्या जाळ्यात ओढून नंतर आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पैसे उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. यश जैन असे आरोपीचे नाव आहे.

यशने एका युवतीला आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली होती. तसेच युवतीकडून सात लाख रूपये उकळले होते. युवतीच्या तक्रारीनंतर यशला अटक केली. त्याच्या मोबाईलची तपासणी केली असता त्याच्या मोबाईलमध्ये अनेक युवतींचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि छायाचित्रे आढळल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# उत्पादन वाढविण्यासाठी 'कापूस क्रांती मिशन'

## केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

**◆ नवी दिल्ली, ५ मे**



कापसाची उत्पादकता वाढवण्यासाठी ५,६५९.२२ कोटी रुपयांच्या खर्चाची 'कापूस क्रांती मिशन' या पाच वर्षांच्या मोहिमेची घोषणा केंद्र सरकारने मंगळवारी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने भारताच्या कापूस क्षेत्रातील अडथळे, घटती वाढ आणि गुणवत्तेशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी, कापूस उत्पादकता अभियानासाठी (२०२६-२७ ते २०३०-३१) ५,६५९.२२ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे.

२०२५-२६ या पीक वर्षात (जुलै-जून) भारताचे कापूस उत्पादन प्रत्येकी १७० किलोच्या २९१ लाख गाठी इतके राहिले. हे अभियान 'फाईव्ह एफ' व्हिजनशी (फार्म टू फायबर टू फॅक्टरी टू फॅशन टू फॉरेन) सुसंगत असून कापसाची उत्पादकता वाढविण्यावर लक्ष केंद्रित करेल, असे त्यात म्हटले आहे.

रोग आणि कीड प्रतिकारक्षम असलेल्या, अधिक उत्पादन देणाऱ्या बियाण्यांचा विकास करून तसेच राज्य सरकारे, कृषी विज्ञान केंद्रे आणि राज्य कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून पीक उत्पादनाच्या विद्यमान व अद्ययावत तंत्रज्ञानाचा विस्तार करून कापसाच्या उत्पादनात सुधारणा केली जाईल.

पिकांच्या उत्पादनाशी संबंधित अद्ययावत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि अवलंब केला जाईल. उद्योगाला किमान अशुद्धता असलेला कापूस पुरवठा सुनिश्चित करणे आणि उच्च दर्जाच्या कापसाच्या निर्यातीला चालना देणे, हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

२०३१ पर्यंत कापसाची 'लिंट' उत्पादकता ४४० किलोग्रॅम प्रति हेक्टरवरून ७५४५ किलोग्रॅम प्रति हेक्टरपर्यंत वाढवून ४१८ लाख गाठींचे कापूस उत्पादन साध्य करण्याचे उद्दिष्ट या अभियानाद्वारे ठेवण्यात आले आहे. याचा लाभ जवळपास ३२ लाख शेतकऱ्यांना होईल. यामुळे आत्मनिर्भरता साधली जाईल.

सुरुवातीला तंत्रज्ञानाचा विस्तार करण्यासाठी आणि दोन हजार जिनिंग/प्रक्रिया कारखान्यांसाठी राज्य कृषी विभाग आणि आयसीएआरच्या माध्यमातून १४ राज्यांमधील १४० जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. ◂(वृत्तसंस्था)

### कृषी-वस्त्रोद्योग मंत्रालयाद्वारे अंमलबजावणी

**» या अभियानाची अंमलबजावणी कृषी मंत्रालय आणि वस्त्रोद्योग मंत्रालयाद्वारे केली जाईल. यामध्ये भारतीय कृषी संशोधन परिषदेची (आयसीएआर) १० संस्थाने, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) एक संस्था तसेच प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमधील विविध राज्य कृषी विद्यापीठांमध्ये कार्यरत असलेल्या कापसावरील अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पांची (एआयसीआरपी) १० केंद्र सहभागी असतील.**

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात घसरण; निफ्टी २४ हजारांच्या वर

**मुंबई** : भारतीय शेअर बाजाराने सोमवारी मिळवलेली सर्व वाढ मंगळवारी गमावली आणि बाजार घसरणीसह बंद झाला. विविध क्षेत्रांमधील संमिश्र कल पाहायला मिळाला, मात्र अशा परिस्थितीतही निफ्टीने २४,००० चा महत्त्वपूर्ण स्तर राखण्यात यश मिळवले. मंगळवारी बाजाराची सुरुवात काहीशी संथ झाली. दुपारच्या सत्रात विक्रीचा दबाव वाढल्याने निफ्टी २३,८८२.०५ या नीचांकी स्तरापर्यंत खाली आला होता. परंतु, अखेरच्या सत्रात खालच्या स्तरावर खरेदी झाल्याने बाजाराने आपली काही तूट भरून काढली. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स २५१.६१ अंकांनी म्हणजेच ०.३३ टक्क्यांनी घसरून ७७,०१७.७९ वर बंद झाला. तसेच निफ्टी ८६.५० अंकांनी म्हणजेच ०.३६ टक्क्यांनी घसरून २४,०३२.८० वर स्थिरावला. मुख्य निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांनी चांगली कामगिरी केली आणि ते किरकोळ वाढीसह बंद झाले. दुसरीकडे, रुपयाचे मूल्य सलग पाचव्या सत्रात घसरले. डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया ९५.४३ या आतापर्यंतच्या ऐतिहासिक नीचांकी स्तरावर पोहोचला होता.

### भारत टी-२० मानांकनात अव्वल स्थानी कायम

**दुबई** : तीन वेळा विश्वचषक जिंकणारा भारतीय क्रिकेट संघ आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय मानांकनात अव्वल स्थानी कायम आहे. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघ अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत. भारताने मार्च महिन्यात ऐतिहासिक कामगिरी बजावत टी-२० चा विश्वचषक स्वत:कडे कायम राखण्यात यश मिळविले होते. सोबतच तिसऱ्यांदा विश्वचषक प्राप्त करण्याची नोंदही केली होती. भारताने श्रीलंकेसोबत यंदा संयुक्तपणे टी-२० विश्वचषकाचे यजमानपद भूषविले होते. हे मानांकन निश्चित करताना मे २०२५ नंतर खेळल्या गेलेल्या सर्व सामन्यांची शंभर टक्के आणि त्याआधीच्या दोन वर्षांच्या कामगिरीची ५० टक्के दखल घेण्यात आली होती, असे आयसीसीतर्फे जाहीर करण्यात आले आहे. २७५ गुणांसह अव्वल स्थानी असलेल्या भारताचा इंग्लंडच्या तुलनेत (२६२ गुण) एक गुण कमी झाला आहे, तर ऑस्ट्रेलिया २५८ गुणांसह तिसऱ्या स्थानी आहे. या आयसीसी रँकिंगमधील अव्वल सात संघांनी आपापले स्थान कायम राखले आहे. यात न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान आणि वेस्ट इंडीज या संघांचा समावेश आहे.

# राजीनामा देणार नाही

## ममता बॅनर्जी यांची पत्रपरिषदेत आडमुठी भूमिका

**◆ कोलकाता, ५ मे**



विधानसभा निवडणुकांमध्ये पराभव झाल्यानंतर, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी आडमुठी भूमिका घेत राजीनामा देण्यास नकार दिला. आम्ही निवडणूक हरलो नाही, असा ठाम पवित्रा घेत त्यांनी निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर फेरफार, हिंसाचार आणि संस्थात्मक पक्षपाताचा आरोप केला. माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मी राजीनामा देणार नाही. आम्ही निवडणूक हरलो नाही, असे बॅनर्जी म्हणाल्या.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर, ममता बॅनर्जी यांनी भाजपावर जोरदार हल्ला चढवला आहे. त्या म्हणाल्या, विद्यार्थी राजकारणाच्या दिवसांपासून ते अगदी आजच्या काळापर्यंत, आपण अशी इतकी गलिच्छ आणि किळसवाणी निवडणूक कधीच पाहिली नव्हती. ही निवडणूक भाजपाविरुद्धची लढत नव्हती, तर ती संपूर्ण सरकारी यंत्रणेविरुद्धची लढाई होती. विशेषतः पंतप्रधान आणि गृहमंत्री यांच्या थेट हस्तक्षेपाविरुद्धची निवडणूक होती.

ममता बॅनर्जी यांनी दावा केला की, एका कटकारस्थानाचा भाग म्हणून मतदार यादीतून ९० लाख नावे वगळण्यात आली होती. तृणमूल काँग्रेसने न्यायालयाचा दरवाजा ठोठावल्यानंतरच ३२ लाख नावे पुन्हा समाविष्ट करण्यात आली. मात्र, हा फेरफार तिथेच थांबला नाही. त्यानंतर पुन्हा ७ लाख नावे गुपचूपपणे यादीत जोडण्यात आली. ही कृती सर्वांना अंधारात ठेवून पार पडली. २००४ मध्ये जेव्हा त्या पूर्णपणे एकाकी पडल्या होत्या, तेव्हाही त्यांनी अशा प्रकारची निवडणूक लुटमार आणि अत्याचार कधीच पाहिले नव्हते. ◂(वृत्तसंस्था)

### भाजपाने मतांची लुटमार केली

**भाजपाने आयोगावर दबाव टाकून जनतेचा कौल पळवून नेला आहे. मतदार यादीतील सुधारणांच्या नावाखाली समर्थकांची लाखो मते वगळण्यात आली आणि मतमोजणीच्या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या प्रतिनिधींना धमक्या देऊन दहशत निर्माण करण्यात आली, असा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला.**



बारामती पोटनिवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजय मिळविल्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### अमित शाह ठरविणार बंगालचा मुख्यमंत्री

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

आसाम आणि पश्चिम बंगालचा मुख्यमंत्री निवडण्यासाठी भाजपाने केंद्रीय निरीक्षकांच्या नावांची घोषणा केली आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजपा विधिमंडळ पक्षाचा नेता निवडीच्या बैठकीसाठी भाजपाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना केंद्रीय निरीक्षक बनवले आहे. ओडिशाचे मुख्यमंत्री मोहनचरण मांझी सहकेंद्रीय निरीक्षक राहतील.

आसाममध्ये नेता निवडीसाठी केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा केंद्रीय निरीक्षक राहणार असून हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी सहकेंद्रीय निरीक्षक आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

# कर्जमाफीची घोषणा महिनाभरात : कृषिमंत्री भरणे

**◆ पुणे, ५ मे**

कर्जमाफीच्या सर्व माहितीचे संकलन झाले आहे. त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एक महिन्याच्या आत निर्णय घेतील, अशी स्पष्टोक्ती कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी सोमवारी दिली. तसेच अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना यामधून आधार देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कृषी आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीप्रसंगी भरणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, पावसाने नुकसान झालेल्या पिकांची भरपाई शेतकऱ्यांना मिळेल. पंचनामे झाले आहेत.

अल निनोच्या संदर्भात अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शेतकऱ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणींवर विचारमंथन केले जाणार आहे. तसेच शेतकरी उपयोगी योजना आणल्या जातील, असेही भरणे यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

# पतसंस्थांच्या ई-ऑडिटमध्ये महाराष्ट्र अव्वल

## कृषी पतसंस्थांचा कारभार होणार पारदर्शक

**विनय पुराणिक**

**◆ पुणे, ५ मे**

केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या निर्देशानुसार प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या (पॅक्स) कामकाजात पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी त्यांचे संगणकीकरण आणि ऑनलाईन लेखापरीक्षण करण्याचा निर्णय केंद्रीय सहकार मंत्रालयाने घेतला आहे. त्यानुसार देशात महाराष्ट्रातील सहकार विभागाने या निर्णयाची अंमलबजावणी करत इतर राज्यांना मागे टाकले असून तब्बल १२ हजार पॅक्सचे ई-ऑडिट यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे.

या प्रकल्पांतर्गत सर्व संस्थांना एन्टरप्राइज रिसोर्स प्लॅनिंग



(ईआरपी) आधारित एका सामायिक संगणक प्रणालीवर आणणे आणि राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्या माध्यमातून त्यांना 'नाबार्ड'शी जोडण्यात येणार आहे. त्यानुसार राज्याच्या सहकार विभागाने १२ हजार पॅक्सची ई-ऑडिटसाठी निवड केली. संबंधित संस्थांना हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर पुरविले आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी या संस्था ई-ऑडिटसाठी पात्र होत्या. आतापर्यंत ११ हजार ९८१ पॅक्सचे ई-ऑडिट पूर्ण झाले आहे.

**प्रकल्पाचा उद्देश काय?**

'पॅक्स'च्या कामकाजाची कार्यक्षमता वाढविणे, कर्जांचे जलद वितरण करणे, व्यवहारांचा खर्च कमी करणे आणि देण्या-घेण्यांमधील तफावत दूर करणे, राज्य सहकारी बँका आणि जिल्हा बँकांशी सुलभ व अखंडित लेखाजोखा राखणे आणि 'नाबार्ड'कडून त्यांच्या विविध उपक्रमांसाठी पुनर्वित्त/कर्जे मिळविणे सुलभ व्हावे, कामकाजात पारदर्शकता आणणे, सामायिक लेखा प्रणाली (सीएएस) आणि व्यवस्थापन माहिती प्रणाली (एमआयएस) यांची अंमलबजावणी करणे ; ज्यामुळे 'पॅक्स'ना त्यांचे दैनंदिन कामकाज ऑनलाईन पद्धतीने पार पाडणे शक्य होईल.

**ई-ऑडिटचा आढावा विभागनिहाय**

| विभाग | संगणकीकरणासाठी निवडलेल्या संस्था | ई-ऑडिट झालेल्या संस्था |
|---|---|---|
| कोकण | ८६० | ८५७ |
| नाशिक | २१९८ | २१९५ |
| पुणे | १७३७ | १७३७ |
| कोल्हापूर | ३३३४ | ३३२३ |
| छ. संभाजीनगर | ८१० | ८०९ |
| लातूर | ९०२ | ९०२ |
| अमरावती | १४६१ | १४६० |
| नागपूर | ६९८ | ६९८ |

**देशातील गुजरात, कर्नाटक, केरळम अशा सहकार क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या राज्यांसह इतर सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राच्या सहकार विभागाने सुमारे १२ हजार 'पॅक्स'चे ई-ऑडिट यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. यापुढे या सर्व 'पॅक्स'चे केंद्राच्या धोरणानुसार ई-ऑडिट होईल, तर राज्याच्या धोरणानुसार प्रचलित लेखापरीक्षण देखील होईल. त्यामुळे 'पॅक्स'च्या कारभारात पारदर्शकता येईल.**

**- रावसाहेब जंगले,** सहनिबंधक (लेखापरीक्षण), सहकार आयुक्तालय

# पोलिस उपायुक्ताविरुद्ध लूकआऊट नोटीस

**◆ कोलकाता, ५ मे**

एका मनी लॉण्ड्रिंग प्रकरणाच्या संदर्भात अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने कोलकाताचे पोलिस उपायुक्त शांतनू सिन्हा बिस्वास यांच्या विरोधात 'लूकआऊट नोटीस' जारी केली, असे एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले.

ईडीने कित्येक वेळा समन्स बजावूनही बिस्वास यांनी चौकशीस हजर होणे टाळले होते. त्यानंतर ही लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली. भारत सोडून जाण्याचा बिस्वासचा कोणताही संभाव्य प्रयत्न हाणून पाडण्यासाठी ही नोटीस विमानतळे, रेल्वे स्थानके आणि इतर वाहतूक केंद्रांवर वितरित करण्यात आली आहे.

चौकशीसाठी हजर राहण्याबाबत त्यांना पाच वेळा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, ते एकदाही आले नाहीत. सहकार्य करण्यास तयार नसल्याने चौकशी टाळण्यासाठी ते विदेशात जाऊ शकतात, असा संशय आम्हाला असल्याचे ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान केंद्रीय तपास यंत्रणेने बिस्वास यांच्या घरावर छापेमारी केली. 'सोना पप्पू' नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका व्यक्तीचा समावेश असलेल्या, कथित जमीन बळकावणे आणि खंडणी वसुलीशी संबंधित एका प्रकरणी ईडीच्या अधिकाऱ्यांनी कोलकाता येथील त्यांच्या 'फर्न रोड'वरील निवासस्थानी छापे टाकले होते. ◂(वृत्तसंस्था)


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### नशामुक्त अभियानाचा प्रसार करा : मनोज सिन्हा



**काश्मीर** : खेळाडूंनी नशा मुक्त अभियानाचे दूत म्हणून काम करावे व तरुणांना अंमली पदार्थांपासून दूर राहून खेळांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन जम्मू आणि काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी सोमवारी केले. येथील काश्मीर विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ वुशू अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला ते संबोधित करीत ह ोते. यावेळी त्यांनी खेळाडूंना एक छोटा व्हिडीओ तयार करून तो समाज माध्यमावर सामायिक करण्यास सांगितले. या माध्यमातून अंमली पदार्थांच्या सेवनाविरुद्ध जनजागृती करणे आणि इतरांना सकारात्मक जीवनशैलीसाठी खेळ व सर्जनशील उपक्रमांचा स्वीकार करण्यास प्रेरित करणे हा त्यांचा उद्देश होता. तुम्ही भारताच्या नव्या पिढीसाठी आदर्श आहात. तुमचे आवाहन तरुणांना योग्य मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करेल, असे सिन्हा म्हणाले. उच्च शिक्षण संस्थांमध्ये एक सशक्त क्रीडा संस्कृती निर्माण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे; तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला सक्रिय आणि निरोगी जीवनशैली जगण्यासाठी समान संधी मिळतील याची खात्री करण्यासही प्रशासन वचनबद्ध आहे, असे त्यांनी पुन्हा अधोरेखित केले.

### लुंगी 'फिट'

**नवी दिल्ली** : दिल्ली कॅपिटल्सचे गोलंदाजी प्रशिक्षक मुनाफ पटेल यांनी पुष्टी केली आहे की, वेगवान गोलंदाज लुंगी नगिदीने अनिवार्य कन्कशन स्टॅण्ड-डाऊन कालावधी यशस्वीपणे पूर्ण केला असून, तो मंगळवारी सायंकाळी अरुण जेटली स्टेडियमवर



पाच वेळच्या विजेत्या चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या महत्त्वपूर्ण सामन्यापूर्वी मैदानात परतण्यासाठी १०० टक्के तंदुरुस्त आहे. गत २५ एप्रिल रोजी पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात तिसऱ्या षटकात क्षेत्ररक्षण करताना लुंगी नगिदीला डोक्याला दुर्दैवी दुखापत झाली आणि त्याला रुग्णवाहिकेतून पुसा रोड येथील बीएलके-मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये तातडीने दाखल करण्यात आले. आयसीसीच्या नियमांनुसार, ज्या खेळाडूंना डोक्याला दुखापत (कन्कशन) झाल्याचे निदान होते, त्यांना सात दिवसांची अनिवार्य विश्रांती लागू होते. स्कॅनमध्ये कोणतीही मोठी चिंताजनक बाब न आढळल्याने त्याच सायंकाळी रुग्णालयातून सुटी मिळाल्यानंतर लुंगीला ती विश्रांती घ्यावी लागली.

### नरसिंह यात्रेतील क्रिकेट स्पर्धेत हिंगणगाव संघास विजेतपद

**बार्शी, दि. ५ मे-**

कांदलगाव येथे नरसिंह यात्रेनिमित्त एनसीसी क्रिकेट क्लबने आयोजित केलेल्या स्पर्धेतील क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात हिंगणगाव संघाने दमदार खेळ करत प्रतिस्पर्धी डोमगाव संघावर सुपर ओव्हरमध्ये मात करीत विजेतेपद पटकावले. विजेत्या हिंगणगाव व उपविजेत्या डोमगाव संघाला तसेच सर्वोत्कृष्ठ खेळाडूंना आकर्षक चषक व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले, या स्पर्धेत विविध गावांतील १६ संघांनी सहभाग नोंदवला होता.

### पिकलबॉल ओपनमध्ये अर्जुन-आदित्यला सुवर्ण

**मुंबई** : येथे आयोजित महाराष्ट्र पिकलबॉल ओपन स्पर्धेत अर्जुन सिंग आणि आदित्य सिंग या जोडीने प्रो-पुरुष दुहेरी गटाचे विजेतेपद पटकावले. त्यांनी अंतिम फेरीत, तीन अत्यंत चुरशीच्या सेटमध्ये च भासिन आणि अमोल या जोडीचा पराभव केला. दुसरीकडे, प्रो-महिला दुहेरी गटात मिहिका यादव आणि स्नेहल पाटील या जोडीने आपले वर्चस्व सिद्ध करत, एकतर्फी झालेल्या अंतिम सामन्यात दणदणीत विजय मिळवला. भारतीय पिकलबॉल संघटनेच्या अधिपत्याखाली आणि महाराष्ट्र पिकलबॉल संघटनेद्वारे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अथर्व खिस्ती याने पुरुष एकेरी गटाचे विजेतेपद पटकावले, तर आहाना पंजाबी हिने महिला एकेरी गटाचा किताब आपल्या नावी केला. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत, देशभरातून १,००० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्राला देशातील पिकलबॉलचे एक निर्विवाद आणि बलाढ्य केंद्र बनवणे, हे आमचे ध्येय आहे, असे महाराष्ट्र पिकलबॉल संघटनेचे अध्यक्ष राहुल एन. कनाल म्हणाले.

# 'करिअर क्रिकेट अकादमी'चा रोमहर्षक विजय

## 'विजय चषक' क्रिकेट स्पर्धेत शाहिद शेखचा अष्टपैलू धमाका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन आणि ग्रीन फिंगर स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विजय चषक' एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचे थाटात उद्घाटन करण्यात आले. स्पर्धेच्या सुरुवातीलाच झालेल्या अटीतटीच्या लढतीत 'करियर क्रिकेट अकादमी' संघाने 'युनायटेड क्रिकेट अकादमी'वर १२ धावांनी मात करत विजयी सलामी दिली.

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियवर झालेल्या या स्पर्धेतील सलमीच्या सामन्यातील या विजयाचा खरा नायक सामनावीर शाहिद शेख ठरला. त्याने प्रथम फलंदाजी करताना अवघ्या १३ चेंडूत ३ चौकार आणि १ गगनभेदी षटकारासह १९ धावा कुटल्या. त्यानंतर गोलंदाजीमध्ये आपली चमक दाखवत त्याने ४८ धावांत ४ बळी टिपले आणि युनायटेडच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याच्या या अष्टपैलू कामगिरीबद्दल त्याला 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरवण्यात आले.करियर क्रिकेट अकादमीने १७३ धावा (३४.३ षटके) केल्या होत्या. प्रत्युत्तरात युनायटेड क्रिकेट अकादमीचा डाव ३३.४ षटकांत १६१ धावांवर



आटोपला. विजयासाठी १७४ धावांचा पाठलाग करताना युनायटेडच्या फलंदाजांनी कडवी झुंज दिली, मात्र अचूक टप्प्यावर मारा करणाऱ्या करियर अकादमीच्या गोलंदाजांनी त्यांना ३४ व्या षटकातच रोखण्यात यश मिळवले.

या स्पर्धेचे उद्घाटन महानगरपालिका सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, खेळाडूंच्या प्रगतीसाठी महानगरपालिकेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल. महापौर चषकासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली असून, क्रीडा विकासाच्या नवीन योजनांसाठी महापालिका सकारात्मक आहे.

कार्यक्रमाची प्रस्तावना सचिव चंद्रकांत रेंबुर्स यांनी केली, तर सूत्रसंचालन उपाध्यक्ष प्रकाश भुतडा यांनी केले. संतोष बडवे यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी टूर्नामेंट कमिटी चेअरमन संजय वडजे, सुनील मालप, राजेंद्र गोटे, रोहित जाधव, सत्यजीत जाधव, संजय मोरे, योगेश कोंपल, नीलेश गायकवाड, राजू रंगम, सुनील चव्हाण आणि चिराग शहा यांच्यासह अनेक क्रीडाप्रेमी उपस्थित होते.



# डॉ. नितीन तोष्णीवाल व डॉ. नीलकंठ पोतदार यांची रौप्य पदकावर मोहोर

## राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

पुण्यातील बालेवाडी येथे झालेल्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत येथील डॉ. नितीन तोष्णीवाल यांनी ५५+ वयोगटात एकेरी आणि दुहेरी अशा दोन्ही प्रकारांत रौप्य पदक पटकावून सोलापूरच्या क्रीडा वैभवात भर घातली आहे.

एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात डॉ. तोष्णीवाल यांचा सामना दिल्लीच्या हर्ष चोप्राशी झाला. या चुरशीच्या लढतीत हर्ष चोप्राने डॉ. तोष्णीवाल यांचा ३-१ असा पराभव केला. परिणामी, डॉ. तोष्णीवाल यांना राष्ट्रीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर आणि रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

दुहेरी गटात डॉ. तोष्णीवाल आणि डॉ. नीलकंठ पोतदार या जोडीने उत्कृष्ट समन्वय राखत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. अंतिम सामन्यात या जोडीचा सामना मध्य प्रदेशच्या संघाशी झाला. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात मध्य प्रदेशच्या संघाने ३-१ अशा फरकाने विजय मिळवला. त्यामुळे डॉ. तोष्णीवाल आणि डॉ. पोतदार या जोडीला उपविजेतेपदासह रौप्य पदकावर नाव कोरावे लागले. त्यांचे सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान आणि सचिव झेड. एम. पुणेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# सोलापूरचा नंदुरबारवर १५५ धावांनी धुव्वा

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन वरिष्ठ गट महिला क्रिकेट : साक्षी वाघमाडे व आर्या उमाप यांची शानदार खेळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वरिष्ठ गट महिला क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या संघाने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर चमकदार कामगिरी करत सोलापूरने नंदुरबारवर १५५ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

पुणे येथे झालेल्या या स्पर्धेतील सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना सोलापूरच्या संघाने निर्धारित २० षटकांत ४ बाद १८३ धावांचा डोंगर उभा केला. सलामीवीर साक्षी वाघमोडे हिने मैदानावर चौफेर फटकेबाजी करत ५४ चेंडूत ११ चौकारांसह ६८ धावा कुटल्या. तिला आर्या उमाप हिने खंबीर साथ दिली. आर्याने ४६ चेंडूत ८ चौकारांच्या मदतीने ६१ धावांची वेगवान खेळी केली. या दोघींच्या शतकी भागीदारीमुळे सोलापूरला मोठी धावसंख्या गाठता आली.

१८४ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना नंदुरबारचा संघ सोलापूरच्या भेदक



साक्षी वाघमाडे



आर्या उमाप

गोलंदाजीसमोर पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळला. सोलापूरच्या गोलंदाजांनी प्रतिस्पर्धी संघाला सावरण्याची संधीच दिली नाही आणि अवघ्या २८ धावांत त्यांचा संपूर्ण डाव गुंडाळला. सोलापूरच्या अमृता गव्हाणे हिने २ षटकांत १ निर्धाव षटक फेकत केवळ २ धावा देऊन २ बळी घेतले, तर स्नेहा शिंदे हिने २ षटकांत ३ धावांच्या मोबदल्यात २ गडी बाद करत विजयात मोलाचा वाटा उचलला. या विजयाची शिल्पकार ठरलेल्या साक्षी वाघमोडे हिला तिच्या अष्टपैलू खेळीसाठी 'सामनावीर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# राज्य स्केटिंग स्पर्धेत विनर्स फाउंडेशनची ४3 पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

रोलर ॲथलेटिक्स मिनी स्टेट चॅम्पियनशिप स्पर्धेत येथील विनर्स फाउंडेशन स्केटिंग क्लबच्या २३ खेळाडूंनी लॉन्ग रेस व शॉर्ट रेस मध्ये उत्तम कामगिरी करत १५ सुवर्ण, १४ रौप्य आणि १४ कांस्य पदके पटकावून एकूण ४३ पदकांची कमाई केली आहे.

पब्लिक स्कूल खोपोली (जि. रायगड) येथे रोलर अथलेटिक्स असोसिएशन (महाराष्ट्र) आणि स्कूल गेम फेडरेशन ऑफइंडिया यांच्या वतीने झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. विश्वा बीटला या खेळाडूंने उत्तम कामगिरी करत सर्वांची मने जिंकली. या सर्व स्केटिंग खेळाडूंना त्यांचे प्रशिक्षक सम्यक मोहोळकर, सागर राठोड, सिद्धू सुतार, वासुदेव कॅमकोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

**यश मिळवलेले स्केटर्स** : ऋषिता मळवदकर, सक्षम हुच्चे, असित कांबळे, शर्विल माळवतकर, संयुक्ता पोतदार, विनायक हुच्चे, याह्या शेख (सर्व २ सुवर्ण), मोहम्मद साद शेख, विराज अरकाल, उत्तरा पोतदार, स्वराली काळे, सोहम गाडे, सारंग मठपती, निशा सरवदे




(सर्व २ रौप्य), स्वानंदी काळे, शशांक कटारे, असद शेख, आरोही गाडे, शौर्य कदम, आराध्या बडवणे (२ कांस्य), लास्या शेरला (१ कांस्य), देवांश सरवदे (१ सुवर्ण, १ कांस्य).

# उन्हाळी लष्करी प्रशिक्षण शिबिरात मयुरेश गुंटुक प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

ओकिनावा ट्रॅडिशनल कराटे अकॅडमी इंडियातर्फे कर्णिक नगर व पद्मा नगर सोलापूर येथे पार पडलेल्या २६ व्या ज्युनियर कमांडो ट्रेनिंग कॅम्पमध्ये मयुरेश नरसय्या गुंटूक याने उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून प्रथम क्रमांकांची ट्रॉफी पटकाविली. ओंकार शाम साखरे याने द्वितीय तर सुनाक्षी राजशेखर माळी हिने तृतीय क्रमांकांची ट्रॉफी संपादिली.

याचा समारोप क्रीडा अधिकारी क्रांती बनकर तसेच माजी सैनिक ईरन्ना धनशेट्टी यांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी ओंकार साखरे, शिवप्रिया येलदी यांनी शिबिरातील प्रशिक्षणाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. दररोज सलग ८ तास चालणाऱ्या या शिबिरात कराटे,ज्यूदो, सेल्फ डिफेन्स, जिम्नॅस्टिक, योगासने, ध्यान-प्राणायाम, हॉर्सरायडिंग, लाठीकाठी, नानचाकू,विविध अडथळा पार करणे, परेड,नेमबाजी, रोप व रॉक क्लायम्बिंग, रिव्हर क्रॉसिंग, बौद्धिके आदी प्रकारचे शोर्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरात सर्वांना मुख्य प्रशिक्षिका व आंतरराष्ट्रीय पंच शिहान अनुराधा महादेव थोरात (ब्लॅक बेल्ट फिफ्थ डिग्री), सोनिया सतीशकुमार थोरात, समर्थ जाधव, विराज बोकडे,सुजीत बिराजदार, वीर सुरा यांचे मार्गदर्शन लाभले.ष्करी-५

# अंबर बाबा इलेव्हन संघास विजेतपद

## अप्पा चषक क्रिकेट : विनायक बेऊर सामनावीर, महेंद्र ढवाण मालिकावीर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

अंबर बाबा इलेव्हन संघाने अप्पा चषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

अंबर क्रिकेट क्लबतर्फे ही स्पर्धा आयोजित केली होती. आप्पा सुर्यवंशी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. अंतिम सामन्यात अंबर बाबा इलेव्हन संघाने अंबर नागदेव संघाचा ११ धावांनी पराभव केला.

**संक्षिप्त धावफलक : अंबर बाबा इलेव्हन** : १० षटकांत १२१ (महेंद्र ढवाण ५०, विनायक बेउर ३४, मनोज पवार १बळी) **विजयी विरुध्द अंबर नागदेव इलेव्हन** : १० षटकांत ९४ ( सुरेश नागदेव २१, सचिन वांगीकर २०, प्रतापक नाईकनवरे ३ बळी, विनाय बेऊर, सुधांशु भालेराव व दिपक जयकारा प्रत्येकी २ बळी).

**वैयक्तिक पारितोषिके विजेते** : विनायक बेऊर (सामनावीर), बबलू वळसंगे (फलंदाज), प्रताप नाईकनवरे (गोलंदाज), महेंद्र ढवाण (मालिकावीर).

# रुद्रशक्ती गुरुकुलची राज्य स्पर्धेत २८ पदकांची कमाई




## कराटे, ज्युडो, तायक्वांदो स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

स्टुडंट्स ऑलिंपिक असोसिएशनच्या १३व्या राज्यस्तरीय कराटे, ज्युडो, तायक्वांदो स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलच्या २८ खेळाडूंनी २६ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्य अशी २८ पदकांची कमाई केली. या कामगिरीवर यशस्वी विद्यार्थ्यांची जुलैमध्ये उत्तराखंड (हरिद्वार) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धासाठी झाली. त्यांचे मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन, स्टुडंट्स ऑलिंपिक सोलापूरचे सचिव नागेश शेट्टीकर महाराष्ट्राचे सचिव सुनील शिंदे, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी अभिनंदन केले.

**पदकप्राप्त खेळाडू : कराटे** : सुवर्ण- प्रवलीका कामूर्ती, पल्लवी बिनगुडी, श्रद्धा इपनल्ली, भाग्यश्री मनीकोंडा, सई गोरे, वेदांत सोमा, श्रीयोग मोगे.

**तायक्वांदो** : सुवर्ण- अंजनी राऊत, बिंदूप्रिया कुन, भावेश कुने, कार्तिक महांकाळ. कांस्य- अजिंक्य गायकवाड. रौप्य- श्रवणी गवळी

**ज्युडो**: सुवर्ण- दुर्वा रोहिटे, जानवी म्हेत्रे, कोमल मनीकोंडा, मान्यता रोहिटे, सोनाक्षी माडे, श्रद्धा सरवदे, दर्शनी सोमा, गौरी माळी, अदिती नल्ला, ममता मंडल, भावना गड्डम, योगिता सरवदे, वैभव माडे, श्रेयस जाधव, कैवल्य जगताप.



# सेवासदन प्रशालेची विविध वयोगटांमध्ये सुवर्ण कामगिरी

## राज्य शालेय गतका स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. ५ मे-**

कल्याण, मुंबई येथे झालेल्या राज्य शालेय गतका क्रीडा स्पर्धेत सु. रा. मुलींची सेवासदन प्रशालेच्या विद्यार्थिनींनी विविध वयोगटांमध्ये सुवर्ण कामगिरी केली.

१७ वर्षांखालील मुलींच्या फरीसोटी वैयक्तिक प्रकारात गिरीजा भोसले हिने आणि फरीसोटी सांघिक प्रकारात गिरीजा भोसले, श्रेया पाटील, तृप्ती अलदर व वैष्णवी डोळे यांनी सुवर्ण पदक पटकाविले.

सिंगल सोटी वैयक्तिक प्रकारात अक्षरा जाधव हिने आणि सिंगल सोटी संगीत प्रकारात कीर्ती शिंदे, ज्ञानेश्वरी मोरे, आर्या कोळसे व वैष्णवी स्वामी यांनीही सुवर्णपदकांची कमाई केली. या खेळाडूंना क्रीडा प्रमुख ज्ञानेश्वर काळे तसेच स्वाती मॅगेरी व शिल्पा चन्ना यांचे मार्गदर्शन लाभले.



प्रत्येक वेळी घटना घडल्यावरच प्रशासन जागं होतं, ही बाब चिंताजनक आहे. राज्यात महिलांवरील अत्याचार, अपहरण आणि शोषणाच्या घटना सातत्याने वाढत आहेत, हे वास्तव गंभीर असून कायद्याचा धाक उरलेला नाही.
**- राज ठाकरे**, मनसे प्रमुख

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
बुधवार, ६ मे २०२६ ३



गेल्या वर्षी त्यांनी द बंगाल फाइल्सलाही पश्चिम बंगालमध्ये पूर्णपणे बंदी घातली. आमच्यावर हल्ले झाले. एफआयआर दाखल केले. मला बंगालमध्ये प्रतिबंधित केले. मी माझा पुरस्कार घेण्यासाठी राज्यपालांकडेही जाऊ शकलो नाही.
**- विवेक अग्निहोत्री**, चित्रपट निर्माते

| पश्चिम बंगाल | |
|---|---|
| (एकूण जागा २९३/२९४) | |
| भाजपा | २०७ |
| तृणमूल काँग्रेस | ८० |
| काँग्रेस | २ |
| एजेयूपी | २ |
| सीपीआय (एम) | १ |

| आसाम | |
|---|---|
| (एकूण जागा १२६) | |
| भाजपा | ८२ |
| काँग्रेस | १९ |
| बीओपीएफ | १० |
| एजीपी | १० |
| एआययूडीएफ | २ |

| तामिळनाडू | |
|---|---|
| (एकूण जागा २३४) | |
| टीव्हीके | १०८ |
| द्रमुक | ५९ |
| अण्णाद्रमुक | ४७ |
| काँग्रेस | ५ |
| अन्य | ८ |

| पुडुचेरी | |
|---|---|
| (एकूण जागा ३०) | |
| एआयएनआरसी | १२ |
| द्रमुक | ५ |
| भाजपा | ४ |
| टीव्हीके | २ |
| इतर | ७ |

| केरळ | |
|---|---|
| (एकूण जागा १४०) | |
| काँग्रेस | ६३ |
| सीपीआय-एम | २६ |
| इंडियन मुस्लिम लीग | २२ |
| सीपीआय | ८ |
| भाजपा | ३ |
| अन्य | २१ |

# तृणमूलला नऊ जिल्ह्यांत भोपळा

## पंतप्रधान मोदींचा प्रचारसभेत वर्तविलेला अंदाज खरा ठरला



तृणमूल काँग्रेसचा प्रभाव असलेल्या भागांमध्ये निकालानंतर असा शुकशुकाट होता

**◆ कोलकाता, ५ मे**

पश्चिम बंगालच्या २३ पैकी नऊ जिल्ह्यांमध्ये भाजपाने तृणमूल काँग्रेसचा पूर्णपणे धुव्वा उडवला. या जिल्ह्यांमध्ये सर्वच्या सर्व ६८ जागा जिंकून या अत्यंत निर्णायक ठरलेल्या निवडणुकीत संपूर्ण राज्य भगवेमय करण्याच्या दिशेने भाजपाने जोरदार वाटचाल केली.

राज्यात प्रथमच सत्तेवर आरूढ होत असताना या नऊ जिल्ह्यांमध्ये उत्तर बंगालच्या पर्वतीय भागापासून ते राज्याच्या दक्षिणेकडील मध्यवर्ती भागापर्यंतच्या जनादेशाने हे सिद्ध केले आहे की, तृणमूल काँग्रेसला अनेक जिल्ह्यांमध्ये खातेही उघडता येणार नाही, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचार दौऱ्यादरम्यान वर्तवलेला अंदाज खरा ठरला आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने २०६ जागा जिंकून दोन-तृतीयांशपेक्षा जास्त बहुमत मिळवले. यामुळे तृणमूलची १५ वर्षांची सत्ता संपुष्टात आली. २९४ सदस्यांच्या विधानसभेत तृणमूलची ताकद अवघ्या ८० जागांपर्यंत खाली येऊन तिचे पूर्णपणे पानिपत झाले.

भाजपाने आपल्या पूर्वेकडील शेवटच्या बालेकिल्ल्यातही निर्णायक मुसंडी मारल्याचे या निकालावरून अधोरेखित झाले आहे. यासह अंग, बंग आणि कलिंग (बिहार, बंगाल आणि ओडिशा) या प्रदेशांत भाजपाची भगवी कमान पूर्ण झाली आहे. भाजपाच्या कामगिरीच्या आलेखात सर्वात अव्वल स्थानी पूर्व मेदिनीपूर जिल्हा आहे. येथे पक्षाचे निवडणुकीतील सर्वात प्रमुख चेहरा असलेल्या शुभेंदू अधिकारी यांनी पक्षाचे वर्चस्व पूर्णपणे प्रस्थापित केल्याची खात्री केली.

भाजपाने जिल्ह्यातील सर्वच्या सर्व १६ जागांवर विजय मिळवला आणि १५ विरुद्ध एक अशा आपल्या मागील निवडणुकीतील कामगिरीत सुधारणा केली. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल असे दर्शवतात की, पटाशपूर विधानसभा मतदारसंघात तृणमूलने आपली आघाडी कायम राखली होती. मात्र, बांगलादेशला लागून असलेल्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये जेथे बांगलादेशी नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत त्या भागात तृणमूल काँग्रेसला चांगले यश मिळाले आहे.

विशेषतः सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाच्या आणि संवेदनशील असलेल्या 'चिकन नेक' या भागात तीन-ते चार जागा तृणमूलने जिंकल्या आणि त्यातील बहुतांश आमदार मुस्लिम आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### डोंगराळ भागात तृणमूलचा प्रभाव नाही

**दार्जिलिंग, कालोम्पोंग, जलपाईगुडी आणि अलीपूरद्वार या १८ जागा असलेल्या डोंगराळ भागातील चार जिल्ह्यांत तृणमूल काँग्रेसला आणि तिच्या स्थानिक मित्रपक्षांनाही आपला प्रभाव पाडण्यात अपयश आले. संपूर्ण उत्तर बंगालमधील ५४ विधानसभा जागांपैकी भाजपाने ४० जागांवर विजय मिळवला. यामुळे पूर्वी २३ असलेली तृणमूलची जागांची संख्या घटून केवळ १४ वर आली.**



आसाममधील विजयाचे शिल्पकार मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा

# भाजपाने आसाममध्ये कशी साधली हॅट्ट्रिक?

## खेडा-हिमंता वादाचा फायदा उचलण्यात काँग्रेस ठरली अपयशी

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

२०२६ च्या आसाम विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आणि तिसऱ्यांदा भारतीय जनता पार्टी सत्तेवर आला आहे. १२६ सदस्यीय विधानसभेच्या मतमोजणीत, एनडीएने बहुमताचा आकडा पार केला असून हे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वावर जनतेचा अढळ विश्वास असल्याचे सिद्ध झाले.

यावेळी आसाम निवडणुकीत ८५.९६% इतके उच्च मतदान नोंदवले गेले, जे जनतेमध्ये निवडणुकीच्या मुद्यांचे गांभीर्य असल्याचे थेट द्योतक आहे. राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी), नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि बांगलादेशी घुसखोरी यांसारख्या ज्वलंत मुद्द्यांचे या निवडणुकीवर वर्चस्व होते. शिवाय, २०२३ मध्ये लागू झालेल्या नवीन मतदारसंघ पुनर्रचनेचा निवडणुकीच्या समीकरणांवरही लक्षणीय परिणाम झाला असून, त्याचा थेट फायदा सत्ताधारी आघाडीला झाला आहे. बेरोजगारी आणि पूर यांसारख्या मूलभूत समस्या असूनही, हिंदुत्व आणि प्रादेशिक अस्मितेच्या कथानकाचे वर्चस्व राहिले.

आसामच्या मतदारांनी भाजपाच्या ३१-कलमी संकल्प पत्राला स्पष्ट कौल दिला आहे. सत्तेत परतल्यानंतर तीन महिन्यांच्या आत समान नागरी संहिता लागू करणे, घुसखोरांना ओळखून त्यांची हकालपट्टी करणे आणि लँड जिहाद थांबवून अतिक्रमित जमीन मुक्त करणे, अशी भक्कम आश्वासने पक्षाने दिली होती. आर्थिक आघाडीवर, राज्याने आपले सकल राष्ट्रीय उत्पादन २.२४ लाख कोटी रुपयांवरून ७.४१ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याची कामगिरी आणि ५ लाख कोटी रुपयांच्या नवीन गुंतवणुकीची दूरदृष्टी निर्णायक ठरली. याव्यतिरिक्त, अरुणोदय योजनेअंतर्गत गरजू कुटुंबांना ३,००० रुपयांची मासिक मदत आणि ४० लाख महिलांना २५,००० रुपयांची एक-वेळची आर्थिक मदत यांसारख्या कल्याणकारी उपाययोजनांनी भाजपाच्या बाजूने मोठ्या संख्येने महिला मतदारांना आकर्षित केले. ◂(वृत्तसंस्था)

### विदेशी मालमत्तेचा वाद काँग्रेसला नडला

**निवडणुकीदरम्यान, काँग्रेसने मुख्यमंत्री सरमा यांच्या पत्नीकडे दुबईमध्ये मालमत्ता आणि अनेक पासपोर्ट असल्याचा आरोप केला होता. तथापि, सरमा यांनी हे आरोप स्पष्टपणे फेटाळून लावले आणि एका पाकिस्तानी सोशल मीडिया ग्रुपने तयार केलेल्या एआय आणि फोटोशॉप-आधारित बनावट कागदपत्रांचा वापर करून रचलेला हा एक परदेशी कट असल्याचे म्हटले. या प्रकरणात दाखल झालेल्या एफआयआरने आणि सरमा यांच्या आक्रमक प्रत्युत्तराने काँग्रेसचा हल्ला निष्प्रभ केला. त्यामुळे भाजपा आणि मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांना थेट सहानुभूती मिळाली.**

### आसाममधील भाजपाच्या विजयाचा अर्थ काय?

**आसाममधील एनडीएचा हा विजय केवळ सत्तेत परत येणे नाही, तर संपूर्ण ईशान्य भारतात भाजपाच्या राजकीय आणि वैचारिक वर्चस्वाची एक भक्कम पुष्टी आहे. येत्या काळात, राज्यात बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायद्याची अंमलबजावणी आणि अवैध स्थलांतराविरोधातील कठोर धोरणांच्या अंमलबजावणीकडे सर्वांचे लक्ष असेल. या जनादेशामुळे हिमंता बिस्वा सरमा यांनी ईशान्य भारतातील भाजपाचे सर्वोच्च आणि निर्विवाद नेते म्हणून आपले स्थान आणखी मजबूत केले आहे.**

## भाजपाच्या कामगिरीचे थरूरांकडून कौतुक!

**◆ तिरुवनंतपुरम, ५ मे**

विधानसभा निवडणुकांतील निराशाजनक कामगिरीनंतर काँग्रेसमध्ये आत्मपरीक्षणाची गरज असल्याचे मत शशी थरूर यांनी स्पष्टपणे मांडले आहे. यावेळी त्यांनी भाजपच्या कामगिरीचेही कौतुक केले. विविध राज्यांमध्ये अपेक्षित यश मिळाले नाही, त्यामुळे पक्षाने आपल्या धोरणांचा आणि कामकाजाच्या पद्धतीचा गंभीरपणे आढावा घेणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. थरूर यांनी सांगितले की, यापूर्वीही पक्षांतर्गत बदल आणि मूल्यांकनाची मागणी होत होती, मात्र आता निवडणूक निकालांनंतर ही गरज अधिक तीव्र झाली आहे. केरळमधील तुलनेने चांगल्या कामगिरीचा दाखला देत त्यांनी सांगितले की, तेथील यशामागील कारणांचा सखोल अभ्यास करून त्याच धर्तीवर इतर राज्यांमध्येही रणनीती आखण्याची गरज आहे. त्यांच्या मते, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने काही राज्यांमध्ये प्रभावी कामगिरी केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# बंगालमध्ये श्रद्धेचा विजय; दुर्गा मातेचे बंद मंदिर पुन्हा सुरू

**◆ आसनसोल, ५ मे**

आसनसोल येथील बस्तीन बाजार परिसरातील श्री-श्री दुर्गामाता चॅरिटेबल ट्रस्टच्या दुर्गा मंदिराचे दरवाजे अनेक वर्षांनंतर पुन्हा भाविकांसाठी खुले करण्यात आले आहेत. दीर्घकाळ बंद असलेले हे मंदिर उघडताच मोठ्या संख्येने नागरिकांनी तेथे हजेरी लावली.




स्थानिकांच्या मते, हे मंदिर त्यांच्या श्रद्धेचे केंद्र असून ते वर्षभर बंद राहिल्यामुळे भाविकांना मोठी अडचण होत होती. काही वर्षांपासून धार्मिक तणावाचे कारण देत मंदिरात नियमित पूजा होत नव्हती. फक्त दुर्गा पूजा आणि लक्ष्मी पूजेच्या काळातच मंदिर उघडले जात असे. अलीकडील विधानसभा निवडणुकीनंतर परिस्थितीत बदल झाला आहे. आसनसोल उत्तर मतदारसंघातून निवडून आलेले कृष्णेंदू मुखर्जी यांनी प्रचारादरम्यान दिलेले आश्वासन पूर्ण करत मंदिर वर्षभर खुले ठेवण्याचा निर्णय अंमलात आणला. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांनी मंदिरात जाऊन विधी पार पाडले आणि दरवाजे सर्वांसाठी उघडले. या निर्णयामुळे स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. नागरिकांच्या मते, हे केवळ मंदिर उघडण्यापुरते मर्यादित नसून त्यांच्या दीर्घकालीन मागण्यांची पूर्तता आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ४ जूनला प्रदर्शित होणार 'पेड्डी'

**मुंबई :** राम चरण सध्या त्याच्या 'पेड्डी' चित्रपटामुळे चर्चेत आहे. आता निर्मात्यांनी प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. यासोबतच निर्मात्यांनी चित्रपटाचे नवीन पोस्टरही प्रदर्शित केले आहे. बूची बाबू दिग्दर्शित हा चित्रपट आधी ३० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता, पण निर्मात्यांनी आयपीएलमुळे प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. आता हा चित्रपट ४ जून रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. स्पोर्ट्स ड्रामा चित्रपट 'पेड्डी'चे चित्रीकरण पूर्ण झाले आहे.



या चित्रपटात रामसोबत जान्हवी कपूर देखील मुख्य भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय यात शिव राजकुमार, दिव्येंदु शर्मा, जगपति बाबू आणि बोमन इराणी देखील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. याचे संगीत ए .आर. रहमान यांनी दिले आहे. श्रुती हासन देखील या चित्रपटाचा भाग असण्याची शक्यता आहे.

### 'राजा शिवाजी'ने कमावले २१ कोटी

**मुंबई :** बॉक्स ऑफिसवर सध्या रितेश देशमुखच्या ऐतिहासिक चित्रपट 'राजा शिवाजी'ने मराठी बॉक्स ऑफिसवर विक्रमी सुरुवात केली आहे. मराठी आणि हिंदीमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने दोन दिवसांतच भारतात २१.९० कोटी रुपयांचे निव्वळ कलेक्शन केले आहे. चित्रपटाने केवळ मराठी भाषेत दोन दिवसांत १५ कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली आहे. शुक्रवारी ८ कोटींच्या ओपनिंगसह हा मराठीतील सर्वात मोठा ओपनर चित्रपट ठरला होता. हिंदी व्हर्जनलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाचे एकूण कलेक्शन आता २६.०६ कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

### 'किंग'मध्ये दीपिकाने परिधान केला २३ हजारांचा ड्रेस



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण सध्या तिच्या गरोदरपणात 'किंग' चित्रपटाचे चित्रीकरण करत आहे. अलीकडेच समाज माध्यमावर दीपिका आणि शाहरुख खानचे काही फोटो व्हायरल झाले आहेत. हे फोटो दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊनचे आहेत. चित्रीकरणादरम्यान दीपिकाच्या लूकची बरीच चर्चा होत आहे. चाहत्यांनी दीपिकाच्या ड्रेसचा शोध घेतल्यानंतर तिने २३,५३७ रुपये किमतीचा ड्रेस परिधान केला होता, असे त्यांना कळले. ड्रेसची मूळ किंमत सुमारे ४७ हजार रुपये होती, पण तो ५० टक्के सवलतीवर मिळत होता. मात्र, आता हा ड्रेस वेबसाइटवर आउट ऑफ स्टॉक झाला आहे.

## मतदारांनी सवलतींना नाकारले

**◆ कोलकाता, ५ मे**

काही राज्यांमध्ये सत्ताधारी पक्षांनी विविध सवलती आणि योजना जाहीर करूनही मतदारांनी त्यांना पाठिंबा दिला नसल्याचे निकालावरून उघड झाले आहे. तर सत्ताविरोधी वातावरणाचा फायदा भारतीय जनता पक्षाने घेतला. राज्य निवडणुकांच्या निकालांच्या आधारे व्यापक चित्र पाहिले असता, जर हाच कल पुढील लोकसभा निवडणुकांमध्ये कायम राहिला, तर पक्ष आणि त्यांच्या आघाडीची स्थिती आणखी मजबूत होऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घडामोडींमधून एक गोष्ट स्पष्ट होते की, केवळ योजना जाहीर करणे पुरेसे नसून मजबूत संघटन, प्रभावी नेतृत्व असणे तितकेच आवश्यक आहे. ◂(वृत्तसंस्था)

# आठ ग्रॅम सोन्याच्या आश्वासनाकडे महिलांचे लक्ष

## तामिळनाडूत विजय यांची लागणार कसोटी

**◆ चेन्नई, ५ मे**

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत एक नवीन पक्ष म्हणून निवडणूक लढवणारा टीव्हीके सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आल्याने सरकार स्थापन करण्याची शक्यता आहे. आता मतदारांचे लक्ष अभिनेते-राजकारणी विजय यांच्या निवडणूक आश्वासनांवर लागले आहे. या आश्वासनात लग्नासाठी ८ ग्रॅम सोने देण्याच्या समावेश आहे. आजच्या दरानुसार या सोन्याची किंमत सुमारे १,४०,००० (२२ कॅरेट) रुपयांच्या जवळपास आहे.

पक्षाच्या जाहीरनाम्यात, टीव्हीके प्रमुख विजय यांनी ६० वर्षांखालील महिलांना २,५०० ची मासिक मदत, लग्नासाठी ८ ग्रॅम सोने आणि प्रत्येक कुटुंबाला वर्षाला सहा मोफत एलपीजी सिलिंडर देण्याचे आश्वासन दिले होते. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, टीव्हीकेला १०७ जागांवर विजय मिळाला असून ते बहुमताच्या ११८ जादुई आकड्यापासून केवळ ११ जागा दूर आहे. तर डीएमके ७४ आणि एडीएमकेने ५३ जागांवर विजय मिळवला आहे. राज्यात टीव्हीके सर्वात मोठा पक्ष उदयास आल्याने त्यांचीच सत्ता येणार आहे.

विजय यांनी गरीब वधूंना सोन्यासह उच्च दर्जाच्या रेशमी साड्या आणि महिलांच्या नेतृत्वाखालील बचत गटांना ५ लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज देण्याचे आश्वासन दिले आहे. सत्तेवर आल्यास भ्रष्टाचारमुक्त आणि सुशासन, पाच एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांचे कृषी सहकारी पीक कर्ज पूर्णपणे माफ करण्याचेही आश्वासन दिले आहे. या जाहीरनाम्यात शिक्षणावरही विशेष भर देण्यात आला आहे. शाळा सोडण्याच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी,



टीव्हीके पक्षाचे प्रमुख विजय यांनी मंगळवारी चेन्नई येथील पक्षाच्या मुख्य कार्यालयाला भेट दिली

सरकारी आणि राज्य-अनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या माता किंवा पालकांना १५,००० रुपयांचे वार्षिक अनुदान देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### उच्च शिक्षणासाठी कर्जही देणार

**राज्यातील शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचे श्रेय असलेले प्रख्यात नेते के. कामराज यांच्या नावाने १०० विशेष निवासी शाळा स्थापन करण्याचे आणि उच्च शिक्षणासाठी २० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज, यासह अनेक आश्वासने दिली आहेत. आता ही आश्वासने टीव्हीकेला पूर्ण करावी लागणार आहे. विरोधकही ही आश्वासने पूर्ण करण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकणार आहे.**



भाजपाच्या विजयानंतर हावडा येथे मिठाईचे वाटप करताना भाजपा समर्थक

# तृणमूलच्या बालेकिल्ल्यात भाजपाची मुसंडी

**मुस्लिम मतपेढीवर ममतांचे वर्चस्व कायम**

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची मतमोजणीनंतर सुमारे ११५ महत्त्वाच्या जागांचे (मुस्लिमबहुल क्षेत्र) निर्णायक आकडे समोर आले आहेत. निवडणूक प्रणालीनुसार, जर एखाद्या मतदारसंघात एकाच समुदायाची ३०% पेक्षा जास्त लोकसंख्या केंद्रित असेल, तर तो मतदारसंघ निवडणुकीचा निकाल ठरवू शकतो. ३०% पेक्षा जास्त मतदान झालेल्या बहुतांश जागांवर बंगालमधील सत्ताधारी पक्षाला गतवेळेच्या तुलनेत मोठा धक्का बसला आहे. असे असूनही, तृणमूल काँग्रेसने या जागांवर भाजपावर आघाडी मिळवण्यात यश मिळवले आहे.

११५ विधानसभा जागांपैकी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने सर्वाधिक म्हणजेच सुमारे ६९ जागा जिंकल्या आहेत. सत्ताविरोधी लाटेचे दावे केले जात असले तरी, तृणमूल काँग्रेसची कामगिरी राज्यातील अल्पसंख्याकांमध्ये तिची मजबूत पकड दर्शवते. दुसरीकडे, भाजपाने या भागांमध्ये आपली पारंपरिक मतपेढी नसतानाही तब्बल ३९ जागा जिंकून मुसंडी मारली आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की, राज्यातील मुख्य लढत तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांच्यातच होती. विशेष म्हणजे, गत विधानसभा निवडणुकीत ३० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या असलेल्या ८५ पैकी ७५ मतदारसंघांमध्ये तृणमूल काँग्रेसने विजय मिळवला होता.

या ११५ जागांच्या निवडणूक गणितात इतर प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांची कामगिरी अत्यंत खराब झाली. एकेकाळी बंगालच्या राजकारणातील एक प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. इतकेच नव्हे तर, हुमायून कबीर यांच्या एजेयूपीने दोन जागा जिंकल्या. डाव्या पक्षांची कामगिरी तर त्याहूनही निराशाजनक होती. बंगालचे दीर्घकाळचे सत्ताधीश असलेल्या सीपीएम आणि एआयएसएफला प्रत्येकी एका जागेवर समाधान मानावे लागले. ◂(वृत्तसंस्था)

### द्विपक्षीय राजकीय समीकरणाचे संकेत

**या ११५ जागांचे निवडणूक निकाल बंगालच्या राजकारणातील ध्रुवीकरण स्पष्टपणे दर्शवतात. ६९ जागांवरील तृणमूल काँग्रेसचा विजय हे सिद्ध करतो की, पक्षाने आपल्या मूळ मतपेढीवर नियंत्रण कायम ठेवले आहे. ३९ जागा मिळवलेल्या भाजपाच्या कामगिरीवरून दिसून येते की, त्यांनी राज्यात आपले स्थान मजबूत करून सत्ता मिळवली आहे. काँग्रेस आणि डाव्या पक्षांचा झालेला सफाया राज्यातील एका नवीन द्विपक्षीय राजकीय समीकरणाचे संकेत देत आहे.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# भाजपाचे यश आणि जबाबदारी

पश्चिम बंगालचे राजकारण जरा वेगळे आहे. या राज्यात भाजपा कधीही सत्तेत येऊ शकत नाही. ममता दीदी ह्या करिश्मा असलेल्या नेत्या आहेत, असा दावा करणाऱ्या कथित राजकीय तज्ज्ञांना ताज्या विधानसभा निकालांनी चांगलीच चपराक बसली आहे. आसाममध्ये स्वबळावर आणि पुडुचेरीत मित्रपक्षांच्या मदतीने भाजपाने तिसऱ्यांदा विजयी पताका फडकावली आहे. पाचपैकी तीन राज्यांमधील निकाल भाजपाच्या बाजूने लागले आहेत. त्यामुळे २०१४ पासून राष्ट्रीय राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय विचारांचा अश्वमेध आता ब्रह्मपुत्रेच्या तीरावर जाऊन पोहोचला आहे. या विजयामुळे भाजपाला बंगालमध्ये पाय घट्ट रोवण्याची संधी मिळाली आहे. पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दुर्दम्य राजकीय इच्छाशक्ती आणि अजोड रणनीती यामुळे ही विजयश्री खेचून आणणे भाजपाला जमले. माणसे असोत की पक्ष असोत, त्यांचे यश मोठे होते, तेव्हा त्यांच्या जबाबदाऱ्याही वाढतात. भारताच्या ७० टक्क्यांहून अधिक भूभागावर सत्ताधीश झालेल्या भाजपाचीही जबाबदारी या निकालांनी आणि त्यातही पश्चिम बंगालच्या यशाने अधिक वाढविली आहे. भाजपाची सत्ता असलेल्या सर्व राज्यांमध्ये सबळ नेतृत्व देऊन तेथील जनतेच्या अपेक्षांवर या पक्षाला आता खरे उतरावे लागणार आहे. या राज्यांमधील सत्ता टिकवून ठेवण्यासाठी तेथील कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन राष्ट्रीय विचारांचा अग्नी तेवत ठेवावा लागणार आहे.

पश्चिम बंगालमध्ये दीर्घकाळ टिकलेले राजकीय समीकरण ताज्या निकालांनी पूर्णपणे बदलून टाकले. पहिल्यांदाच या राज्यात भाजपाने स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळवित सत्ता हस्तगत केली आहे. मागील १५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला त्या तुलनेत फार यश मिळाले नाही. या पराभवामुळे ममता बॅनर्जी यांच्या दीर्घकालीन राजकीय वर्चस्वाला धक्का बसला आहे. भाजपाच्या या यशाला किमान एका दशकाची पृष्ठभूमी आहे. २०१४ मध्ये केंद्रात सत्ता आल्यानंतर भाजपाने सातत्याने या राज्यात संघटन वाढविण्यावर भर दिला. टप्प्याटप्प्याने मतांची टक्केवारी वाढवत पक्षाने तेथील पकड मजबूत केली. पश्चिम बंगालमध्ये भाजपाची पाळेमुळे रोवली जाण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात तृणमूल काँग्रेसचीच भूमिका महत्त्वाची होती. १९९८ मध्ये भाजपाने पहिल्यांदाच दमदम लोकसभा मतदारसंघातून विजय मिळविला होता. त्यावेळी तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांची आघाडी होती. भाजपाचे तपन सिकदर यांनी विजय मिळवित पक्षासाठी पश्चिम बंगालच्या सत्ताकारणाचे दार उघडले होते. १९९९ मध्येही त्यांनी विजय मिळविला आणि पुढे अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये मंत्रिपद भूषविले होते. त्या एका जागेपासून सुरू झालेला भाजपाचा प्रवास आज विधानसभेच्या २०७ जागांपर्यंत पोहोचला आहे. सद्यस्थितीत प. बंगालमधील ४२ लोकसभा मतदारसंघांपैकी १२ खासदार भाजपाचे आहेत. तृणमूल काँग्रेसचे २९ आणि काँग्रेसचा एक खासदार आहे. दोन वर्षांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकीतील ही कामगिरी लक्षात घेतली तर भाजपाचा विजय नेत्रदीपक ठरतो आणि त्यामागे रणनीतीचे व राष्ट्रीय व राज्यस्तरीय मुद्यांचे फार महत्त्व आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या राज्यातील महिला, युवक, शासकीय कर्मचारी यांच्यासह सर्वांना आश्वासक आणि सुरक्षित वातावरण गेल्या कित्येक दशकांत मिळालेले नव्हते. ते आपल्याला भाजपाच्या सत्ताकाळात मिळू शकते, असा विश्वास या मतदानातून व्यक्त झाला. केंद्र सरकारकडून देशभरात सुरू असलेला विकास आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा या दोन्ही मुद्यांवर मध्यमवर्गीय आणि प्रथमच मतदान करणाऱ्या तरुण मतदारांना आकर्षित करण्यात भाजपाला यश आले. पश्चिम बंगालच्या निवडणुकीत कायदा-सुव्यवस्था आणि सुरक्षा हा तर फारच मोठा मुद्दा होता. कम्युनिस्टांचा दहशतखोर पॅटर्न ममता बॅनर्जींनी पुढे चालविला होता. भाजपाने निर्भय वातावरणाची हमी दिली आणि मतदारांना ते भावले. निवडणुकीदरम्यान केंद्रीय दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती मतदारांना निर्भय करणारी ठरली. याशिवाय, मतदारयाद्यांचे मोठ्या प्रमाणात शुद्धिकरण झाल्यामुळे पात्र व भारतीय मतदारांनाच मतदानाची संधी मिळाली हाही मुद्दा आहेच. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम भाजपाच्या बाजूने गेला.

आसामच्या राजकारणात पुन्हा एकदा हिमंता बिस्वा सरमा यांचीच छाप उमटली. या निवडणुकीत भाजपाने पूर्णपणे सरमा यांच्या नेतृत्वावर भर दिला. तेथेही घुसखोरीचा मुद्दा होताच. केवळ मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून नव्हे तर रणनीतीकार आणि मुख्य प्रचारक म्हणूनही सरमा यांनी आघाडी घेतली. त्यांनी राज्यभर केलेले झंझावाती दौरे, शेकडो सभा आणि थेट व आक्रमक संवादशैली यामुळे मतदारांपर्यंत पक्षाचा संदेश प्रभावीपणे पोहोचला. स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करीत त्यांनी प्रचाराला धार दिली आणि त्याचा थेट फायदा भाजपाला झाला. सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळविणे कोणत्याही पक्षासाठी मोठे आव्हान असते. सामान्यतः दीर्घकाळ सत्तेत असलेल्या पक्षाविरुद्ध किंवा नेत्याविरुद्ध जनतेत नाराजी निर्माण होते. मात्र, सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने हा 'अँटी इन्कम्बन्सी'चा अडथळा यशस्वीपणे पार केला. प्रचारादरम्यान काही वादग्रस्त मुद्यांनीही वातावरण तापवले होते. काँग्रेस नेते पवन खेरा यांनी सरमा यांच्या पत्नीबाबत केलेल्या आरोपांमुळे मोठी खळबळ उडाली होती. या आरोपांचा योग्य राजकीय वापर करीत भाजपाने वातावरण निर्मिती केली व योग्य रणनीतीच्या माध्यमातून निवडणूक जिंकली. पुडुचेरीमध्ये एनडीएला एकूण ३० सदस्यांच्या सभागृहात १८ जागा मिळाल्या आहेत. इंडिया आघाडीला फक्त ६ जागा मिळाल्या तर अपक्ष उमेदवारांनी ३ जागा जिंकल्या. दोन्ही मतदारसंघांत विजय मिळविणारे रंगासामी हे विक्रमी पाचव्यांदा मुख्यमंत्री होण्याच्या तयारीत आहेत. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रदानपदाची धुरा सांभाळली तेव्हा गुजरात, मध्यप्रदेश, राज्यस्थान यासह सात राज्यांमध्ये भाजपाची सत्ता होती. त्यातील दोन राज्यांमधील सत्ता मित्रपक्षांच्या बळावर होती. काँग्रेसची एकूण १३ राज्यांत सत्ता होती. तेव्हापासून सुरू झालेला भाजपाचा विजयरथ अविरत एकापाठोपाठ एक यश संपादन करीत डौलात निघाला आहे. आज महत्त्वाच्या अशा महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेशसह भाजपाची आणि भाजपाप्रणीत एनडीए सरकारांची संख्या २० च्या घरात जाते. एवढ्या मोठ्या भूभागावर भाजपाचा ध्वज अभिमानाने फडकला आहे. त्यातही पश्चिम बंगालमधील विजय भाजपाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. बांगलादेशची सीमा लागून असल्याने आणि बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न देशभरात अतिशय गंभीर होत असल्याने या विजयाला राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अपार महत्त्वही आहे. यशासोबत जबाबदारी वाढतेच. तशी ती भाजपाची वाढली आहे. केंद्रात भाजपाचे सरकार आहे आणि भारतातील सत्तर टक्के भूभागावरील राज्येही भाजपाच्या सत्तेअंतर्गत आहेत. लोकांच्या अपेक्षा स्वाभाविकच वाढतील. किंबहुना, त्या वाढलेल्या अपेक्षाच मतपेटीतून भाजपाला मिळालेल्या कौलाच्या स्वरुपात यापूर्वी आणि यावेळी देखील व्यक्त झाल्या हे समजून घेतले पाहिजे. सुशासन, सुरक्षितता, सौहार्दासह पारदर्शी सरकारी यंत्रणा, निर्भय व्यवस्था, गतिमान प्रशासन, उत्तम शिक्षण-आरोग्यसेवेच्या संधी, पेयजल-सिंचन व शेती, रोजगार व उद्योग-उद्यम अशा विविध आघाड्यांवर भाजपाच्या सर्व सरकारांना काम करावे लागेल. पश्चिम बंगालच्या मतदारांनी दिलेला कौल हा ऐतिहासिक यासाठी आहे की, तिथे पठडी नाकारून भाजपाला विजय मिळाला आहे. स्वाभाविकच तेथील जनतेच्या अपेक्षा असणार. इतर राज्यांतही भाजपाच्या सत्ताधाऱ्यांकडून जनतेला अपेक्षा आहेतच. अशी आव्हाने पेलण्यातच राजकीय पक्ष व नेत्यांचे खरे कसब असते. भाजपामध्ये अंगभूत कसब असलेले अनेक नेते आहेत. प्रत्येक राज्याची काही जुनी दुखणी आहेत. ती या नेत्यांच्या माध्यमातून हटवावी लागतील. निर्भयतेचे वातावरण सर्वत्र निर्माण करावे लागेल. योग्य व्यक्तीचा योग्य ठिकाणी वापर करीत गतिमान व कल्याणकारी प्रशासनाची गाडी वेगाने हाकली गेली तर देशाच्या कानाकोपऱ्यातील लोक भाजपाला सत्तेची माळ घालण्यास तयार आहेत, याची हमी देणारा हा निकाल आहे.


## विशेष

# शहरी परिवहन कात टाकतेय

**प्रा. सुखदेव बखळे**

सध्या देशातील मेट्रो आणि प्रादेशिक जलद परिवहन प्रणाली (आरआरटीएस) नेटवर्कची एकूण लांबी एक हजार किलोमीटरपेक्षा अधिक झाली असून हे नेटवर्क २४ शहरांमध्ये कार्यरत आहे. २०१४ मध्ये ही लांबी केवळ २४८ किलोमीटर होती. यावरून या क्षेत्रात झपाट्याने झालेली प्रगती स्पष्ट होते. दिल्ली मेट्रो हे सुमारे ३५० किलोमीटर लांबीचे सर्वात मोठे जाळे आहे तर बंगळुरू मेट्रोनेही ७५ किलोमीटरचा टप्पा ओलांडला आहे. देशभरात दररोज सुमारे २.८ दशलक्ष प्रवासी या सेवांचा वापर करतात. याशिवाय, जवळपास ९७० किलोमीटर लांबीचे नवीन प्रकल्प सध्या विविध शहरांमध्ये बांधकामाधीन आहेत. त्यात दिल्ली-मेरठ 'आरआरटीएस कॉरिडॉर'चा समावेश आहे. या क्षेत्राच्या विस्तारात केंद्र सरकारचा वाढता पाठिंबा निर्णायक ठरला आहे. २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मेट्रो प्रकल्पांसाठी ३४८.०७ अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली असून २०१३-१४ च्या तुलनेत ही रक्कम सहापट अधिक आहे. याशिवाय आशियाई विकास बँक, जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था, 'युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक' आणि 'केएफटी' यासारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडूनही महत्त्वपूर्ण निधी मिळत आहे. शहरी परिवहनात केवळ विस्तारच नव्हे, तर नव्या तंत्रज्ञानावर आधारित पर्यायांचाही उदय होत आहे. दिल्ली-मेरठ दरम्यान विकसित होत असलेला 'नमो भारत आरआरटीएस कॉरिडॉर' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या प्रकल्पातील गाड्या १६० किलोमीटर प्रतितास वेगाने धावू शकतात आणि सध्या सुमारे ५५ किलोमीटर मार्गावर सेवा सुरू आहे.

दरम्यान, केरळमधील कोची येथे देशातील पहिला 'वॉटर मेट्रो' प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाद्वारे ७८ किलोमीटर मार्गावर १० बेटांना इलेक्ट्रिक-हायब्रिड बोटींद्वारे जोडण्याचा उद्देश आहे. या उपक्रमाच्या यशानंतर देशातील २४ शहरांमध्ये जलआधारित परिवहनाच्या शक्यता तपासण्यासाठी तांत्रिक अभ्यासांना मंजुरी देण्यात आली. पर्यावरणीय शाश्वततेच्या दृष्टीनेही मेट्रो प्रकल्प महत्त्वाची पावले उचलत आहेत. सप्टेंबर २०२४ मध्ये 'एनसीआरटीसी'ने कमी दरात हरित ऊर्जा मिळविण्यासाठी 'पॉवर ट्रेडिंग कॉर्पोरेशन'सोबत करार केला. तसेच फेब्रुवारी २०२५ मध्ये ओखला विहार मेट्रो स्थानकावर द्विमुखी सौर ऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला. तो दोन्ही बाजूंनी सूर्यप्रकाश शोषून ऊर्जा निर्माण करतो. ऊर्जा कार्यक्षमतेसाठी पुनरुत्पादक ब्रेकिंग (रिजनरेटिव्ह ब्रेकिंग) तंत्रज्ञानाचाही वापर वाढत आहे. दिल्ली मेट्रोच्या 'ब्लू लाईन'ला कार्बन-न्यूट्रल प्रमाणपत्र मिळणे ही या क्षेत्रातील प्रगतीची नोंद घेण्यासारखी बाब आहे. शिवाय इलेक्ट्रिक बस सेवेला चालना देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. 'पीएम-ई-बस सेवा' योजनेंतर्गत १० हजार ई-बस तैनात



करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ऑगस्ट २०२५ पर्यंत सुमारे ७३०० बस मंजूर झाल्या असून त्यापैकी ६५१८ बससाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच, 'पीएम इलेक्ट्रिक ड्राईव्ह रिव्हॉल्युशन' योजनेंतर्गत चार दशलक्षांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ९ शहरांमध्ये १४ हजारांहून अधिक ई-बसना प्रोत्साहन दिले जाणार आहे. अनेक राज्यांनीही ई-बसचा वापर वाढविण्यासाठी स्वतंत्र धोरणे आखली आहेत. भारतातील मेट्रो रेल क्षेत्र केवळ विस्तारापुरते मर्यादित न राहता तांत्रिक प्रगती, स्वदेशीकरण आणि प्रवासी-केंद्रित सुधारणांच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. वाढती मागणी, शहरांमधील नेटवर्क विस्तार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार यामुळे या क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडत आहेत. मेट्रो नेटवर्कच्या विस्तारासोबतच रोलिंग स्टॉक (गाड्या आणि संबंधित उपकरणे) या क्षेत्रातही सकारात्मक प्रगती दिसून येते. विशेषतः चालकविरहित गाड्यांचा वापर वेगाने वाढत आहे. दिल्ली मेट्रोच्या मॅजेंटा लाईनवर संपूर्णपणे अनअटेंडेड ट्रेन ऑपरेशन्स (युटीओ) सुरू झाले असून पिंक लाईनवर ही प्रणाली लागू केली जात आहे. यासोबतच 'मेक इन इंडिया'च्या धोरणांतर्गत रोलिंग स्टॉकचे स्वदेशी उत्पादन वाढविण्यावर भर दिला जात आहे. बंगळुरू मेट्रोच्या 'यलो लाईन'ला १०० टक्के स्वदेशी बनावटीची चालकविरहित ट्रेन मिळाली. ती 'टिटागढ रेल सिस्टिम्स'ने तयार केली आहे. तसेच, 'अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड'ने दिल्ली मेट्रोच्या फेज चारसाठी 'मेट्रोपोलिस' प्रकारातील पहिली गाडी वितरित केली आहे. या गाड्या आंध्र प्रदेशमधील श्रीसिटी येथील प्रकल्पात तयार करण्यात आल्या असून 'ग्रेड ऑफ ऑटोमेशन ४' म्हणजे पूर्णपणे चालकविरहित तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. सहा डब्यांच्या एकूण ५२ गाड्या टप्प्याटप्प्याने दिल्लीत दाखल होणार आहेत.

तिकीट व्यवस्था आणि भाडे संकलन प्रक्रियेत डिजिटल परिवर्तन दिसून येते. दिल्ली, कोलकाता आणि मुंबई मेट्रोच्या काही मार्गांवर क्यूआर कोड आधारित तिकीट प्रणाली सुरू करण्यात आली आहे. दिल्ली मेट्रोचे तिकीट आता उबर आणि रॅपिडोसारख्या कॅब ॲप्सवरूनही बुक करता येते. याशिवाय, 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) प्रणालीशी सुसंगतता वाढविण्यात येत आहे. मुंबई मेट्रोच्या 'ॲक्वा लाईन'वर आणि आग्रा मेट्रोवर ही सुविधा सुरू करण्यात आली. सिग्नलिंग आणि कम्युनिकेशन क्षेत्रातही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) प्रणालीमुळे माहितीचे अचूक आणि वेळेवर आदानप्रदान शक्य होते. मुंबई मेट्रोच्या ॲक्वा लाईनवर 'अरबॅलिस फॉरवर्ड' हे अत्याधुनिक 'सीबीटीसी' तंत्रज्ञान वापरले जात आहे. तसेच कानपूर मेट्रोच्या विस्तारित मार्गावरही स्वयंचलित ट्रेन ऑपरेशनसाठी 'सीबीटीसी' प्रणाली लागू करण्यात आली आहे. प्रवासी सुरक्षितता आणि सोयीसुविधा वाढविण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपाययोजना राबविण्यात येत आहेत. प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्समुळे अपघातांची शक्यता कमी झाली आहे. सर्व स्थानकांवर मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित निगराणी प्रणालींचा वापर वाढत आहे. 'बंगळुरू मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'ने सहा स्थानकांवर 'एआय-सक्षम सीसीटीव्ही' प्रणाली सुरू केली. या प्रणालीमुळे रिअल-टाईममध्ये धोके ओळखणे, संशयास्पद हालचालींचा मागोवा घेणे आणि वाहनांच्या नंबर प्लेटची ओळख पटविणे शक्य झाले आहे. मेट्रो सेवेमध्ये ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प, टॅक्टाईल टाईल्स, ऑडिओ-व्हिज्युअल घोषणा यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी'वर विशेष भर दिला जात आहे. फीडर बस, टॅक्सी, ऑटोरिक्षा आणि इलेक्ट्रिक वाहनांशी मेट्रोचे जाळे जोडले जात आहे. हैदराबाद मेट्रोसाठी 'ईव्हीझीप'ने इलेक्ट्रिक कार आणि महिला चालवत असलेल्या इलेक्ट्रिक दुचाकी सेवा सुरू केल्या. पुणे मेट्रोने 'टीएस स्वीच ई-राईड प्रा. लि.'सोबत ई-बाईक सेवेसाठी करार केला असून पहिल्या टप्प्यात १० स्थानकांवर ही सुविधा उपलब्ध होणार आहे तसेच 'एनसीआरटीसी' आणि दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन यांनी न्यू अशोकनगर आणि आनंद विहार या 'नमो भारत' स्थानकांना जोडण्यासाठी वातानुकूलित इलेक्ट्रिक बस सेवा सुरू केली आहे. मेट्रो रेल प्रणाली भारतातील शहरी परिवहनाचा कणा बनत आहे. नेटवर्कचा विस्तार, ऊर्जा कार्यक्षमतेवर दिला जाणारा भर, डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि प्रवासी अनुभव सुधारण्यासाठी घेतलेले उपक्रम यामुळे या क्षेत्राने उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# बच्चू कडूंचा शिवसेनेतील प्रवेशाचा अन्वयार्थ



अचलपूर मतदारसंघ भाजपाला दिल्यामुळे नाराज झालेल्या बच्चू कडू यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेतून बाहेर पडत प्रहार संघटनेची व पुढे याच नावाने पक्षाची स्थापना केली. गेल्या २५ वर्षांपासून ते प्रहारच्या नावावर राजकारण करीत आहेत. त्यातील २० वर्षे ते आमदार होते. आगळ्यावेगळ्या आंदोलनातून संघर्ष करीत उदयास आलेले नेतृत्व म्हणजे बच्चू कडू! गोरगरीब, वंचित आणि शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करणारा नेता म्हणून त्यांनी राज्यभरात एक वेगळी ओळख निर्माण झाली. नेहमी एल्गारच पुकारायचा का, या प्रश्नाचे उत्तर शोधत असतानाच त्यांना उद्धव ठाकरे यांनी आपल्या सरकारमध्ये येण्याचे निमंत्रण दिले. बच्चू यांनी ते हसतखेळत स्वीकारले. उद्धव यांना संख्याबळाची फारशी गरज नसताना त्यांनी बच्चूंना राज्यमंत्री करण्याचा जो निर्णय त्यावेळी घेतला होता, त्यावर अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले होते. उद्धव यांचा तो निर्णय किती चुकीचा होता, हे एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीचे समर्थन करत गुवाहाटीला गेलेल्या बच्चू कडू यांनी सिद्ध केले. जनतेतल्या त्यांच्या प्रतिष्ठेला बसलेला हा सर्वात मोठा पहिला धक्का होता. तेव्हापासूनच त्यांची पडझड खऱ्या अर्थाने सुरू झाली. उद्धव यांच्या भरलेल्या ताटावरून उठलेल्या बच्चू यांना शिंदे सरकारमध्ये मंत्रिपदापासून वंचित राहावे लागले. आदळआपट केल्यावर दिव्यांग विभागाचे राज्यमंत्री दर्जाचे अध्यक्षपद देऊन त्यांची बोळवण करण्यात आली. काही दिवस ते त्यात खुश राहिले. पुढे विधानसभा निवडणुका आल्या. महायुतीच्या जागा वाटपात अचलपूर मतदारसंघ एकनाथ शिंदे यांना कडू यांच्यासाठी राखीव ठेवता आला नाही. परिणामस्वरूप कडू यांनी स्वतंत्र चूल मांडली. प्रहारच्या झेंड्याखाली तिसरी आघाडी स्थापन करून ते स्वत: अचलपुरात उभे राहिले आणि अनेक मतदारसंघात त्यांनी उमेदवारही उभे केले. तेही आणि त्यांचे उमेदवारही पडले. तेव्हापासून त्यांनी आपल्या पूर्वीच्या धोरणानुसार संघर्षाची धार तीव्र केली. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार शेतकरी कर्जमाफी केली जाईल, हे वारंवार सरकारने सांगितल्यावरही बच्चू कडू यांनी ती आताच करा, असा हट्ट करीत आंदोलन केले. या आंदोलनासाठी त्यांना कोणी प्रवृत्त केले, याची चर्चाही तेव्हा खूपच रंगली. कर्जमाफीचे श्रेय ते शिंदे आणि स्वत:कडेच ठेवतात, हे महत्त्वाचे!

बच्चू यांचा राजकीय डीएनए सामान्य नागरिकांच्या नेत्याचा आहे. पण, तो बदलविण्याचा प्रयत्न ते सातत्याने करीत आहेत. राजकारणात कमी बोलणे फायद्याचे आणि जास्त बोलणे नेहमी अडचणीचे ठरत असते. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, गोरगरीब, वंचित हे त्यांचे जिव्हाळ्याचे शब्द आहेत. ते या शब्दांचा आधार घेऊन जेव्हा मोठे तत्त्वज्ञान सांगतात, तेव्हा त्यांना त्यांनी मारलेल्या राजकीय कोलांटउड्यांचा विसर पडतो. मुळात बच्चू हे स्वयंभू नेते असले तरी मर्यादा असतातच; वाटेल तसे कुठेही बोलण्याची सवय त्यांना आमदार प्रवीण तायडे व त्यांच्या बंधूंनी समोर आणलेल्या 'क्लिप'मध्ये अडकवून गेली. माझ्यावर जनतेनेच नेत्यांकडे जाण्याची वेळ आणली आणि निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीमुळेच मला शिंदेंच्या शिवसेनेत जावे लागल्याचे ते छाती ठोकून सांगतात. बच्चू शिवसेनेत गेल्याने आपले मूळ अस्तित्व गमावून बसतील, याची पूर्ण शाश्वती त्यांच्या चाहत्यांना आहे. त्यांची ही भीती रास्त आहे. आता कितीही म्हटले तरी बच्चू यांना पूर्वी सारखे उठसूट कोणत्याही विषयावर बोलण्याचे स्वातंत्र्य राहणार नाही. राज्यात सत्तेत असलेल्या शिवसेनेचे ते आमदार होणार आहे. बोलताना त्यांना परवानगी घेऊनच बोलावे लागेल. सवयी प्रमाणे त्यांना बोलण्याचा मोह आवरता आला नाही तर एकनाथ शिंदे यांची निश्चितच अडचण होईल. बच्चू यांनी शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्धार बोलून दाखविला आहे. त्यासाठी विदर्भात शिवसेनेचे संघटन मजबूत करावे लागेल. याच उद्देशाने त्यांना घेण्यात आल्याचे सांगण्यात येते. तो उद्देश कितपत यशस्वी होईल, हे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, राज्यमंत्री संजय राठोड, आशिष जयस्वाल तसेच आनंदराव अडसूळ, अभिजित अडसूळ, जगदीश गुप्ता, ज्ञानेश्वर धाने पाटील, प्रीती बंड यांच्यासह राज्यातले व विदर्भातले अन्य नेते, प्रमुख कार्यकर्ते वेळ आल्यावर सांगणारच आहे. विदर्भच काय अमरावती जिल्हा भाजपावरही त्यांच्या शिवसेना प्रवेशाचा परिणाम होणार नाही; झालाच तर तो अचलपूरपर्यंत मर्यादित राहील.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# सप्त ऋषी

**प्रा. दिलीप जोशी**

सप्त मालिकेत आज आपण सप्त ऋषी संदर्भात चर्चा करू. सप्तर्षी हा अनेक पैलू आणि दृष्टीने, कालानुरूप आणि ऋषी अधिकारानुरूप अभ्यासण्याचा विषय आहे. ऋषयो मंत्रद्रष्टारः! ऋषी मंत्रद्रष्टे होते. त्यांना दिव्यशक्ती प्राप्त असे. स्वयं भगवान शिवांनी त्यांना योगशास्त्र ज्ञान दिलेले असल्याने ते द्रष्टे म्हणून सर्वज्ञात आहेत. जोतिष, आयुर्वेद, विविध शास्त्र, नीतिशास्त्र, ज्ञानविज्ञान, शस्त्र-अस्त्र यांचा त्यांना अभ्यास असे. वेदानुसार-

भद्रं इच्छन्त ऋषयः स्वर्विदः, तपो दीक्षां उपनिशेदुरग्रे ।
ततो राष्ट्रं बलम् ओजश्च जातम्, तदस्मै देवा उप संनमन्तु ॥


ऋषींच्या तपोबलानेच राष्ट्र बलसंपन्न होते. त्यात सप्तर्षी म्हणजे ब्रह्मदेवाचे मानसिक पुत्र म्हणून सप्त ऋषींचे स्थान आहे. बृहदारण्यक उपनिषदात सात ऋषी म्हणजे समाजपुरुषाचे ज्ञानेंद्रिये आहेत. ज्यात दोन कान म्हणजे गौतम आणि भारद्वाज ऋषी, डोळे विश्वामित्र आणि जमदग्नी ऋषी, नाकपुड्या वशिष्ठ आणि कश्यप ऋषी तर जीभ अत्री ऋषी आहेत.

अधिकारानुसार ऋषींचे सात प्रकार सांगितले आहेत. १) वशिष्ठादी ऋषी म्हणजे ब्रह्मर्षी, २) नारदादी ऋषी देवर्षी, ३) वाल्मीकादी ऋषी महर्षी, ४) विश्वामित्रादी ऋषी राजर्षी, ५) भेलादी ऋषी परमर्षी, ६) जेमिनी आदि ऋषी काण्डर्षी, ७) सुश्रुतादी ऋषी श्रुतर्षी. असा त्यांचा अधिकार असे. कालानुरूप प्रत्येक मन्वंतरानुसार सप्त ऋषी वेगवेगळे आहेत. सर्वांत प्रथम स्वायंभुव मन्वंतर त्यावेळी सप्तर्षीमध्ये पुलस्त्य, पूलह, क्रतु, मरीची, अंगिरस, अत्री आणि वशिष्ठ हे ऋषी होते. त्यानंतर स्वरोचिष मन्वंतर, उत्तम मन्वंतर, तमस मन्वंतर, रैवत मन्वंतर, चाक्षूष मन्वंतरे झालीत. त्यांचेही मन्वंतरानुसार सप्तर्षी होते. आता पुढे सावर्णि, दक्षसावर्णि, धर्म सावर्णि, ब्रह्म सावर्णि, रुद्र सावर्णि, देव सावर्णि, इंद्र सावर्णि ही मन्वंतरे येणार आहेत. या प्रत्येक मन्वंतरात वेगवेगळे सप्तर्षी राहतील.

सध्या वैवस्वत मन्वंतर सुरू आहे. जे वैवस्वती सप्तर्षी आहेत ते म्हणजे कश्यप ऋषी, अत्री ऋषी, वशिष्ठ ऋषी, विश्वामित्र ऋषी, गौतम ऋषी, जमदग्नी ऋषी, भारद्वाज ऋषी आहेत. आकाशात नभोमंडळीय सप्तर्षींच्या तारका रोज आपण पाहतो.

**कश्यप ऋषी :** ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असलेले कश्यप ऋषी जीवसृष्टीचे मूळ पुरुष म्हणजे आद्य जनक मानले जातात. ज्यांचे गोत्र म्हणजे मूळ पुरुष माहीत नाही, त्यांचे गोत्र कश्यप समजावे. लौकिकार्थाने कश्यप ऋषी मरीची ऋषी आणि कर्दम ऋषींची कन्या कला यांचे पुत्र. कश्यपांचा विवाह प्रजापती दक्ष यांच्या तेरा कन्यांशी झाला. त्यांच्यापासून देव, दानव, नाग, मनुष्य इत्यादी कुळे निर्माण झालीत. कश्यप ऋषींनी सरोवर स्वरूप असलेल्या भूभागाला सपाट करून वसवलेला भूभाग म्हणजे काश्मीर. काश्मीरचे निर्माते कश्यप ऋषी सप्त ऋषीतील एक आहेत. सप्तर्षीतील दुसरे ऋषी म्हणजे अत्री ऋषी. सत्व, रज, तम या तीन गुणत्रयांतीत असलेले अत्री ऋषी आणि त्यांची पत्नी अनसूया साक्षात दत्तात्रेयाचे माता-पिता आहेत. सप्तर्षीमधील पुढील ऋषी म्हणजे वशिष्ठ आहेत. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असलेले वशिष्ठ मित्र आणि वरुण यांच्या सिद्धीतून जन्माला आले म्हणून त्यांना मैत्रावरुण म्हणतात. वशिष्ठ हा शब्द वसू शब्दाचा तमभाव आहे. वसू म्हणजे संपन्न. वशिष्ठ ऋषी ऐश्वर्यसंपन्न होते, कारण त्यांच्याजवळ नंदिनी नावाची कामधेनू होती. ते ज्ञानसंपन्न होते. त्यांची धर्मसूत्रे, वशिष्ठ कल्प, योग वशिष्ठ ही ज्ञानसंपदा प्रसिद्ध आहे. त्यांची पत्नी अरुंधती देखील पतिव्रता स्त्री होती. वशिष्ठ ऋषी रघुवंशाचे कुलगुरू होते. प्रात:स्मरणीय असलेले वशिष्ठ ऋषी सप्तर्षीतील एक आहेत. पुढील ऋषी आहेत ऋषी विश्वामित्र. प्रचंड तेजस्वी, महाप्रतापी विश्वामित्र हे पूर्वाश्रमीचे गाधी यांचे पुत्र राजा कौशिक होते. आपल्या तप:सामर्थ्याने ते ऋषी झालेत. राजा कौशिक यांचा वशिष्ठ ऋषींच्या आश्रमातील नंदिनी नावाची कामधेनू बळकावण्याचा प्रयत्न असफल झाल्यावर राजा कौशिकांना समजले की आत्मिक बळ महत्त्वाचे म्हणून त्यांनी भगवान शिवाची आराधना केली आणि राजा कौशिक पुढे ऋषी विश्वामित्र झालेत.

गायत्री मंत्राचे उद्गाते विश्वामित्र ऋषी असून भगवान रामचंद्रांना अस्त्र आणि शस्त्र विद्या त्यांनीच दिली आहे. त्रिशंकूच्या निमित्ताने प्रतिसृष्टी निर्माण करणारे विश्वामित्र ऋषीच आहेत. पुढील ऋषी आहेत गौतम ऋषी. अंगिरस वंशातील अंध असलेल्या दीर्घतमस ऋषींचे ते पुत्र. गाईच्या सेवेमुळे ऋषी अंधतमस यांना डोळे आले आणि त्यांच्या जीवनातील तमस म्हणजे अंधार नाहीसा झाला म्हणून त्यांनी पुत्राचे नाव गौतम ठेवले. चुकून झालेले गोहत्येचे पातक दूर करण्यासाठी त्यांनी त्र्यंबक क्षेत्री तपश्चर्या करून साक्षात गंगा गोदावरीच्या रूपाने ब्रह्मगिरी त्र्यंबकेश्वर येथे आणली. गोदावरी दक्षिण गंगा गौतमी म्हणूनही ओळखली जाते. गोदावरी गंगेला त्यांनी कुश नावाच्या गवताने



बंदिस्त केलेल्या एका कुंडात आणले तेच कुंड आता कुशावर्त तीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांच्या पत्नीचे नाव अहिल्या होते. त्यांच्या शापामुळे ती शिळा बनली होती. भगवान रामचंद्रांच्या स्पर्शाने ती शिळा मुक्त झाल्याची कथा सर्वांना माहीत आहे. अहिल्या शिळा राघवे मुक्त केली, पदी लागता दिव्य होवोनी गेली. सप्तर्षीतील पुढील ऋषी आहेत जमदग्नी ऋषी. जमदग्नी ऋषींचे नाव सर्वांनाच माहीत आहे. एखादा क्रोधी मनुष्य असेल तर त्याला आपण जमदग्नीचा अवतार म्हणतो. ऋषी जमदग्नी भृगु वंशात जन्माला आलेले. भृगूंचा लत्थाप्रहार खुद्द भगवंतांना सहन करावा लागला होता. ऋषी ऋचिक यांचे पुत्र असलेले जमदग्नी गोरक्षेचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या पत्नीचे नाव रेणुका. माहूरगडावरील रेणुकामाता याच आहेत. भगवान परशुराम जमदग्नी आणि रेणुका यांचे पुत्र. जमदग्नी ऋषींच्या आश्रमात कामधेनू होती. कार्तवीर्य अर्जुनाने याच कामधेनूसाठी जमदग्नी ऋषींशी संघर्ष केला आणि बेसावध असताना जमदग्नीचा वध केला. त्यामुळेच भगवान परशुरामांनी कार्तवीर्य अर्जुन आणि त्यांच्या पुत्रांचा वध तर केलाच; शिवाय तब्बल २१ वेळा पृथ्वीवरील दुष्ट राजांचा नि:पात केला.

यातील पुढील ऋषी ऋषी विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालणारे प्रथम द्रष्टे ऋषी आहेत. वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ, आयुर्वेद, चिकित्साशास्त्र, धनुर्वेद, अर्थशास्त्र, राजनीतिशास्त्र, विमानविद्या अशा अनेक विषयांचे ते तज्ज्ञ होते. ज्या प्रसंगातून वाल्मीकि रामायण लिहिले गेले त्या क्रौंच पक्ष्याचा प्रसंग महर्षी वाल्मीकिंच्या जीवनात घडला तेव्हा भारद्वाज त्यांच्या सोबत शिष्य म्हणून होते. भारद्वाजांचा आश्रम प्रयाग येथे त्रिवेणी संगमावर होता. वनवासात जाताना भगवान राम त्यांच्या आश्रमात थांबले होते. ऋग्वेदाचे सहावे मंडल ऋषी भारद्वाज यांच्या नावे आहे. भारद्वाज शिक्षा, भारद्वाज श्रौतसूत्र त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. ब्रह्मदेव, बृहस्पती, इंद्र यांच्यानंतरचे चौथे वैय्याकरणी म्हणून भारद्वाज आहेत.

हिंदू धर्मग्रंथात सप्तर्षींचे स्थान अनन्यसाधारण असून आपण सर्व याच सप्त ऋषींपैकी एकाचे वंशज गोत्रज आहोत. सध्याच्या वैवस्वत मन्वंतरातील सप्तर्षींचा परिचय सर्वांना व्हावा म्हणून हा प्रामाणिक प्रपंच.

९८२२२६२७३५

# पश्चिम बंगालमध्ये लोकशाहीचा विजय

नुकत्याच झालेल्या पाच राज्यातील निवडणुकांचा निकाल जाहीर झाला. पश्चिम बंगाल, आसाम, पुडुचेरी या तीन राज्यांत विजय मिळवून भाजपाने आपला वरचष्मा पुन्हा एकदा सिद्ध करून भगवा फडकावला. यामागे अनेक कारणे आहेत. आज हा विजय साजरा करताना डोळ्यांसमोर उभे राहतात ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी! ज्यांनी बंगालच्या अखंडतेसाठी प्राणांची आहुती दिली. त्यांच्याच कार्याचे, समर्पणाचे, त्यागाचे फळ आणि सत्तांतराचे संकेत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला धक्का देत भाजपाच्या भगवामय विजयाने मिळाले. या राज्यात डॉ. हेडगेवारांचे वैद्यकीय शिक्षण झाले होते. कितीतरी दशकापासून समर्पित कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना, परिश्रमानंतर मिळालेला विजय हा या महान विभूतींना आदरांजली असेल. भारत एक विकसित राष्ट्र बनण्याच्या दृष्टीने प्रगतीवर आहे. बंगालमधील निवडणूक प्रचारादरम्यान झारग्राम येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रस्त्यावरील एका दुकानात थांबून चटपटीत झालमुडी खाल्ल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. एका सामान्य झालमुडी विक्रेत्यासोबत देशाच्या पंतप्रधानांनी संवाद साधणे ही असामान्य घटना बंगालच्या मतदारांना भावली.

१९०५ मध्ये भारताचा पूर्व बंगाल वेगळा झाला, त्या भूमीचा आवाज पुनश्च पश्चिम बंगालमध्ये एकत्र येण्यासाठी दुर्गा पूजेच्या निमित्ताने ऐकू येईल. बंगालमधील हा विजय म्हणजे केवळ एका निवडणुकीचा निकाल नाही, तर गेल्या कित्येक दशकांपासून भारतमातेच्या सेवेसाठी आपले तन-मन-धन समर्पित करणाऱ्या हजारो स्वयंसेवकांच्या रक्ताने आणि घामाने लिहिलेला देदीप्यमान इतिहास आहे. बंगालच्या सुजाण जनतेने ममता दीदींच्या ज्या सत्तांध कार्यशैलीला नाकारले, त्यामागे अनेक संतापजनक कारणे होती. एका बाजूला ढोंगी धर्मनिरपेक्षता आणि दुसऱ्या बाजूला प्रखर हिंदुद्वेष अशा कात्रीत बंगाल अडकला होता. ममता बॅनर्जी यांची अरेरावी आणि आक्रस्ताळी वृत्ती मोडीत काढणे देशहितासाठी अनिवार्य झाले होते. राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाच्या राज्यातील भारतीय जनता पक्षाचा अभूतपूर्व

## वाचक पत्रे

विजय हा एका राजकीय पक्षाचा, त्याच्या शीर्षस्थ नेतृत्वाचाच विजय म्हणता येणार नाही तर संपूर्ण भारत राष्ट्राचा विजय आहे. यावरून लक्षात येते की, चांगले सरकार निवडून येण्यासाठी देशाचे मतदार जागृत असणे गरजेचे आहे. पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात आजचा दिवस एक महत्त्वाचा टप्पा म्हणून नोंदविला जाईल. कारण पश्चिम बंगालच्या राजकारणात महापरिवर्तनाचे वारे आता वाहिले असून निकालांनी नवा इतिहास घडवला आहे. २०२६ ची निवडणूक ही बंगालच्या सामाजिक सुरक्षिततेची आणि प्रशासकीय पारदर्शकतेची खरी परीक्षा ठरली आहे. संपूर्ण देशाचे लक्ष बंगालच्या निवडणुकीकडे होते. ममता दीदींची ११ वर्षांची कारकीर्द उलटून पाडणे सोपी नव्हते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मुसद्दीपणा, अमित शाहांचे १५ दिवस बंगालला वास्तव्य, स्वयंसेवकांचे कष्ट, अनेक लोकांचे सहकार्य यामुळे हे यश लाभले तसेच बंगालच्या जनतेने लोकशाहीच्या ताकदीवर या अन्यायाचा पाढा वाचला आहे. हा विजय बंगालच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरेल. अराजकता संपवून सुशासनाची पहाट घडवून आणणाऱ्या बंगालच्या क्रांतिकारी जनतेचे मनःपूर्वक अभिनंदन!

**अमोल राजपूत**/पुणे

**(याच विषयावर अनेक वाचकांची पत्रे मिळाली असून त्यात संजय श्रौती, डॉ. मदन मनोहरराव काकडे, वंदना नवघरे, अमोल तपासे, रवी वाघमारे, शशिकांत पांडे, वीरेंद्र सोनवणे, अविनाश देशपांडे, श्याम ठाणेदार, निर्मला गांधी, प्रा. श्रीकांत पांडे, श्रीकांत काशीकर आदींचा समावेश आहे.)**

### वीटभट्टी कामगारांची अग्निपरीक्षा!

पारा ४४ अंशांवर, १० ते १२ तास सलग काम; मूलभूत सुविधांचाही अभाव; आरोग्याचा प्रश्न गंभीर. वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या महिला कामगारांची स्थिती गंभीर बनली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या स्थलांतरित कामगारांपर्यंत शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे पोहोचत नसल्याने त्यांच्या आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि उपजीविकेच्या समस्या अधिकच तीव्र होत आहेत. वीटभट्ट्यांवरील महिलांचा दिवस पहाटे ३ ते ४ वाजता सुरू होतो. माती तुडवणे, विटांचे साचे तयार करणे, ओल्या विटा चाळत घालणे आणि वाळलेल्या विटा भट्टीत रचणे अशी कष्टाची कामे त्यांना सलग १० ते १२ तास करावी लागतात. सलग वाकून काम करणे, डोक्यावरून विटांचे ओझे वाहणे आणि चूल-धुराच्या संपर्कामुळे महिलांना पाठदुखी, कंबरदुखी, त्वचारोग तसेच श्वसनाचे विकार उद्भवत आहेत. बहुतांश ठिकाणी स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि सुरक्षित निवासाची सुविधा नसते. विशेषतः गर्भवती महिलांनाही शेवटपर्यंत जड काम करावे लागत असल्याची बाब चिंताजनक आहे. भट्टीतून निघणारा धूर व धूळ श्वसनमार्गात गेल्याने दम्याचे व इतर फुफ्फुसांचे आजार वाढत आहेत. मात्र वेळेवर वैद्यकीय सुविधा न मिळाल्याने या समस्या अधिकच गंभीर बनत आहेत.

**नितीन दुर्बुडे**/पथ्रोट, ९५०३६४८६३०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. खवटे यांची निवड



**दौंड, दि. ५ मे-**


राज्यस्तरीय पाचव्या भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. रोहन खवटे यांची निवड करण्यात आली आहे. हे साहित्य संमेलन दौंड तालुक्यातील केडगाव (चौफुला) येथे २३ व २४ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली. अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान यांच्या वतीने या संमेलनाचे आयोजन केले आहे. दौंड तालुक्यातील डॉ. खवटे हे प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ आहेत. त्यांनी आजपर्यंत सुमारे ५० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या आहेत. विविध आरोग्य शिबिरांद्वारे त्यांनी अनेकांना मार्गदर्शन व उपचार दिले आहेत. तसेच शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान असून युवकांना मार्गदर्शन करून समाज सशक्त करण्याचे कार्य ते करीत आहेत. दौंड तालुक्याच्या इतिहासात दहावीच्या बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणारा पहिला विद्यार्थी, पुणे जिल्ह्यात दुसरा व राज्यात १९वा क्रमांक त्यांनी पटकवला होता. याशिवाय ते मॅरेथॉन स्पर्धांमध्येही सक्रिय असून लडाख, दिल्ली, मुंबई, पुणे, सातारा व दुबई येथे झालेल्या स्पर्धांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. २५० पेक्षा जास्त राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये सहभागी होणारे पुणे जिल्ह्यातील ते एकमेव आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ मध्ये २०११ ते २०१३ या तीन वर्षासाठी भारत, न्यूझीलंड, श्रीलिंका, कॅनडा या देशांच्या क्रिकेट संघांसाठी त्यांची डॉक्टर म्हणून नियुक्ती झाली होती.

# 'डब्ल्यूआयटी'चे अचूक शेतीसाठी 'स्मार्ट वॉटर मॅनेजमेंट' संशोधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर आणि वाढत्या पाणीटंचाईच्या संकटात शाश्वत शेतीसाठी तंत्रज्ञानाधिष्ठित उपायांची गरज प्रकर्षाने जाणवत असताना येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापकांनी विकसित केलेल्या स्मार्ट वॉटर मॅनेजमेंट सिस्टीम फॉर प्रिसिजन ग्रीकल्चर यूजिंग आयओटी (आयओटी वापरून अचूक शेतीसाठी स्मार्ट जल व्यवस्थापन प्रणाली) या संशोधनाला भारतीय पेटंट कार्यालयाकडून मान्यता मिळाली असून संबंधित पेटंट प्रकाशित झाले आहे.

या यशामुळे संस्थेच्या संशोधन क्षमतेचा ठसा राष्ट्रीय स्तरावर उमटला आहे. या संशोनात प्रा. डॉ. प्रतिभा याळगी, डॉ. रश्मी दीक्षित, श्री. विश्वनाथ चव्हाण, प्रा. महेश महंत, डॉ. दर्शन पंडित, प्रा. निखिल गज्जम, प्रा. शरणबसवा रेड्डी, प्रा. महेश पाटील यांचा सहभाग आहे. त्यांचे वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, वैभव गांधी आणि पराग शहा यांनी या यशाबद्दल संबंधित प्राध्यापकांचे अभिनंदन केले.




**काय आहे ही प्रणाली**

ही प्रणाली इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून, शेतीतील पाण्याच्या वापराचे अचूक नियोजन करण्यासाठी ती सक्षम आहे. पारंपरिक सिंचन पद्धतींमध्ये पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे अनेक अभ्यासांतून समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर विकसित करण्यात आलेली ही प्रणाली मातीतील आर्द्रता, तापमान, हवामानातील बदल, तसेच पिकांच्या विशिष्ट गरजांचा सखोल अभ्यास करून स्वयंचलित पाणीपुरवठा नियंत्रित करते. सेन्सर्स आणि डेटा ॲपनालिटिक्सच्या साहाय्याने ती वास्तविक वेळेत (real-time) निर्णय घेते, ज्यामुळे केवळ आवश्यक तेवढेच पाणी पिकांना दिले जाते.

## पाण्याची लक्षणीय बचत व उत्पादनक्षमतेत वाढ

या तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे पाण्याची लक्षणीय बचत आणि उत्पादनक्षमता वाढ. पाण्याचा सुयोग्य वापर केल्यामुळे मातीची गुणवत्ता टिकून राहते, तसेच पिकांची वाढ अधिक निरोगी व संतुलित होते. परिणामी, शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. विशेषतः दुष्काळग्रस्त आणि पाणीटंचाई असलेल्या भागांसाठी ही प्रणाली एक प्रभावी उपाय ठरू शकते.

तज्ज्ञांच्या मते, अचूक शेती (Precision griculture) ही भविष्यातील शेतीची दिशा असून, त्यासाठी अशा स्मार्ट प्रणाली अत्यंत आवश्यक आहेत. खेढ आधारित उपाययोजनांमुळे शेती अधिक डेटा-आधारित, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक बनत आहे. या संशोधनामुळे स्थानिक पातळीवर विकसित तंत्रज्ञान जागतिक आव्हानांना उत्तर देण्यास सक्षम ठरत असल्याचे अधोरेखित होते.

# अंगारकी चतुर्थीनिमित्त श्रीस १०१ डझन आंब्याची आरस

सोलापूर, दि. ४ मे -

बाळीवेस येथील श्री सिद्धेश्वर तालीम प्रा. भ. मंडळ उत्तर कसबा सोलापूर येथे अंगारकी चतुर्थीनिमित्त श्रीस १०१ डझन आंब्यांची आरास करण्यात आली.

यावेळी राजशेखर हिरेहब्बू, सुधीर थोबडे, प्रकाश वाले, जगदीश हिरेहब्बू , मंडळाचे उत्सव अध्यक्ष सिद्धेश्वर नावडे, सागर हिरेहब्बू, योगेश कल्लूरकर, सूरज हिरेहब्बू, प्रकाश मैंदर्गी, निखिल थोबडे, चेन्नई अब्बू, सचिन साखरे , प्रथमेश हिरेहब्बू, नागेश कलुरकर, प्रशांत हब्बू, सागर पंडित, ओंकार हिरेहब्बू, चंदन पाचपुरे, सर्वेश हिरेहब्बू, यश हिरेहब्बू, ओंकार काबणे, संजीत साखरे उपस्थित होते. सिद्धेश्वर तालीम महिला मंडळाच्या हस्ते आरती केली.

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील प्लॉट जागा याचा गट नं. ६३१/२ यापैकी प्लॉट नं. ६० व ६१ याचे एकुण क्षेत्रफळ ३००.०० चौ.मी. याचे मोजमापे पुर्व बाजु २०.०० मी, दक्षिण बाजु १५.०० मी, पश्चिम बाजु मीटर २०.००, उत्तर बाजु मीटर १५.०० आहे. यासी चतुःसिमा पुर्वेस - ९ मी रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ५९, पश्चिमेस - यमदे यांची प्लॉट जमिन, व उत्तरेस - प्लॉट नं. ६२ आहे, सदर प्लॉटचे पाणी वागणूक पुर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक खुली प्लॉट जागा आतील सर्व तदंभूत वस्तुसह.

सदर नमूद मिळकत ही नलिनी सोमनाथ देशमुखे यांचे स्वकष्टाजित स्वतंत्र खरेदी मालकीची असुन त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस म्हणुन सौ. राजश्री राजशेखर महाजन, राजकुमार सोमनाथ देशमुखे, प्रविण सोमनाथ देशमुखे व अरविंद सोमनाथ देशमुखे यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदर मिळकत त्यांनी त्यांचे कौटूंबिक व कायदेशीर अडचणीकरीता व इतर कायदेशीर गरजेकरीता विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर मिळकतीबाबत आमचे दोन्ही अशिलांसोबत सदर मिळकतीचे मालकांनी व्यवहार केलेला आहे व सदर व्यवहारापोटी इसारादाखल रक्कमही स्विकारलेली आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही अधिकार, हक्क, म्हणजे इसारपावती, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही हक्क असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात १५ दिवसात लेखी हरकत नोंदवावी. सबळ कागदोपत्री पुराव्याशिवाय हरकत आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदी करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ०५/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. शंकर पांडुरंग ननवरे,**
**ऑफिस पत्ताः - डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर, गाळा नं. ५०, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर मो. नं. ८१४९०६०००८**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

## मध्य रेल्वे

**सोलापुर मंडळ**
**सूचना बोर्ड कार्य**

निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-08 दिनांक: 04.05.2026 भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, (S & T) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर याद्वारे सक्षम आणि नामांकित कंत्राटदार संस्थांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागविण्यात येत आहेत: कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध स्थानकांवर गर्दी नियंत्रणासाठी अनाउन्समेंट सिस्टमसह (घोषणा प्रणाली) पॅसेंजर इन्फॉर्मेशन डिस्प्ले बोर्डची (प्रवासी माहिती फलक) तरतूद करणे. निविदा क्र.: SUR-N-T-2026-27-08 कामाची अंदाजित किंमत: 2,13,25,776.33 निविदा अर्जाचे शुल्क: काहीही नाही बयाणा रक्कम : 4,26,500.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 29.05.2026 रोजी दुपारी १५.३० वाजेपर्यंत (www.ireps.gov.in वर). याबाबतचा सविस्तर तपशील वेबसाइटवर उपलब्ध आहे. जर काही सुधारणा किंवा दुरुस्ती असल्यास, ती केवळ वरील ई-प्रोक्युमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. केवळ ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल, पोस्ट, ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांनी कंपनीच्या नावाने प्राप्त करून त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारली जाईल. मूळ बँक गॅरंटीची प्रत निविदा सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जमा करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**मं.रे.प्र.(नि.), सोलापुर**

रेल्वे क्रॉसिंग बंद असताना ते ओलांडण्यास मनाई आहे. 14

## जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु. पल. हद्दीतील गट नं. ११९९/५/१/११९९/६ या पैकी प्लॉट नं. ९ याचे क्षेत्र २८१.२७ चौ. मी. यासी चतुःसिमा पुर्वेस - प्लॉट नं. १६, दक्षिणेस - १८. रुंदीचा रोड, पश्चिमेस - गट नं. ११९९/६ पैकी उर्वरित जागा व उत्तरेस - प्लॉट नं ४,५ मिळकत रहिवास विभागलेली आहे येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील तदंभुत वस्तुहक्कासह वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्री. भूषण राजेश जगताप व जमीनदार सुमन राजेश जगताप रा. बार्शी, ता. बार्शी याचे खरेदी मालकी कब्जे वहीवाटीची आहे. श्री भूषण राजेश जगताप यांनी व्यवसायातील खेळत्या भांडवलासाठी आमचे अशिल सांगली अर्बन को- ऑप. बँक लि. सांगली, शाखा - बार्शी या बँकेकडे कर्जाची मागणी केली व त्यांना १५,००,०००/- चे कर्ज मंजूर केले आहे. वर नमूद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित असलेला निर्वाळा विद्यमान मालक कर्जदार श्री. भूषण राजेश जगताप. व जमीनदार सौ. सुमन राजेश जगताप यांनी दिलेला आहे. सदर कर्जास वर नमूद मिळकत ही कर्जदार व जमीनदार म्हणुन गहाणखत करुन श्री. भूषण राजेश जगताप व जमीनदार सौ. सुमन राजेश जगताप यांनी घेतलेल्या कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

सबब वर नमूद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, साठेखत खरेदीखत, कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासुन आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली आहे ता. ०५/०५/२०२६.

**सही/-**
**श्री. प्रसाद जा. कुलकर्णी**
**ॲडव्होकेट, बार्शी**
**पॅनल ॲडव्होकेट**
**सिद्धेश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी**

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**दि. वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. परळी वैजनाथ शाखा सोलापूर --अर्जदार**
**- विरुद्ध -**
**(खालील तपशिलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) -- जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १८७/२०२५-२६ | ५६,२२२/- | १ | **प्रिती रूपेश उपाध्ये** रा. श्रध्दा इलिगन्स, ब्रम्हपुरी सोसायटी, बाळे, सोलापूर |
| | | | २ | **रूपेश कमलकिशोर उपाध्ये** रा. श्रध्दा इलिगन्स, ब्रम्हपुरी सोसायटी, बाळे, सोलापूर |
| २ | १८८/२०२५-२६ | ४२,७७६/- | १ | **मल्लिनाथ सिध्दाराम याळगी** रा. घ क्रं. ७५ सदिच्छा नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | २ | **रामा सिध्देश्वर वंजारे** रा. हनुमान मंदिर जवळ, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | ३ | **ज्योती मल्लिनाथ याळगी** रा. घ क्रं. ७५ सदिच्छा नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ३ | १८९/२०२५-२६ | ८२,८८४/- | १ | **सुरज लक्ष्मण खडाखडे** रा. कोळी गल्ली, मु. पो. वांगी, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. १९/०५/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर राहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०४/०५/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का


**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को. ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**



# सिध्देश्वर मॉन्टेसरी स्कूलचे रंगोत्सव स्पर्धेमध्ये यश

**सोलापूर, दि. ५ मे-**

सिध्देश्वर मॉन्टेसरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेत ५५ पारितोषिके मिळविली. साक्षी बुद्नवार हिने यात प्रथम क्रमांक मिळवत मिनी प्रोजेक्टरचे पारितोषिक मिळविले. तसेच १७ विद्यार्थ्यांनी सन्मानचिन्ह व ३० मुलांना पदके तर ६ विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके मिळवली. त्यांना कलाशिक्षिका तेजस्विनी भुर्के यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, सदस्य विलास कारभारी, भीमाशंकर पटणे, ॲड. रेवणसिध्द पाटील, गुरुराज माळगे, राजशेखर येळीकर, पशुपतिनाथ माशाळ, प्रभूराज मैंदर्गीकर, संतोष पाटील, मुख्याध्यापिका उमा बागलकोटी, गीतांजली आलमेलकर यांनी अभिनंदन केले.



# डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**सोलापूर, दि. ५ मे-**

डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूल व डॉ. आंबेडकर मेमोरियल नाईट हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र दिन व कामगार दिन, बुध्द पौर्णिमा साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष भागवत सरवदे होते. तसेच संस्थेचे सचिव प्रविण निकाळजे, विश्वस्त शशिकांत कांबळे, मुख्याध्यापक सतीश शिंदे यावेळी व्यासपीठावर होते. भागवत सरवदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुध्द यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक सतीश शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष चित्रा धाराशिवकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन दीपक माने, विश्वनाथ कुलकर्णी यांनी केले तर आभार सुशील जानराव यांनी मानले.

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 140451429 | मालमत्तेवर कर्ज | 1. असीम रज्जाक मुलानी 2. रज्जाक सय्यद मुलानी 3. तसीम असीम मुलानी | 11/02/2026 | INR 3,91,341.45/- |

**मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत क्र. १२ चा संपूर्ण भूखंड, क्षेत्रफळ ६३२ चौरस फूट, गावः भालवणी, जिल्हा परिषद सोलापूर, तालुकाः करमाळा, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३२०२, आणि सीमाः पूर्वः त्र्यंबक पोल, भिंतः रस्ता, उत्तरः शाळा, दक्षिणः कासेम मुलानी

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 143384568 | मालमत्तेवर कर्ज | 1. दिगंबर लक्ष्मण खरात 2. राणी लक्ष्मण खरात 3. लक्ष्मण अर्जुन खरात | 04/02/2026 | INR 7,74,535.79/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्र. ६२/२ ची संपूर्ण जमीन, क्षेत्रफळ २००० चौ. एफ.एल. म्हणजेच १८५.८७ चौ. मी., गावः ढोकरी, पोस्टः वांगी-१, जिल्हा परिषद सोलापूर, तालुकाः करमाळा, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२०२, आणि सीमाः पूर्वः भागवत खरात यांची मालमत्ता, पश्चिमः रस्ता, उत्तरः रामदास साळगेर यांची मालमत्ता, दक्षिणः अभियम खराल यांची मालमत्ता

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 126715025 | ग्रामीण लॅप | 1. इरशाद इन्नुस शेख 2. युनूस शेरापुद्दीन शेख 3. कैरुन इन्नूस शेख 4. इरशाद इन्नुस शेख/ इन्नुस शेख 5. युनूस शेरापुद्दीन शेख/ शेरापुद्दीन शेख 6. कैरुन इन्नूस शेख/ इन्नूस शेख | 27/01/2026 | INR 4,44,085.62/- |

**मालमत्तेचा पत्ता :** घर क्रमांक १३२ (बी) नवीन आणि १३२ (ए)/१ जुने, आकार ४५ × १५ फूट, एकूण क्षेत्रफळ ८७५ चौ. फूट, जी.पी. श्रीदेविची माल ते कर्मळा, जि. सोलापूर, महाराष्ट्र-४१३२०३ येथे स्थित, आणि सीमाः उत्तरः मजीद शेप्पा, दक्षिणः इंटेल शेख, पूर्वः रस्ता, वजीरः श्रीराम फल्लाळे

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 126699542 | मालमत्तेवर कर्ज | 1. मंगेश दिलीप मगर 2. जानबी मंगेश मगर | 27/01/2026 | INR 5,05,873.59/- |

**मालमत्तेचा पत्ता :** जेऊर तालुका, करमाळा जिल्हा, सोलापूर, महाराष्ट्र-४१३२०२ येथे स्थित, श्री. मंगेश दिलीप मगर यांच्या मालकीची आणि ताब्यात असलेली, जी.पी. घर क्रमांक १२८८, नवीन व जुने घर क्रमांक ९७३, सर्व्हे क्रमांक २२९, प्लॉट क्रमांक ५४, एकूण ३३३३ क्षेत्रफळाची १०८९ चौरस फूट मालमत्ता. ह्या जागेच्या सीमाः उत्तरः रस्ता, दक्षिणः सुभद्रा होणमाणे, पूर्वः गव्हाणे, पश्चिमः अर्जुन गॅलोवड

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 5 | 165609333 | मालमत्तेवर कर्ज | 1. रवींद्र विश्वनाथ काशीद 2. पूजा रवींद्र काशीद | 17/04/2026 | INR 19,68,108.13/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळ्किकत क्रमांक ५६३ चे सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण ८०० चौ. , मौजे गाव येथे वसलेलेः मुळेगाव, ग्रामपंचायतीच्या हद्दीतः मुळेगाव, तालुकाः दक्षिण सोलापूर, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३००६, आणि सीमाः पूर्वः शकुंतला भारत काशीद मिल्कट क्र. ६०७, पश्चिमः काशिनाथ ज्ञानोबा, दक्षिण आशिया रोड ०६, दक्षिण आशिया रोड एम. शफी मोतीवाला मिल्कट नंबर ८२५

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 138252421 | मालमत्तेवर कर्ज | 1. शहाजी पांडुरंग रासकर 2. पुष्प पांडुरंग रासकर 3. पांडुरंग पंढरीनाथ रासकर | 07/02/2026 | INR 4,42,283.24/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिकात क्रमांक १५३८/पी/३ चे सर्व प्लेका आणि पार्कल, आरस ॲडमेजरिंग ४६२ चौ. . ले. ४२.९३ चौ. मिर्स., गाव येथे स्थितः जेऊर, जि.प. सोलापूरच्या हद्दीत, तालुकाः केरमाळे, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३२०२, आणि सीमाः पूर्वः ग्रामपंचायत रस्ता, पश्चिमः सरलोश नुस्ते, उत्तरः गणपत पिसे, दक्षिणः दत्ता गावडे

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 143396485 | मालमत्तेवर कर्ज | 1. संदीप विलास जाधव 2. विलास साजेराव जाधव 3. रेखा संदीप जाधव | 07/02/2026 | INR 2,16,545.58/- |

**मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत क्र. १२४/५, ए.एल. पो. मांगी, जि. सोलापूर तालुका केरमळे, जिल्हा सोलापूर, बस स्टॉप जवळ, सोलापूर, महाराष्ट्र-४१३२०३, या मालमत्तेचा सर्व भाग. एकूण क्षेत्रफळ २८० चौरस फूट (२६.०० चौरस मीटर). आणि सीमाः उत्तरः लाला जाधव यांची मालमत्ता, दक्षिणः रस्ता, पूर्वः बापू काळे यांची मालमत्ता, पश्चिमः रस्ता.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 06/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

अशी नोटीस देण्यात येते की, या खालील परिशिष्टात जिचे विस्तृत वर्णन करण्यात आले आहे अशा जमिनींच्या तुकड्यांचा ज्यामध्ये समावेश होतो अशा मिळकतींबाबतचे व्यक्ती / संस्थांचे मालकी हक्काधिकार, हितसंबंधांची तपासणी करण्याबाबतच्या सूचना आमचे अशिलांनी आम्हास दिलेल्या आहेत.

यान्वये अशी विनंती करण्यात येत आहे की, केवळ एखादी व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपनी / कंपन्या, बँक /बँका, एक / अनेक वित्तसंस्था, एक / अनेक नॉन-बँकिंग वित्तसंस्था, पेढी / पेढ्या, मर्यादित दायित्वाची भागीदारी / भागीदाऱ्या, नोंदणीकृत असणारी अगर नसणारी एक / अनेक व्यक्तिसमूह किंवा व्यक्तींची एक / अनेक संस्था, एक / अनेक सावकार आणि /अथवा धनको आणि / अथवा प्राधिकरण यांचाच नव्हे, तर त्यांचेसह इतर अमर्याद व्यक्ती / अनेक व्यक्ती, संस्था / अनेक संस्था यांचे, सदरील मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागावर, कोणत्याही प्रकारे किंवा कशाही प्रकारे किंवा कोणत्याही कारणास्तव, विक्री, अदलाबदल, गहाण / गहाणखत (इक्विटेबल किंवा इतर प्रकारे), बोजा, बक्षीस, विश्वस्त म्हणून, तबदील, वारसाहक्क, पोटगी, अभिहस्तांतरण, कुळ, उत्तराधिकार, मृत्युपत्रान्वये मिळावयाचे लाभ, भागीदारी, संयुक्त उपक्रम, विकसन हक्क, रस्तावहिवाटीचे अधिकार, ताबा, विवाद प्रलंबन (लिस पेंडन्स), आरक्षण, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, भाडेपट्ट्याचा परवाना, लिन, भार, हिस्सा, तारण, हायपोथिकेशन क्रेडिट सुविधा, किसान क्रेडिट कार्ड, वहिवाट, सांभाळकर्ता तत्त्वाने, धारणाधिकार, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड किंवा इतर कोणतीही व्यवस्था, जप्ती, कोणत्याही न्यायालयाने, समन्यायिक प्राधिकरणाने, न्यायाधिकरणाने, महसूल आयोग, मंच, निर्णय देणारी प्राधिकरणे किंवा वैधानिक प्राधिकरणाने किंवा लवादाने पारीत केलेली कोणतीही मनाई, स्थगिती किंवा कोणताही हुकूमनामा, आदेश (अंतिम किंवा अंतरिम) न्यायनिर्णय किंवा निवाडा, चिरभोग हक्क किंवा अग्रहक्क किंवा कोणत्याही समजुतीच्या करारनाम्यांतर्गत किंवा कोणताही करार-मदार / करारनामा, विक्रीचा करारनामा, भाडेकरारनामा, कुलमुखत्यारपत्र, प्रदान पत्र, पर्याय, एफ.एस.आय. वापर, टीडीआर / विकसन क्षमता, नकाराचे अधिकार किंवा इतर प्रकारे केलेले संपत्तीव्यवस्थापन, कर्जे, अग्रिम / उचल, कोणत्याही दायित्वाकामी असलेली वचनबद्धता अन्वये अगर वगैरे प्रकारे कोणतेही लाभ, मालकी हक्काधिकार, दावे, हरकती, मागण्या, हिस्सा किंवा हक्काधिकार किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी आम्हास लेखी स्वरूपात त्याबाबतची माहिती कागदोपत्री पुराव्यासह आमच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर म्हणजेच पत्ता: **जेएसए ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स कार्यालयाचा पत्ता: वन लोढा प्लेस, २७ वा मजला, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१३ ईमेल आयडी: rachana.magdum@jsalaw.com** येथे सदरची नोटीस प्रसिद्ध झालेचे दिनांकापासून **१५** दिवसांच्या आत पाठवावी आणि तसे न केल्यास, अशा व्यक्तीने / व्यक्तींनी त्यांचे असे हक्क, मालकी हक्काधिकार, हितसंबंध असलेली मिळकत हिस्सा, दावा, लाभ, मालकी हक्क, हरकत आणि / अथवा मागणी असल्यास, सोडून दिले आहेत आणि / अथवा त्यांचा त्याग केला आहे. (अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे) असे समजले जाईल अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त भारमुक्त आहेत असे समजून, आमचे अशील जागामालकांशी खरेदी अथवा भाडेपट्टा वा इतर पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस, ती सदर मिळकतींवर, आमचे अशिलांवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

### परिशिष्ट

१)पोट तुकडी तालुका **अक्कलकोट** जिल्हा **सोलापूर** च्या हद्दीमध्ये समाविष्ट असणाऱ्या गाव **हत्तीकणबस** येथील नमूद तक्त्यातील शेतजमीन मिळकती यासी एकुण क्षेत्र **१०५** हेक्टर ८८ आर क्षेत्राची

| अ.नं. | गट नं | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर | अ.नं. | गट नं | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २८/१/ब/१ | श्रीशैल भीमराया माळी | २.२७ | २७ | ९६ | पंचय्या इरय्या स्वामी व इतर ४ | ४.१४ |
| २ | २८/१/ब/१ | विजयालक्ष्मी श्रीशैल माळी | १.१५ | २८ | ९७/१ | शंकरय्या शिवशरण स्वामी | १.८७५ |
| ३ | ३०/२ | माणिक अण्णाराव साळुंखे | ४.५७ | २९ | ९७/३ | सुनिता मलय्या स्वामी | २.४४ |
| ४ | ३०/३ | शंकर मुरलीधर साळुंखे | ४.५८ | ३० | ९९ | विजयकुमार जगदेवप्पा बिराजदार | १.२८ |
| ५ | ३०/४ | मोहन मुरलीधर साळुंखे | ४.६९ | ३१ | १००/१ | संगम्मा शिवानंद बिराजदार | १.८७ |
| ६ | ३१/२ | चंद्रशा लक्ष्मण गायकवाड व इतर १ | ३.७५ | ३२ | १००/२ | विजयकुमार जगदेवप्पा बिराजदार | ०.८५ |
| ७ | ३२/१ | मल्लिकार्जुन शिवान्प्पा मसुती | १.७२ | ३३ | १०१/१ | शंकर सिद्धप्पा बिराजदार | २.०० |
| ८ | ३३/१/अ | मानता मारुती शिंदे | २ | ३४ | १०१/१ | सविता सिद्धप्पा बिराजदार | २.०० |
| ९ | ३३/१/क | श्रीमंत मारुती शिंगे | ३.२३. | ३५ | १०१/१ | विशाल सिद्धप्पा बिराजदार | २.०० |
| १० | ३३/१/ब | मारुती शांतप्पा शिंगे व इतर ५ | २. | ३६ | १०१/५ | गजराबाई बसन्ना बिराजदार | १.६ |
| ११ | ३३/२ | भौरम्मा श्रीशैल पुजारी | १.३१ | ३७ | १०१/६ | बसन्ना शंकरेप्पा बिराजदार | १.२ |
| १२ | ३६/१ | चंद्रशा हेमू गायकवाड व इतर ५ | ०.४२ | ३८ | १०८/१ | उमेश दत्तात्रेय कुलकर्णी | ४.२२ |
| १३ | ३७/१ | विक्रम दादप्पा गायकवाड व इतर १ | ०.५६ | ३९ | १०८/२ | राहुल अरविन्द कुलकर्णी व इतर १ | ४.२२ |
| १४ | ३८/१ | राजप्पा शेटप्पा गायकवाड व इतर २ | ०.७६ | ४० | १११/१ | बसवणप्पा रेवणप्पा धनाळे | १.१७ |
| १५ | ४०/१ | राजप्पा शेटप्पा गायकवाड | १.२४ | ४१ | १११/२ | प्रकाश रेवणप्पा धनाळे | ०.८३ |
| १६ | ४९ | भीमाशा शंकर गायकवाड | २.१६ | ४२ | ११२/१/अ | लक्ष्मण सोमनाथ सुरवसे व इतर ४ | १.४६ |
| १७ | ५०/१ | लक्ष्मण सिंधू गायकवाड व इतर २ | ३.९ | ४३ | ११२/१/ब | कविता प्रकाश भोसगी | ०.८१ |
| १८ | ५१/१ | मच्छिंद्र मल्कप्पा गायकवाड | १.११ | ४४ | ११३/५ | शिवपुत्र शंकर उन्नद व इतर ५ | २.२९ |
| १९ | ५१/२ | रामचंद्र मल्कप्पा गायकवाड | १.११ | ४५ | ११४/१/अ | चंद्रशेखर दरेप्पा उन्नद | १.२२ |
| २० | ५१/३ | शंकर मलकप्पा गायकवाड | १.११ | ४६ | ११४/१/ब | दरेप्पा चंद्राम उन्नद | ०.४२ |
| २१ | ५१/४ | बसण्णा मालकप्पा गायकवाड व इतर १ | १.२६ | ४७ | ११४/२ | चंद्रशेखर दरेप्पा उन्नद | १.६३ |
| २२ | ५२ | हुसेनी तुकाराम खांडेकर व इतर ८ | २.६२ | ४८ | १२१/२ | धोंडाबाई कल्लाप्पा माळी | ३.२४ |
| २३ | ५३/१ | महादेव पंडित बिराजदार | ३.२ | ४९ | १२२/२ | धोंडाबाई कल्लाप्पा माळी | २.८३ |
| २४ | ५३/२ | लक्ष्मण तुकाराम ढोर ( धडके ) | ४.२२ | ५० | १२३/१ | राजकुमार दरेप्पा उन्नद व इतर ३ | १.८२ |
| २५ | ५४ | मीनाक्षी शंकर धडके | २.२३ | ५१ | १२३/२ | बसवराज भीमशा उन्नद | २.२५ |
| २६ | ५५ | मीनाक्षी शंकर धडके व इतर ३ | २.२७ | | | | |

**एकूण क्षेत्र १०५ हेक्टर ८८ आर**

**एकूण क्षेत्र २६४.७० एकर**

२)पोट तुकडी तालुका **अक्कलकोट** जिल्हा **सोलापूर** च्या हद्दीमध्ये, समाविष्ट असणाऱ्या गाव **चिक्केहळ्ळी** येथील नमूद तक्त्यातील शेतजमीन मिळकती यासी एकूण क्षेत्र **३४** हेक्टर **३७** आर क्षेत्राची शेतजमीन मिळकत.

| अ.नं. | गट नं | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर | अ.नं. | गट नं | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४८/१ | स्नेहल संतोष साळुंखे व इतर १ | ४.७२ | ६ | २६६/२ | अबेदा मुक्तुमसो पटेल | ३.९८ |
| २ | १४८/२ | सुजय हणमंतराव साळुंखे | ४.७२ | ७ | २६७/१ | सैपन मुलुक मुक्तूमसो पटेल | २.६६ |
| ३ | १४८/३ | संग्रामसिंह हणमंतराव साळुंखे | ४.७१ | ८ | २६७/२ | इस्माईल मुक्तूमसो पटेल | २.६४ |
| ४ | १७१/३ | स्वस्तिक बाळासाहेब देसाई | ५.०१ | ९ | २६७/३ | मशाक मुक्तूमसो पटेल | २.६५ |
| ५ | २६६/१ | इब्राहीम उर्फ मुक्तुमसो नाबिसो पटेल | ३.६५ | | | | |

**एकूण क्षेत्र ३४ हेक्टर ३७ आर**

**एकूण क्षेत्र ८६.८५ एकर**

**दिनांक:-०४ मे २०२६**
**ठिकाण:-सोलापूर**
**सही/-ॲड . जेएसए ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स**
**कार्यालयाचा पत्ता: वन लोढा प्लेस, २७ वा मजला, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१३**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दिवसा सभा; रात्री सूक्ष्म नियोजन



## अमित शाह यांच्या रणनीतीने तृणमूलचा उडाला धुव्वा

### भीती दूर करण्याचे अभियान

**गाव-मोहल्ल्यांपर्यंत पोहोचून मतदार-कार्यकर्त्यांमध्ये निर्भयपणे मतदान करण्याचा विश्वास निर्माण केला. लोकांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्याची तयारी केली. प्रत्येक क्षेत्र-मतदान केंद्राची जमिनीवरील स्थिती शाह यांच्यापर्यंत पोहोचवली गेली. शिक्षक भरती घोटाळा, आरजी कर आणि इतर प्रकरणे कुटुंब आणि महिलांच्या सुरक्षा व भविष्याशी जोडली. संबंधित मुद्दे गाव आणि शहरी मध्यमवर्गापर्यंत पोहोचवले. त्यामुळे असंतोषाचे मतांमध्ये रूपांतर करण्याचे वातावरण निर्माण झाले.**

**कोलकाता, ५ मे**

पश्चिम बंगाल विजयाचे रणनीतिकार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह १५ दिवसांपेक्षा जास्त काळ बंगालमध्ये तळ ठोकून होते. त्यांनी निवडणूक मोहिमेचे रूपांतर एका मिशनमध्ये केले. शाह दिवसा रॅली आणि रोड शो करीत आणि रात्री प्रत्येक जागेचा आढावा घेत असत. ५० हून अधिक रॅली आणि रोड शो त्यांनी केले. त्यांच्यासोबत पाच इतर प्रमुख नेते प्रत्येक आघाडीवर टिकून राहिले आणि त्यामुळेच सत्तापालट करणे शक्य झाल्याचे एका भाजपा नेत्याने वृत्तसंस्थेला सांगितले.

बंगाल निवडणुकीची तयार पाच वर्षांपासून केली जात होती. २०२१ च्या हिंसाचारानंतर पीडितांच्या घरी जाऊन भाजपा कार्यकर्त्यांनी आर्थिक आणि कायदेशीर मदत केली. शीर्ष नेतृत्वाशी संवाद साधला. संघटना सोबत आहे, असा संदेश गेला. संदेशखालीसारख्या भागांमध्ये थेट संघर्षाऐवजी विश्वासाची रणनीती अवलंबली. महिला आणि पीडितांशी संवाद साधून त्यांना आवाज उठवण्यासाठी प्रेरित केले. त्यामुळे मोठ्या संख्येने लोक पुढे आले असे भाजपा नेत्याने सांगितले. सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावर काम केले. स्थानिक सण, विवेकानंद आणि सुभाषचंद्र बोस यांसारख्या महापुरुषांशी आणि प्रादेशिक ओळखीशी संबंधित कार्यक्रमांद्वारे भाजपाने स्वतःला स्थानिक पर्याय म्हणून सादर केले. (वृत्तसंस्था)

# बंगाली अस्मितेला नाकारले; डबल इंजिन सरकार निवडले

## लेखी परीक्षा, मुलाखत घेऊन पोलिंग एजंटची निवड



**कोलकाता, ५ मे**

पश्चिम बंगालच्या जनतेने तृणमूल काँग्रेस (टीएमसी) च्या 'बंगाली अस्मिता' या घोषणेऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'डबल इंजिन'च्या आश्वासनाला पसंती दिली. कमळाच्या वादळात तृणमूलचा धुव्वा उढाला. दीर्घकाळापासून सुरू असलेली संघटनात्मक तयारीमुळेच विजय निश्चित झाल्याचे भाजपा प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

मतदान प्रतिनिधी (पोलिंग एजंट)निवडण्यासाठी तोंडी आणि लेखी परीक्षाही घेण्यात आल्या होत्या. गेल्या सहा महिन्यांपासून निवडणुकीची रणनीती आखली जात होती. ग्रामीण भागातील नागरिकांची भीती दूर करणे आणि मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविणे याला प्राधान्य देण्यात आले. नवीन मतदारांना भाजपासोबत जोडण्यात यशस्वी झालो. मागील निवडणुकीत तृणमूलच्या मतांचा वाटा ४८.५ टक्के होता, जो यावेळी ४०.८० टक्के राहिला. तर, भाजपा ३८.४ टक्क्यावरून वाढून ४५.८५ टक्क्यांवर पोहोचला. रोजगाराची कमतरता, स्थलांतर, औद्योगिक मंदी, पंचायत स्तरावरील गुंडगिरी आणि स्थानिक तृणमूल कार्यकर्त्यांवरील नाराजी या मुद्यांना हेरून रणनीती आखण्यात आल्याचे भट्टाचार्य यांनी सांगितले.

**नक्सलबारीत कमळ फुलले**

जंगलमहल-आदिवासी पट्ट्यात ४० पैकी सुमारे ३६ जागा भाजपाने जिंकल्या. उत्तर २४ परगणामध्ये ३३ पैकी १८ जागांवर भाजपा उमेदवार विजयी झाले. माटीगाडा-नक्सलबारी मतदारसंघात भाजपा उमेदवार आनंदमय बर्मन यांनी तृणमूलच्या शंकर मालाकार यांचा १,०४,२६५ मतांनी पराभव केला. राज्यातील विजयाचे हे सर्वात मोठे अंतर आहे. हुगळीमध्ये १८ पैकी १६ आणि नादियामध्ये १७ पैकी १४ जागांवर विजय मिळवण्यात यश आले. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### आरबीआयची राज्यांतील तीन बँकांवर कारवाई

**मुंबई** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) राज्यातील दोन बँकांना आर्थिक दंड आणि एका बँकेवरील निर्बंध वाढवला आहे. निर्बंध वाढवण्यात आलेल्या बँकेत यवतमाळच्या द पुसद अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचा समावेश आहे. या बँकेवर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी निर्बंध घातले होते. या निर्बंधांचा कालावधी ६ नोव्हेंबर २०२५ ते ७ मे २०२६ असा होता. आरबीआयने या निर्बंधांचा कालवाधी तीन महिन्यांनी वाढवला आहे. या बँकेवरील निर्बंध ७ ऑगस्टपर्यंत लागू असतील. आरबीआयने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकानुसार पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडला नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी २ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. एनपीए खात्यांसंदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे पालन न केल्याने ही कारवाई करण्यात आली. तसेच, मोगवीरा को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड मुंबईला २० हजार रुपयांचा दंड केला आहे.

### अमेरिकेच्या लष्कराचे इंधनवाहू विमान बेपत्ता

**दुबई** :विमानांना इंधन पुरवठा करणारे अमेरिकन लष्कराचे बोईंग केसी-१३५ स्ट्रॅटोटँकर हे विमान इराणच्या सीमेजवळ आणि कतारच्या हद्दीत बेपत्ता झाले. हे विमान पर्शियन गल्फमध्ये उड्डाण करत होते दरम्यान, त्याच्याशी संपर्क तुटल्याची माहिती समोर आली आहे. संयुक्त अरब अमिरातीमधील अल थापरा या विमानतळावरुन या विमानाने उड्डाण केले. इराण हद्दीच्या जवळच पर्शियन गल्फमध्ये असताना विमानाशी संपर्क तुटला. विमानाने उड्डाणादरम्यान ७७०० हा आपत्कालीन संकेत दिला होता. जेव्हा विमानात गंभीर समस्या निर्माण होते, तेव्हा हा संकेत दिला जातो. विमानाने काही वेळ घिरट्या घातल्या आणि नंतर खाली उतरू लागले. ही तांत्रिक समस्या होती की आणखी काही, याबद्दल अमेरिकेने कोणतीही माहिती दिलेली नाही.

# 'आप' सोडून भाजपात आलेल्या खासदारांचा छळ

### राघव चड्ढा यांनी घेतली राष्ट्रपतींची भेट



राघव चड्ढांसह आणि अन्य तीन खासदारांनी मंगळवारी राष्ट्रपतींची भेट घेतली

**नवी दिल्ली, ५ मे**

आम आदमी पार्टीच्या (आप) नेतृत्वाखालील पंजाब सरकार सूडाचे राजकारण करीत असल्याचा आणि आप सोडून राज्यसभेत भाजपात विलीनीकरण करणाऱ्या खासदारांना लक्ष्य करण्यासाठी पंजाब सरकार सरकारी यंत्रणेचा गैरवापर करीत असल्याचा आरोप राज्यसभा सदस्य राघव चड्ढा यांनी मंगळवारी केला.

राघव चड्ढा आणि इतर तीन खासदारांनी मंगळवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि आपमधून बाहेर पडल्यानंतर आपल्याविरुद्ध होत असलेल्या छळाचा व राजकीय हेतूने प्रेरित कारवाईचा आरोप करणारे एक निवेदन सादर केले. आम आदमी पक्षाशी मतभेद व्यक्त करण्याचा आपला घटनात्मक अधिकार बजावून, ज्या सर्व खासदारांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला तसेच या सर्व घटना आणि घडामोडी त्यांनी आज राष्ट्रपतींसमोर सादर केल्या.

जोपर्यंत आम्ही आज्ञाधारक होतो, तोपर्यंत आम्हाला सुसंस्कृत मानले जात होते आणि ज्या क्षणी आम्ही पक्ष सोडला, त्याच क्षणी आमच्यावर भ्रष्टाचाराचा शिक्का मारण्यात आला, असे चड्ढा यांनी बैठकीनंतर येथे पत्रकारांना सांगितले. (वृत्तसंस्था)

### 'आप'कडून सूडाचे राजकारण

इतरांवर सूडाचे राजकारण केल्याचा आरोप करणारा आम आदमी पार्टी आज स्वतःच धोकादायक सूडाच्या राजकारणात गुंतला आहे. २७ एप्रिल रोजी आम्ही आप सोडली आणि भाजपाच विलीन झालो, तेव्हापासून आमच्या खासदारांना पद्धतशीरपणे लक्ष्य केले जात आहे आणि त्रास दिला जात आहे, असे ते म्हणाले.

# राघव चड्ढांसह सहा जणांचे सदस्यत्व रद्द करा

### मुख्यमंत्री मानही राष्ट्रपतींच्या दारात



**चंदीगड, ५ मे**

मुख्यमंत्री भगवंत मान यांनी मंगळवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी भाजपात प्रवेश केलेल्या पंजाबमधील सहा राज्यसभा खासदारांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागमी केली तसेच सदस्यांना परत बोलावण्याची घटनात्मक तरतूद लागू करण्याची आग्रही भूमिका मांडली.

आमदार आणि मंत्र्यांसह मान यांनी राष्ट्रपती भवन येथे ही भेट घेतली.

सात खासदारांनी पक्ष सोडून जाण्याचा प्रकार हा संविधानाची हत्या असल्याचे मान यांनी या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले. सात खासदारांचे दुसऱ्या पक्षात विलीन होणे हे पूर्णपणे असंवैधानिक आहे. मी या मुद्यावर राष्ट्रपतींशी सविस्तर चर्चा केली, असे मान यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# आता दुर्गम भागातही मिळणार उच्च माध्यमिक शिक्षण

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

**मंत्रिमंडळ निर्णय**

**मुंबई, ५ मे**

राज्यातील डोंगराळ आणि दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या २४ आश्रमशाळांच्या श्रेणीवाढीला आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची गळती थांबण्यास आणि विशेषतः विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणास मोठी चालना मिळणार आहे.

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, ५ प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिक स्तरापर्यंत (इयत्ता ८ वी ते १० वी) श्रेणीवाढ करण्यात आली आहे. तसेच, १९ माध्यमिक आश्रमशाळांना उच्च माध्यमिक म्हणजेच कनिष्ठ महाविद्यालय स्तरापर्यंत (इयत्ता ११ वी व १२ वी) श्रेणीवाढ मिळाली आहे. या १९ महाविद्यालयांपैकी १८ ठिकाणी कला व विज्ञान शाखा, तर एका ठिकाणी केवळ कला शाखा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. आदिवासी भागातील बिकट आर्थिक परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊ शकत नाहीत. यामुळे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणाची गळती मोठ्या प्रमाणावर होते. ही समस्या लक्षात घेऊन, विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच निवासी शिक्षण उपलब्ध करून देण्यावर शासनाने भर दिला आहे. सध्या राज्यात ५५६ अनुदानित आश्रमशाळांमधून सुमारे २ लाख ६१ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या शिफारशीनुसार या शाळांना प्रोत्साहन दिले जात आहे.

### १७८ नवीन पदांची निर्मिती आणि आर्थिक तरतूद

श्रेणीवाढ करण्यात आलेल्या या आश्रमशाळांसाठी आवश्यक मनुष्यबळाची तरतूदही शासनाने केली आहे.

- **माध्यमिक श्रेणीवाढः** ५ प्राथमिक आश्रमशाळांसाठी ३० नियमित शिक्षक पदे आणि २५ बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत.
- **उच्च माध्यमिक श्रेणीवाढः** १९ कनिष्ठ महाविद्यालयांसाठी १४८ नियमित शिक्षक पदांच्या निर्मितीस मंजुरी देण्यात आली आहे. या सर्व पदांसाठी लागणाऱ्या खर्चाच्या तरतुदीसही मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दाखवला आहे.

**श्रेणीवाढ झालेल्या प्रमुख शाळा आणि जिल्हे**

श्रेणीवाढ मिळालेल्या शाळांमध्ये प्रामुख्याने हिंगोली, अमरावती, अहिल्यानगर, नांदेड, बुलढाणा यांमधील प्राथमिक शाळांचा समावेश आहे. तर यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, नंदुरबार, नाशिक, धुळे, जळगाव, रायगड आणि पुणे या जिल्ह्यांमधील माध्यमिक शाळांचे कनिष्ठ महाविद्यालयात रूपांतर झाले आहे. (तभा वृत्तसेवा)

# जगाच्या नकाशावर इराण दिसणार नाही

## ट्रम्प यांचा इशारा; अमेरिकन नौदलावर हल्ला झाल्यास विध्वंस होणार



**वॉशिंग्टन, ५ मे**

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये जहाजांचे संरक्षण करणाऱ्या अमेरिकन नौदलावर इराणने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तर इराण जगाच्या नकाशावर दिसणार नाही. विध्वंसासाठी केवळ इराण जबाबदार असेल. त्यांची कोणतीही चूक सहन केली जाणार नाही, अशा शब्दात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला.

संयुक्त अरब अमिरातीवर इराणने केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव शिगेला पोहोचला आहे. अशातच अमेरिकेच्या सेंट्रल कमांडच्या प्रोजेक्ट फ्रीडम अंतर्गत संरक्षित असलेल्या जहाजांना इराणने लक्ष्य केल्याने तणावात भर पडली. अशातच ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, इराणने दक्षिण कोरियाच्या एका जहाजावर हल्ला केला. जहाजांना सुरक्षा पुरवणाऱ्या अमेरिकन नौदलावर हल्ल्याचा प्रयत्न झाल्यास इराण जगाच्या नकाशावर दिसणार नाही. अशावेळी त्यांनी विध्वंसासाठी तयार राहावे. या प्रदेशात अमेरिकेची लष्करी उपस्थिती आणि सामर्थ्य सातत्याने वाढत आहे.

अमेरिकेकडे आता पूर्वीपेक्षा अधिक प्रगत शस्त्रे आणि दारूगोळा आहे. अमेरिकेचे लष्करी तळ जगभर पसरलेले आहेत आणि ते त्यांच्याकडील सर्व शस्त्रास्त्रांनी पूर्णपणे सुसज्ज आहेत. गरज पडल्यास अमेरिका इराणविरुद्ध या सर्व संसाधनांचा वापर करेल. दरम्यान, होर्मुझमध्ये सध्या ८०० कार्गो जहाजे आणि २० हजारांवर खलाशी अडकले आहेत. हे सर्व होर्मुझच्या पश्चिमेस पर्शियन आखातात आहेत. यात मोठ्या संख्येने तेल आणि रसायनाचे टँकर आहेत. (वृत्तसंस्था)

### होर्मुझमध्ये प्रवेश करणारी जहाजे नष्ट करणार

इराणच्या मुख्य लष्करी कमांड, खतम अल-अंबिया सेंट्रल हेडक्वार्टर्सच्या प्रवक्त्याने निवेदनात म्हटले की, होर्मुझच्या सामुद्रधुनीत प्रवेशाचा प्रयत्न करणारी जहाजे नष्ट केली जाईल. कोणत्याही परदेशी सशस्त्र दलांवर, विशेषतः आक्रमक अमेरिकी दलांवर हल्ले करण्यासाठी आमचे सैनिक सज्ज आहे. या जलमार्गाच्या सुरक्षेवर पूर्ण नियंत्रण आहे आणि कोणत्याही जहाजाच्या सुरक्षित प्रवासासाठी इराणी सशस्त्र दलांशी समन्वय आवश्यक आहे.

### हल्ल्यात पाच इराणी नागरिकांचा मृत्यू

अमेरिकी सैन्याने इराणच्या दिशेने सामान घेऊन जाणाऱ्या दोन नागरी नौकांवर हल्ला केला. इराणच्या म्हणण्यानुसार या नौका आयआरजीसी स्पीडबोट्स नव्हत्या. त्या सामान्य मालवाहू नौका होत्या. हल्ल्यात नौकांमधील पाच नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

# विजय यांची विधिमंडळ नेतेपदी निवड

**चेन्नई, ५ मे**

तामिळनाडूमध्ये १०८ जागा जिंकणाऱ्या तामिळगा वेटी कळघम (टीव्हीके) पक्षाने सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. मंगळवारी झालेल्या बैठकीत विधिमंडळ नेतेपदी पक्षाचे प्रमुख थलपथी विजय यांची एकमताने विधिमंडळ नेतेपदी निवड करण्यात आली. त्यामुळे विजय हेच मुख्यमंत्री होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

पक्षाने आपल्या सर्व नवनिर्वाचित आमदारांना चेंगलपट्टू जिल्ह्यातील मामल्लापुरम येथील एका रिसॉर्टमध्ये स्थलांतरित केले आहे. टीव्हीके प्रमुख विजय यांनी तेथे आमदारांसोबत बैठक घेतली. या बैठकीत विजय यांची विधिमंडळ नेतेपदी निवड झाली. त्यांनी सर्व आमदारांना पगाराव्यतिरिक्त कोणताही पैसा न घेता केवळ जनतेसाठी काम करण्याचे निर्देश दिले. या बैठकीत सरकार स्थापनेवर देखील चर्चा झाली. मामल्लापुरम येथील रिसॉर्टबाहेर पोलिस आणि सुरक्षा दलाचा कडक बंदोबस्त आहेत. टीव्हीकेने राज्यपालांना भेटण्यासाठी वेळ मागितला असून, पक्षप्रमुख विजय ७ मे रोजी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार असल्याचे एका आमदाराने सांगितले. तथापि, २३४ सदस्यीय विधानसभेत सरकार स्थापन करण्यासाठी ११८ जागांचे बहुमत आवश्यक आहे. सरकार स्थापनेवर चर्चा करण्यासाठी राज्यपालांना पत्र पाठवून त्यांच्याकडे भेटीची वेळ मागितली आहे. (वृत्तसंस्था)

# स्टॅलिन यांचा राजीनामा

**चेन्नई, ५ मे**

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर एम. के. स्टॅलिन यांनी मंगळवारी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांच्याकडे सोपवला. २३४ जागांच्या विधानसभेत केवळ ५९ जागा जिंकून द्रमुकआता प्रमुख विरोधी पक्ष बनला आहे.

राजीनामा दिल्यानंतर स्टॅलिन यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, या निवडणुकीत द्रमुक आघाडीला एकूण १५.४८२ दशलक्ष मते मिळाली. विजयी पक्षाला द्रमुकपेक्षा केवळ १.७४३ दशलक्ष अधिक मते मिळाली, एकूण मतांच्या टक्केवारीत केवळ ३.५२ टक्क्यांचा फरक आहे. विरोधी पक्षात असल्याने जनतेच्या मागण्यांसाठी पूर्ण ताकदीने लढेल. एक मजबूत विरोधी पक्ष म्हणून द्रमुक प्रामाणिकपणे जनतेच्या हक्कांचे राजकारण करत राहील. (वृत्तसंस्था)

# ब्रिक्स विकसित करणार डिजिटल पेमेंट प्रणाली

## आरबीआयचा प्रस्ताव, डॉलरच्या अस्थिरतेचा प्रभाव रोखणार




**नवी दिल्ली, ५ मे**

भारत ब्रिक्स देशांसोबत मिळून, अमेरिकी डॉलरच्या अस्थिरतेचा आणि पाश्चात्य निर्बंधांचा प्रभाव कमी करण्यासाठी एक डिजिटल पेमेंट प्रणाली विकसित करण्याची योजना आखत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने हा प्रस्ताव सादर केला आहे, ज्यामुळे स्थानिक चलनांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यवहार करणे शक्य होईल.

इराण-अमेरिका युद्धामुळे जगभरातील चलनांमध्ये मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. भारतीय रुपयादेखील विक्रमी नीचांकी पातळीवर घसरला आहे. या पार्श्वभूमीवर, भारत इतर ब्रिक्स देशांच्या सहकार्याने एक डिजिटल पेमेंट प्रणाली विकसित करण्याची योजना आखत आहे. ब्रिक्स देश एका अशा डिजिटल पेमेंट प्रणालीवर काम करत आहेत, जी पाश्चात्य निर्बंध, शुल्क आणि अमेरिकी डॉलरच्या अस्थिरतेचा प्रभाव कमी करू शकेल, तसेच ही प्रणाली अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिक वित्तीय व्यवस्थेला अस्थिर करणार नाही याची खात्री करेल. ही योजना भारतीय रिझर्व्ह बँकेने सादर केली आहे. या प्रस्तावानुसार, ब्रिक्स देश आंतरराष्ट्रीय व्यवहार स्थानिक चलनांमध्ये पूर्ण करण्याची परवानगी देण्याचा विचार करत आहेत. १०-११ सप्टेंबर रोजी होणाऱ्या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, ब्रिक्सचे परराष्ट्र मंत्री १४-१५ मे रोजी राजधानी दिल्लीत भेटणार आहेत. पेमेंट कनेक्टिव्हिटी आणि व्यापार सेटलमेंट हे अजेंड्यावरील प्रमुख मुद्दे असेल. (वृत्तसंस्था)

### गुंतवणूकदारांच्या विश्वासाला तडा : विवेक मिश्रा

ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशनचे सामरिक अभ्यासाचे उपसंचालक विवेक मिश्रा म्हणाले की, ही पेमेंट प्रणाली सुरू करण्यापूर्वी भारताने अमेरिकेला आश्वासन दिले पाहिजे की ते डॉलरला आव्हान देणार नाही. ब्रिक्स पेमेंट प्रणालीचा उद्देश खाते सेटलमेंट प्रक्रिया सुलभ करणे हा आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात, जर ब्रिक्स देशांनी आपापली चलने वापरायला सुरुवात केली, तर अमेरिकन डॉलरवरील गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होऊ शकतो.

### बाह्य बदलांचा प्रभाव कमी होण्यास मदत

ब्रिक्समधील आर्थिक पेमेंट प्रणालीमुळे सदस्य देशांना मोठा फायदा होईल आणि बाह्य बदलांचा प्रभाव कमी होण्यास मदत होईल. हे एक धोरणात्मक साधन असेल जे पाश्चात्य आर्थिक दबावाविरुद्ध संरक्षण देईल. डॉलरच्या दरात चढ-उतार झाला तरी, त्याचा व्यवहारांवर परिणाम होणार नाही, कारण हे व्यवहार जवळपास रिअल-टाइम असतील. अशा प्रणालीमुळे भारतीय रुपया आणि इतर ब्रिक्स चलनांना अधिक सामर्थ्य मिळेल.

### व्यापार करणे सुलभ

रशिया आणि इराण अनेक वर्षांपासून पाश्चात्य निर्बंधांचा सामना करत आहेत, ज्यामुळे ते जागतिक बाजारपेठेत आपली उत्पादने विकू शकत नाहीत. ज्यामुळे रशिया आणि इराणचे मोठे नुकसान झाले आहे. ब्रिक्स पेमेंट प्रणाली ही भारत आणि इतर देशांसाठी अत्यावश्यक वस्तू आयात करण्यासाठी आणि पाश्चात्य आर्थिक निर्बंधांना टाळण्यासाठी एक उपाय ठरणार असल्याचे या प्रस्तावात नमूद असल्याचे एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले.



भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी मंगळवारी नवी दिल्लीतील चित्तरंजन पार्क येथील काली मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या परिसरात मोठ्या संख्येने बंगाली भाषिक राहतात. यावेळी सोबत दिल्ली भाजपा अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा आणि खा. बांसुरी स्वराज होत्या

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण

**सोलापूर, दि. ५ मे-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प सादरीकरण केले. यासाठी कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय मदडगावचे प्राचार्य, प्रा. ए. डी. पाटील व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय मदडगाव प्रकल्प समन्वयक, प्रा. जी. एम. काळुंगे हे पर्यवेक्षक होते. या सादरीकरणात विद्यार्थ्यांनी कृषीजैवतंत्रज्ञान व एन्टरप्रिन्युरशीप डेव्हलपमेंट इन बायोटेक्नॉलॉजी अंतर्गत विविध विषयांवर प्रकल्प सादर केले. त्यात विविध पिकांचे टिश्यू कल्चर, सूक्ष्मजीवशास्त्र तंत्रज्ञानाचा वापर करून जनुकीय विविधता व पिकांचे संकर ओळखणे आदींचा समावेश होता. यात लिंबू, ऊस, केळी, पेरू, बांबू, डाळिंब, जरबेरा, सिंगोनियम, साग, गहू, कांदा, मकाआदी पिकांचा समावेश होता. याचे समन्वयन प्रा. सायली बडेकर यांनी व सूत्रसंचालन सावरी बिराजदार यांनी केले. यावेळी प्राचार्य सागर महाजन, प्रा. सायली बडेकर, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. अपूर्वा पिस्के आदी उपस्थित होते.

### तीन सराईत गुन्हेगार सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार

**सोलापूर, दि. ५ मे-**



शहरातील विविध पोलीस ठाण्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल असलेले ३ सराईत गुन्हेगार इम्रान रफिक शेख (वय २३, रा. पाटील चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) , राजू उर्फ राजेसिंग राम राठोड (वय २५, रा. शुक्रवार पेठ, माणिक चौक, सोलापूर) आणि अब्दुल वहाब नबीलाल शेख (वय ३७, रा. सोनिया नगर, विजापूर नाका, सोलापूर) याना सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे. इम्रान रफिक शेख याच्यावर २०१९ ते २०२५ या काळात बेकायदेशीर जमाव जमवून दंगल करणे, हाणामारी करणे, सामान्य नागरिकांवर दहशत निर्माण करणे, महिलांवरील अत्याचार आणि सरकारी कामात अडथळा निर्माण करणे यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. राजू उर्फ राजेसिंग राम राठोड याच्यावर २०२१ ते २०२४ दरम्यान नागरिकांना मारहाण करून दहशत माजवणे, जबरदस्तीने पैसे उकळणे आणि गंभीर दुखापत करणे असे गुन्हे दाखल आहेत. तसेच अब्दुल वहाब नबीलाल शेख याच्यावर मंगळसूत्र चोरी आणि मोबाईल चोरीचे एकूण ६ गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे पोलीस उप-आयुक्त विजय कबाडे यांनी या तिघांना तडीपार केल्याचे आदेश नुकतेच काढले आहे.



### दवाखान्यात पत्नीचा डबा घेवून निघालेल्या पतीचा अपघातात मृत्यू

**मंगळवेढा, दि. ५ मे -**

मंगळवेढयात बाळंतपणासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल असलेल्या पत्नीचा जेवणाचा डबा घेवून निघालेल्या २४ वर्षीय पतीला मंगळवेढा ते उमदी मार्गावरील हुलजंती हद्दीत एका ट्रक चालकाने मोटर सायकलला रॉंग साईडने येवून धडक दिल्याने त्या पतीचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी ट्रक चालक चंद्रशेखर बी.बाळूसामी (रा. तामिळनाडू) याच्या विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दि. ३ मे रोजी सायंकाळी ६.१५ वाजता यातील मनोहर सुंठे (वय २४) हा मोटर सायकल क्रमांक के.ए.२८ ई.व्ही.३५९० वरुन मंगळवेढा ते उमदी मार्गावरुन सोड्डी फाट्याजवळ १ कि.मी.अंतरावर हुलजंती हद्दीमध्ये पत्नी भाग्यश्री हिला जेवणाचा डबा दवाखान्यात घेवून जात होता. तेव्हा समोरील वाहनास ओव्हरटेक करत टी.एन.५२ ए.ई.५८८२ वरील चालक चंद्रशेखर बी.बाळूसामी याने ट्रक वेगात चालवून रॉंग साईडला येवून मनोहर सुंठेच्या मोटर सायकलला जोराची धडक दिली. अपघातात मोटर सायकलस्वार गंभीर जखमी होवून जागीच मयत पावला असल्याचे संजय सुंठे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान ट्रकचालक घटनास्थळावरुन ट्रक घेवून फरार झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.



### कडलास प्रशालेस राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

**सांगोला दि.५ मे -**

सांगोला तालुक्यातील कडलास हायस्कूल कडलास प्रशालेस एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोलापूरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे, नवी मुंबईचे नगरसेवक कदम, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे राज्य अध्यक्ष प्रा. बापूसाहेब अडसूळ आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह व सन्मानपत्र मुख्याध्यापक नागनाथ दुधाळ यांना प्रदान केले. यावेळी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक गिरीश गायकवाड, संतोष रायबान, युवराज गायकवाड, रमेश सावंत, दत्तात्रय गोडसे, आलोक पवार, गणेश भजनावळे आदी उपस्थित होते. कडलास प्रशालेने शैक्षणिक व विविध सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना पुरस्कार प्रदान केल्याचे राज्य अध्यक्ष अडसूळ यांनी सांगितले.

# जिल्ह्यात मे महिन्यातही अवघा एकच 'टॅंकर'

- **आहे त्या पाण्याचे योग्य नियोजन करा**
- **जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

दरवर्षी मार्च-एप्रिल महिना आला की, जिल्हा परिषद अन् जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील पाणीटंचाईवर बैठका होवून उन्हाळी पाणीपुरवठ्यासाठी पाणीटॅंकरचे नियोजन केले जाते. यंदाही याबाबतचा टंचाई आराखडा तयार करण्यात आला असला तरी यंदा जिल्ह्याच्या दाही दिशांना मुबलक पाणीसाठा असल्याने आजतागायत तरी जिल्ह्यात अवघे एकच पाणीटॅंकर चालू आहे. यामुळे शासनाचे टंचाईवरील करोडो रूपये वाचले आहेत.

गतवर्षी मुलबक पाऊस झाल्याने चोहीकडे पाणी आहे आणि यामुळेच जिल्हाभरात अवघे एकच पाणीटॅंकर सुरू असल्याची समाधानाची बाब आहे. दरम्यान, सध्या तापमानाचे प्रमाण वाढू लागले असल्याने आहे त्या




पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत असल्याने पाण्याचा वापर सर्वांनी काटकसरीने करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी केले आहे.

सध्या उजनीमधून पिण्याच्या पाण्यासाठी आणि सिंचनासाठी अशी दोन आवर्तने सुरू आहेत. सोडलेल्या पाण्याचे नागरिकांसह शेतकरी बांधवांनी योग्य नियोजन करावे, पाणी काटकसरीने वापरावे. कारण आगामी वर्षात पाऊस कमी असल्याचे संकेत मिळत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनीही आहे त्या पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या आहेत. दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की, काही गावे, वाड्या-वस्त्यांवर हळू-हळू पाण्याचे स्त्रोत बंद होतात. यामुळे अनेक गावांमध्ये पाण्याची समस्या जाणवत असते. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तालुकानिहाय पिण्याच्या पाण्याची स्थिती व टंचाईचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी नुकताच घेतला. जिल्हा प्रशासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून मागेल त्या गावाला पाणीटॅंकर पुरवठा करण्यात येत असतो. दरम्यान, गतवर्षी मुबलक पाऊस झाल्याने अजूनपर्यंत चोहीकडे मोठ्या प्रमाणात पाणीसाठा आहे. उजनी धरणातही मुबलक पाणीसाठा असल्याने यंदा पाणीटॅंकरची मागणी घटली आहे. सध्या अक्कलकोट तालुक्यातील वसंतराव नाईकनगर या एकाच ठिकाणी सध्या पाणीटॅंकर सुरू असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी कसेकर यांनी दिली. अजूनही पाणी टॅंकरची मागणी आल्यास त्या ठिकाणचे पाण्याचे स्त्रोत पाहून त्यांना पाणीटॅंकरची सोय केली जाणार आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्यातरी जिल्हा प्रशासनाच्यावतीने सातत्याने टंचाईचा आढावा घेतला जात आहे.

**जिल्हा स्तरावरून टंचाईसाठी मायक्रोप्लॅनिंग**

सध्या जवळपास सर्वच तालुक्यांना भरपूर पाणी आहे. ज्या गावातील मोठे साठवण तलाव, शासनाच्या सार्व. विहिरी, अधिगृहण करावयाच्या विहिरी, गावातील बोअर्सना पाणी नसेल तरच पाणीटॅंकर देण्यात येते. पाणीटॅंकर सुरू करण्यापूर्वी शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांकडून सर्व पाणीस्रोतांची चौकशीही होते आणि नंतरच त्या गावाला पाणीटॅंकरने पाणीपुरवठा सुरू होतो एकंदरीत, जिल्हा स्तरावरून टंचाईसाठी सुध्दा मायक्रोप्लॅनिंग होत असल्याने शासनाचे कोट्यवधी रूपये वाचत आहेत.

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपीला २० वर्षे सश्रम कारावास

**बार्शी सत्र न्यायालयाचा निर्णय; पॉक्सो कायद्यांतर्गत शिक्षा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मे-**

अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी बार्शी येथील सत्र न्यायालयाने लखन ऊर्फ बापू जोतीबा सावंत (वय २९, रा. सिद्धार्थनगर, माळशिरस, जि. सोलापूर) यास न्यायालयाने दोषी ठरवत २० वर्षे सश्रम कारावास व दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

दि. १ जानेवारी २०२४ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास पीडित मुलगी घरी झोपलेली असताना आरोपीने घरात शिरुन तिच्यावर अत्याचार केला. घटनेनंतर पीडितेने आईला माहिती दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी (दि. २ जानेवारी २०२४) कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. घटनेनंतर गावकऱ्यांनी आरोपीस ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन केले होते.

या प्रकरणी कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात कलम ३७६(२) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पॉक्सो) २०१२ मधील कलम ४, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी सखोल तपास करुन सबळ पुरावे गोळा करत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सरकार पक्षातर्फे ८ साक्षीदारांची साक्ष नोंदवली. पीडितेने आईला दिलेली माहिती व न्यायालयातील जबाब एकमेकांना पूरक असल्याचे स्पष्ट झाले. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची साक्ष व घटनेनंतर आरोपीला पकडणाऱ्या गावकऱ्यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. सरकार पक्षाचे वकील ॲड. दिनेश देशमुख यांनी आरोपीविरुद्ध ठोस पुरावे मांडले. फिर्यादी व साक्षीदारांचा आरोपीशी कोणताही वैमनस्य नसल्याने खोटा गुन्हा दाखल होण्याची शक्यता नसल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी आरोपीस दोषी ठरवत भादंवि कलम ३७६ (२) नूसार २० वर्षे सश्रम कारावास + ५ हजार रुपये दंड, पॉक्सो कलम ४ : २० वर्षे सश्रम कारावास + ५ हजार रुपये दंड, पॉक्सो कलम ८ : ३ वर्षे सश्रम कारावास + २ हजार रुपये दंड, पॉक्सो कलम १२ : ३ वर्षे सश्रम कारावास + २ हजार रुपये दंड. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाची तरतूद केली आहे. सर्व शिक्षा एकत्र भोगण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी केला. तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा (करमाळा उपविभाग) व पोलीस निरीक्षक अतुल मोहिते यांनी फिर्यादी व साक्षीदारांना मार्गदर्शन केले. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून योगेश मंडलिक यांनी काम पाहिले.

## घेरडी ग्रामपंचायतीत कोट्यवधींचा गैरव्यवहार?

**कामे न करताच निधी खर्च दाखवला; चौकशीची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे -**

सांगोला तालुक्यातील घेरडी ग्राम पंचायतीमध्ये विकासकामे न करताच कोट्यवधी रुपयांची बिले काढून निधीचा गैरवापर झाल्याचा गंभीर आरोप ग्राम स्थांनी केला आहे. या प्रकरणी ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांना निवेदन देत तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, १५वा वित्त आयोग, ग्रामपंचायत निधी, जिल्हा परिषद निधी तसेच शासनाकडून प्राप्त विविध योजनांतील निधीचा गैरवापर केला आहे. बाबुराव पुकळे व नामदेव कांबळे वस्ती पाईपलाईन (७.९९ लाख), दत्त मंदिर ते गावठाण विहीर पाईपलाईन व पंपिंग मशिनरी (७.९२ लाख), तसेच पारे तलाव ते वेताळवाडी शाळा पाईपलाईन (४ लाख) आदी अनेक कामे कागदावर पूर्ण दाखवून प्रत्यक्षात न केल्याचा आरोप केला आहे.

पांडा गेजगे वस्ती, शेख वस्ती, लक्ष्मण गेजगे ते गुजरे वस्ती, पंचशील नगर ते




रूईदास जगधने पाईपलाईन, तसेच पारे रोड ते तुकाराम पुकळे मुरूमीकरण रस्ता आदी कामांमध्येही अनियमितता झाल्याचे नमूद केले आहे. या सर्व प्रकारामुळे कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. निवेदन देताना काकासो यमगर, शामराव पौळ, दिलीप गोरे, आप्पासो सरगर, रामचंद्र घुटूकडे, कैयुमा अत्तार, बिरुदेव पुकळे, अनिल मोटे, बयाजी कवटे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## बार्शीत जमिनीच्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला; चार जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मे -**

बार्शी शहरात जमिनीच्या वादातून तरुण व त्याच्या चुलत्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी चारजणांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमींवर सध्या उपचार सुरु आहेत.

याबाबत अभय जाधव (वय २६, रा. साईबाबा नगर, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १ मे रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास कुर्डूवाडी रोडवरील रुबाब कलेक्शन किसन जाधव उभे असताना ही घटना घडली.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, ओम नवनाथ जाधव, सौरभ वैजिनाथ जाधव, वैजिनाथ किसन जाधव (सर्व रा. पिंपळकर प्लॉट, बार्शी) व बापू वाघमारे (रा. जैन मंदिर परिसर, बार्शी) यांनी एकत्र येऊन कुर्डूवाडी रोड, बायपास चौकाजवळील जमिनीत हिस्सा का देत नाही, या कारणावरुन वाद घालत हल्ला केला.

आरोपींनी लोखंडी रॉड व दगडांचा वापर करुन अभय जाधव यांच्या डोक्यावर, पायावर तसेच त्यांचे चुलते नवनाथ जाधव यांच्या कमरेवर, पोटावर व डोळ्यावर मारहाण केली. यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले. तसेच आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण करत शिवीगाळ केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. जखमींच्या आरडा ओरडीनंतर परिसरातील नागरिकांनी धाव घेत त्यांना आरोपींच्या तावडीतून सोडवले. त्यानंतर जखमींना तातडीने बार्शी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी धाराशिव येथील सिव्हिल रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या दोघांवर बार्शीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलीस तपास करत आहेत.

## तामलवाडी-वडगाव रस्त्याची प्रचंड दुरवस्था

**रस्ता उकरुन गुत्तेदार गायब; नव्या पुलाच्या संरक्षण भिंतीला तडे!**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते वडगाव काटी रस्ता गेल्या तीन महिन्यांपासून उकरुन त्यावर मोठी खडी अंथरली असून, यामुळे अगोदरच नागरीक त्रस्त झाले आहेत. आता त्यामध्ये आणखी भर म्हणजे रस्त्यावर सिमेंट नळ्या टाकुन ज्या नवीन मोऱ्या बनवले आहेत. त्यावर दोन्ही बाजुला संरक्षण भिंतीला तडे गेल्याने 'निकृष्ट दर्जाच्या कामाचा नमुना' पहायला मिळत आहे. दरम्यान, या रस्त्याबाबत वारंवार बातम्या लागूनही याकडे यंत्रणा कशी काय दुर्लक्ष करते? याबाबतही प्रश्नचिन्ह उभे राहत आहे.

तामलवाडी ते वडगाव काटी हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून मंजूर असून, या सिमेंट



तब्बल ७.२० कोटी अंदाजित रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मागील वर्षी कामाला सुरुवात झाली. झाडेझुडपे काढुन प्रथम सिमेंटच्या नळ्या घालुन मोऱ्या तयार केल्या. काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे गुत्तेदाराला नागरिकांनी सांगितलेही होते. परंतु त्यांनी करायचे तेच केले आणि केवळ ८ ते ९ महिन्यातच त्यांनी केलेला प्रताप दिसून आला. मोऱ्या बांधल्यानंतर दोन्ही बाजुला ज्या संरक्षण भिंती बांधल्या त्याला रस्त्याचे काम सुरू होण्याअगोदरच तडे गेल्याने निकृष्ट दर्जा दिसून आला आहे.

जवळपास ७ कि.मी.चा रस्ता उकरुन ठेवल्याने काही नागरीक मार्डी मार्गे तर काही नागरीक सावरगाव मार्गे तामलवाडी गाठत आहेत. उकरुन ठेवलेल्या रस्त्यावरुन प्रवास करताना पडुन जखमी होण्यापेक्षा लांबुन प्रवास केलेला बरा असे नागरीकांचे म्हणणं आहे परंतु तामलवाडी व वडगाव काटी येथील शेतकऱ्यांचे काय? असा प्रश्न आहे. संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधींनी कामाची चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

# 'सीना-माढा' बाबत खासदारांच्या अधिकाऱ्यांना कानपिचक्या

- **कुर्डूवाडी येथील टंचाई आढावा बैठक**
- **शिस्तीत काम न केल्याने आजची परिस्थिती निर्माण**

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ५ मे-**

सीना माढा उपसा सिंचन योजना अगोदरपासूनच अधिकाऱ्यांकडून शिस्तीत चालवली असती तर आजची परिस्थिती निर्माण झाली नसती, अशा अधिकाऱ्यांच्या कानपिचक्या खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी घेतल्या.

कुर्डूवाडी पंचायत समितीच्या सभागृहात सोमवारी दुपारी तीन वाजता खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुर्डूवाडी येथील टंचाई आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार संजय भोसले, प्रभारी बिडीओ शंकर मिरगणे, उजनी धरणच्या व्यवस्थापक कार्यकारी अभियंता



सुचिता डुंबरे, माजी जि.प.सदस्य भारत शिंदे, पं.स.सदस्य पोपट अनपट, विनंती कुलकर्णी, बालाजी पाटील, ॲड. बाळासाहेब पाटील यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. राज्यातील मेट्रोलॉजी विभागाकडील अहवालानुसार येथून पुढे तीन वर्ष दुष्काळ पडेल असा अंदाज आहे. सीना माढा उपसा सिंचन योजनेवरील लाभार्थी गावांना १०० टक्के पाणी पोहोचले पाहिजे. तुम्ही कुणाच्यातरी दबावाखाली काम करत आहे, अजूनही त्या गावात नियमबाह्य पाणी चालू आहे, ते अगोदर बंद करा मग या योजनेतील पाण्याबाबतच्या शेतकऱ्यांच्या व गावोगावच्या पदाधिकाऱ्यांच्या तक्रारी संपतील. मी कागदोपत्री बोलतोय,वारंवार सांगून जर अधिकारी कामे करीत नसतील तर नागरिकांनी माझ्याशी संपर्क साधा. मी दिशा समितीच्या बैठकीत हे जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करतो असे खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी बैठकीत सांगितले.

यावेळी प्रथम प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपाआपल्या विभागाचा टंचाई विषयीचा आढावा खा. धैर्यशील मोहिते पाटील यांना सादर केला. त्यानंतर काही गावांच्या सरपंचांनी खा. मोहिते पाटील यांच्याकडे समस्या सादर केल्या. त्यात प्रामुख्याने सीनामाढा उपसा सिंचन योजनेच्या पाण्याबाबत अनेक गावांच्या तक्रारींचा समावेश होता. याबरोबरच जलमिशन योजना व विद्युत वितरणाच्या लाईटबाबत देखील अनेक तक्रारी नागरिकांकडून व्यक्त करण्यात आल्या. यात माढा शहर, लऊळ, कव्हे, मोडनिंब, अंजनगाव, परिते, होळे, कुर्डू, वाकाव, बेंबळे, उजनी(मा), शेवरे, पडसाळी, चिंचोली आदी गावांच्या तक्रारींचा पाढा वाचण्यात आला. यावर खा धैर्यशील मोहिते पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना उभे करून त्याबाबत उत्तरे देण्यास सांगितले.मात्र त्यावर अनेक ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांचे समाधान झाले नाही. त्यावर मला कामे न केल्यास संपर्क करा असे आवाहन त्यांनी केले.

जलजीवन मिशनची कामे ही जिल्हा परिषद व महाराष्ट्र प्राधिकरण विभागाकडून केली आहेत. त्यात पाच कोटी रुपयांच्या वर काम चालले की ते झेडपीला राहत नाही. त्यामुळे यात अनेक पद्धतीने अनियमितता केली. त्यामुळे नागरिकांनी सजग असणे गरजेचे आहे. अनेक वस्त्या स्थानिक राजकारणामुळे वगळल्या आहेत. त्याचा फटका तीस वर्ष बसणार आहे. मी त्याच कमिटीवर आहे.

या कामात देशभरात अनियमितता दिसून आली आहे. त्याची तपासणी सध्या केंद्राकडून सुरू आहे. यावेळी माढा तालुक्यातील अनेक गावचे सरपंच ग्रामसेवक विविध विभागाचे कर्मचारी अधिकारी या बैठकीस उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर सुतार यांनी केले.

**निवृत्त अधिकाऱ्यांकडूनही कामाबाबत गुद्गुल्या**

सीना माढा उपसा सिंचन योजनाबाबत निवृत्त झालेली माणसे देखील आताच्या अधिकाऱ्यांना गुद्गुल्या करतात. त्यामुळे महसूल विभागाची जबाबदारी आहे की त्यांना सहकार्य करावे. या योजनेतील सर्वांना पाणी व्यवस्थित मिळण्यासाठी पाणी संस्था उभ्या केल्या पाहिजेत असे त्यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर **तरुण भारत**

https://epaper.dainiktarunbharat.com/







**'अंगारकी'निमित्त गणरायाचे दर्शन...**

**मंगळवार, दि.५ मे २०२६ रोजी अंगारकी चतुर्थी होती. यानिमित्त शहरातील विविध गणेश मंदिरात 'श्रीं'च्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. गणपती घाटावरील सिद्धिविनायक मंदिरात टिपलेले छायाचित्र.**

# नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा : खा.प्रणिती शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

नसरापूर येथे एका चिमुरडीवर अत्याचार करून हत्या करण्यात आली. शक्ती कायदा लागू करायला हवा होता. त्या नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. अशी गंभीर घटना घडली असतानाही मुख्यमंत्र्यांसह सत्ताधारी भाजपाने राज्यभरात विजयाबद्दल पेढे वाटून जल्लोष केला. कोणतीही माणुसकी राहिली नाही. सत्ताधाऱ्यांची विकृत मानसिकता दिसून येते. महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था कोलमडली आहे. यामुळे नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेसच्या खा.प्रणिती शिंदे यांनी सोलापुरात पत्रकार परिषदेमध्ये केली.

महाराष्ट्रात नसरापूर येथील घटना अंगावर शहारा आणणारी आहे. असे असताना मुख्यमंत्र्यांसह सत्ताधारी भाजपने पश्चिम बंगालच्या निकालाचा जल्लोष केला. सत्ताधारी हे केवळ निवडणुकीसाठी काम करतात. त्यांचा दिवस निवडणुकीनेच सुरू होतो. अत्याचार होऊन हत्या होते. याची जाणीव ठेवून सत्ताधाऱ्यांनी जल्लोष केला नसता तर माणुसकी दिसून आली असती मात्र तरीही सत्ताधाऱ्यांनी निवडणूक विजयाचा जल्लोष केला. पेढे वाटले. माणुसकी राहिली नाही.

सोलापूरसह राज्यभरात कायदा व सुव्यवस्था कोलमडली आहे. डोक्यावरून पाणी गेले आहे. प्रशासन आणि शासन यांची मिलीभागत आहे, असा आरोप करत आहे. सत्ताधाऱ्यांची विकृत मानसिकता स्पष्टपणे दिसून येत आहे. सत्ताधाऱ्यांकडून गुन्हेगारांना पाठबळ दिले जाते. बालिकेंवर अत्याचारांच्या घटना घडतात. खरात पासून ते अनेकांपर्यंत विकृतीच्या



### किमान जल्लोष तरी साजरा करू नका

ना विकास, ना पाणी मिळते, वारंवार अत्याचार व गुन्हे घडत आहेत. अशा परिस्थितीत निवडणूक विजयानंतर किमान जल्लोष तरी साजरा करू नका. साडेतीन वर्षाच्या चिमूरडीवर अत्याचार करून हत्या झाली. अनेक ठिकाणी महिला व बाल अत्याचाराच्या घटना घडतात. पण पुढे कोणी येत नाही, अशी परिस्थिती आहे. सर्व यंत्रणावर सरकारचा दबाव आहे. प्रशासन आणि शासनाचे मिलीभगत आहे संबंधित अधिकारी निलंबित झाले पाहिजेत. ते का होत नाहीत? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### जनउद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही

विकृत मानसिकता वाढली आहे. पुरोगामी महाराष्ट्र कुठे नेऊन ठेवला आहे असा प्रश्न उपस्थित केला आहे. प्रशासनावर मोठा दबाव आहे. ते हतबल झाले आहेत. आता अधिकाऱ्यांनीही धाडस केले पाहिजे. नैतिकता, तत्व, मूल्य राहिले नाही. सत्ताधाऱ्यांना जाणीव नाही. शेवटी जनउद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही. खालच्या पातळीवर राजकारण होत आहे. त्याला सत्ताधारी व अधिकारी कारणीभूत असल्याचा आरोपही यावेळी खा.प्रणिती शिंदे यांनी केला.

घटना उघड होत आहेत. दुसरीकडे सत्ताधारी हे महिला सक्षमीकरण आणि संरक्षणाच्या गोष्टी करतात. हा मोठा विरोधाभास आहे. बालिका अत्याचार प्रकरणातील आरोपी यापूर्वी कसा सुटला? कोणी जामीन दिले? कोणी सोडले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या पत्रकार परिषदेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, माजी महापौर सुशीला आबुटे, हेमा चिंचोळकर, नगरसेवक नरसिंग आसादे, संजय हेमगड्डी, भीमाशंकर टेकाळे, गणेश डोंगरे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# टीका करणाऱ्या प्रणिती शिंदे यांच्या बुध्दीची कीव येते : आ.देवेंद्र कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मे-**

खासदार असूनही वर्षातून दर तीन महिन्यांनी सोलापूरला येणाऱ्या आणि प्रसिध्दी मिळवण्यासाठी पात्रता नसतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बोलून टीआरपी मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या खा.प्रणिती शिंदे यांच्या बुध्दीची कीव येते, अशी राजकीय चपराक आमदार देवेंद्र कोठे यांनी लगावली.

नसरापूर येथील चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपीला कठोर शिक्षा देणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार आल्यानंतर आरोपींना कायद्याच्या चौकटीत राहून त्वरित शिक्षा मिळवून दिल्याची कित्येक उदाहरणे आहेत, असेही आ.देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

खा.प्रणिती शिंदे मात्र प्रसिद्धीसाठी धडपड करत आहेत. प्रसारमाध्यमांचे कॅमेरे, बूम दिसल्यानंतर त्यांना प्रसिध्दी मिळविल्याशिवाय रहावत नाही. सुशीलकुमार शिंदे देखील अनेक वर्षे केंद्रीय गृहमंत्री होते. त्या काळातही अनेक अनिष्ट घटना देशभरात घडल्या. त्यावेळी आमदार असलेल्या प्रणिती शिंदे यांनी आपल्या वडिलांना किंवा संबंधित नेतृत्वाला राजीनामा मागितला का? असा सवालही केला.

खा.प्रणिती शिंदे यांना जनतेने खासदार म्हणून काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे त्यांनी जनतेची कामे



### खा.प्रणिती शिंदे यांना सकल हिंदू समाजाची एलर्जी

नसरापूर येथील पीडित कुटुंबाबद्दल खासदार प्रणिती शिंदे यांना खरोखरच सहानुभूती असती तर त्यांनी काँग्रेस भवनपासून अवघ्या काही अंतरावर सुरू असलेल्या सकल हिंदू समाजाच्या निषेध आंदोलनात सहभागी व्हायला हवे होते. परंतु खा. प्रणिती शिंदे यांना सकल हिंदू समाजाची एलर्जी असल्यामुळे त्यांनी तेथे जाण्याचे जाणीवपूर्वक टाळले, असेही आमदार देवेंद्र कोठे म्हणाले.

### सुसंस्कृत राजकारणाचा वारसा जपण्याचा सल्ला

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या रुपाने खा.शिंदे यांच्या घरात सुसंस्कृत राजकारणाचा वारसा आहे. सुशीलकुमार शिंदे यांचे सर्व पक्षांशी घनिष्ठ संबंध आहेत. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात सुशीलकुमार शिंदे यांनी अमेरिकेत भारताचे नेतृत्व केले आहे. असे असताना खा.शिंदे मात्र नेमकी उलटी भूमिका घेत आहेत. खा.प्रणिती शिंदे यांनी राजकीय अनुभवानुसार बुद्धीतही वाढ करावी, असा सणसणीत टोलाही त्यांनी लगावला.

करावीत. विकासावरून राजकारण करू नये. एकीकडे निधी मिळत नाही अशी ओरड करायची आणि दुसरीकडे आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासारख्या भाजपाच्या आमदारांना भाजप सरकारकडून मिळालेल्या निधीचे श्रेय घ्यायचे असा प्रकार त्या करत आहेत, असे सांगायलाही आ.देवेंद्र कोठे विसरले नाहीत.

## महत्वाचे...



### ह.दे. कनिष्ठ महाविद्यालयाचा ९०.४५ टक्के निकाल

**सोलापूर, दि.५ मे-**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात बारावीच्या परीक्षेत हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९०.४५ टक्के इतका लागला. दहा विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. कला शाखेतील विद्यार्थिनी वडगाव लक्ष्मी रामचंद्र हिने ८२.१७ टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. शास्त्र शाखेतील विद्यार्थी उबाळे गिरीश नितीन ८१.१७ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. स्वामी ओम शांतलिंगय्या याने ७८.८३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. या यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष सुरेश मंकणी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्राचार्य स्मिता कांगुणे, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, पर्यवेक्षक आप्पासाहेब राऊत तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार, एक जखमी

**सोलापूर, दि.५ मे-**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एक मोटरसायकलस्वार जागीच ठार तर एक जण जखमी झाल्याची घटना बोरामणी नाका परिसरात जोशी गल्ली येथे मंगळवारी पहाटे ३.१५ वाजता घडली. विनायक वसंतराव कुलकर्णी (वय-३८, रा.सिध्देश्वर नगर, मजरेवाडी, सोलापूर) असे मयताचे तर रणजीत शंकर मळगे (रा.तांडूर, सध्या सात रस्ता, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. यातील मयत हा सोलापुरातील एका रक्तपेढीत कामाला असून तो आपल्या जोडीदारासोबत मंगळवारी पहाटे एम.एच.१३ सी.व्ही.०२४६ या क्रमांकाच्या मोटरसायकलवरुन जात होता. बोरामणी नाका परिसरातील जोशी गल्ली येथून जात असताना अज्ञात वाहनाने त्याला धडक दिली. यात तो जागीच मृत्यूमुखी पडला. जोडभावी पेठ पोलिस ठाण्याचे हवालदार सी.एम. रुपनर यांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह शासकीय रुग्णालयात विच्छेदनासाठी दाखल केला. जखमीवर उपचार सुरु आहेत.



# टीजेएसबी सहकारी बँकेत भवानी सहकारी बँक विलीन

**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि. ५ मे-**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडमध्ये भवानी सहकारी बँक लिमिटेडच्या विलीनीकरणाची प्रक्रियेला भारतीय रिझर्व्ह बँकेने ३० एप्रिल रोजी अधिकृत मंजुरी दिली. सोमवार, ४ मे २०२६ पासून हे विलीनीकरण पूर्ण झाले आहे, असे सांगण्यात आले.

रिझर्व्ह बँकेने बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या कलम ४४अ आणि कलम ५६ नुसार ही मान्यता दिली. या धोरणात्मक निर्णयामुळे टीजेएसबी बँकेचा फार मोठ्या प्रमाणात विस्तार मुंबई शहरात झाला आहे.२०२५-२६ या आर्थिक वर्षात टीजेएसबी सहकारी बँकेने २५,३६० कोटींचा एकूण व्यवसाय केला आहे. यात ११६,२४४ कोटींच्या ठेवी आणि १९,११६ कोटींच्या कर्जाचा समावेश आहे. बँकेचे जाळे ७ राज्यांत एकूण शाखांचे जाळे निर्माण झाले आहे.

बँकेचे अध्यक्ष शरद गांगल म्हणाले, भवानी सहकारी बँकेचे विलीनीकरण हे केवळ विस्तारीकरण नसून, सहकारी बँकिंग क्षेत्रात आमचे स्थान अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने उचललेले एक दमदार आणि धोरणात्मक पाऊल आहे. बँकेचे उपाध्यक्ष वैभव सिंगवी म्हणाले, या विलीनीकरणामुळे भवानी सहकारी बँकेच्या ग्राहकांना आधुनिक डिजिटल बैंकिंग सुविधा आणि विश्वासार्ह सेवेचा लाभ मिळेल. यामुळे त्या ग्राहकांचा बैंकिंग अनुभव अधिक सुरक्षित, गतिमान आणि सुलभ होईल.

बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर म्हणाले, आमचे लक्ष नेहमीच ग्राहक-केंद्रित सेवा आणि शाश्वत वाढीवर राहिले आहे. भवानी बँकेच्या समावेशामुळे आमचे मुंबई शहरात शाखांचे जाळे अधिक मजबूत होईल.



### टीजेएसबी बँकेविषयी

१९७२ मध्ये स्थापन झालेली टीजेएसबी बैंक ही महाराष्ट्र, गुजरात, गोवा, कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड अशा सात राज्यांत कार्यरत असलेली अग्रगण्य सहकारी बँक आहे. बैंक ग्राहक केंद्रित दृष्टीकोन, गतिमान वित्त सेवा, आधुनिक तंत्रज्ञान आधारित सुविधा यासाठी ओळखली जाते.

# न्या.बदर आयोग रद्द करा



### 'भीमशक्ति'ची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**


अनुसूचित जाती उपवर्गीकरण करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर हालचाली सुरु आहेत. महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या न्या.बदर समितीने याबाबत अहवाल सादर केला. परंतु यात अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे न्या.बदर आयोग रद्द करण्यात यावी, अशी मागणी भीमशक्ती सामाजिक संघटनेने उपजिल्हाधिकारी केसकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. भीमशक्तीचे नेते, खासदार चंद्रकांत हांडोरे यांनी दिलेल्या आदेशानुसार हे निवेदन देण्यात आले.

वास्तविक पहाता सर्वप्रथम हा अहवाल सादर करण्यापुर्वी जातनिहाय जनगणना होणे अपेक्षित आहे. शासनाकडे कोणताही एम्परियल डेटा नाही. घटनेप्रमाणे उपवर्गीकरण झाले पाहिजे . अनुसूचित जातीमधील सर्व ५९ जातींच्या प्रतिनिधींना समितीमध्ये सामील करूनच समिती घोषित करणे आवश्यक आहे. अशा त्रुटी आहेत. जोपर्यंत या त्रुटीत सुधारणा होत नाही तोपर्यंत या अहवालास विरोध राहणार आहे, असे यात म्हटले आहे.

भीमशक्तीचे सुबोध वाघमोडे, नागेश बंगाळे, राजाभाऊ कदम, संजय रणदिवे, उमेश सुरते, सुखदेव साबळे, सलीम मुल्ला, प्रमिला तुपलवंडे, ज्योती गायकवाड, प्रेमलता वाघमारे, ॲड.करिमुन्निसा बागवान, शोभा बोबे, सचिन साबळे, राजश्री साबळे, इब्राहिम शेख, कीर्ती शिवशरण, सचिन सुरवसे, मिलिंद कांबळे, संदीप ससाणे, विक्रांत वाघमारे, रविराज चंद्रकर, विराज कोलालू आदींच्या शिष्टमंडळाने हे निवेदन दिले.

# आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा





**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.५ मे-**

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. शिवरत्न बंगला येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून व अनेक मान्यवरांनी दूरध्वनीवरुन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. सकाळी ७ वाजता आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी शिवरत्न बंगला येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या समाधीचे दर्शन घेतले. तदनंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आई सौ. नंदिनीदेवी मोहिते-पाटील व ज्येष्ठांचे आशीर्वाद घेतले. कुटुंबातील महिला सदस्यांनी त्यांचे औक्षण केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, खा.अमोल कोल्हे, आ.जयंत पाटील, आ.रोहित पवार, आ.निरंजन डावखरे, आ.महेश लांडगे, आ.प्रसाद लाड, आ.अभिजीत पाटील, आ.बाबासाहेब देशमुख, रणजित देशमुख, नरेंद्र पाटील, दिलीप गोरे, अनिल जाधव, राजेसाहेब देशमुख, जयप्रकाश कदम, सचिन बोधले, जितेंद्र चव्हाण, बालाजी चव्हाण, विजय देशमुख, उदय प्रताप सिंह, निशांत गवई, अनिल लोखंडे, प्रमोद पाटील, अमित कदम, तेजपाल वाघ, बाबू दळवी, धर्मराज काडादी, बाळराजे पाटील, योगेश जगताप, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आदी मान्यवरांनी दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

शिवरत्न बंगल्यावर खा.धैर्यशील मोहिते पाटील, आ. उत्तमराव जानकर, माजी आ. दत्तात्रय सावंत, मनोहर भाऊ डोंगरे, भारत शिंदे, वसंत नाना देशमुख, भगवान चौगुले, सुनील पाटील दैनिक सोलापूर तरुण भारतचे संपादक प्रशांत माने व त्यांचे सहकारी विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट ट्रस्टचे सर्व ट्रस्टी चंद्रकांत कुंभार, नितीन खराडे, श्रीकांत राऊत, वसुंधरा देवडीकर यांच्यासह विविध संस्थेचे पदाधिकारी विविध पक्षाचे नेते कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांनी शुभेच्छा दिल्या.

### आ.रणजितदादांच्या आवाहनाला प्रतिसाद

आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांसाठी हजारों वह्या तसेच विवीध रोपे भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी अधिकारी यांनी रणजीत सिंह यांना शुभेच्छा दिल्या शिवामृत दूध उत्पादक संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय भिलारे व संचालक मंडळ सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जय सिंह मोहिते पाटील व संचालक मंडळ अधिकारी कर्मचारी श्रीशंकर सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक अकलूज नगर परिषदेचे नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या यावेळी अनेक नागरिकांनी शालेय साहित्य व वृक्ष भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाहतूक व्यवस्थेतील बदलांमुळे वाहनधारकात गोंधळ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ५ मे :** लातूर शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर पर्याय शोधण्यासाठी पोलीस अधीक्षकांच्या आदेशान्वये राबविण्यात येणाऱ्या वाहतूक व्यवस्थेतील बदलांमुळे वाहनधारकांत गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याचे पाहावयास मिळत आहे.

या नव्या आदेशाचे अवलोकन अद्याप अनेक वाहनधारकांना झाले नसल्याचे एकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे. ज्या ठिकाणाहून वाहनधारकांना वळण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत, ती बाब लक्षात न आल्याने वाहनधारकांना दुबार चक्कर पडत असलेली दिसून येते. या व्यवस्थेमुळे मुख्य रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होत असली तरी शहराच्या अंतर्गत भागातील गर्दी आणि गोंधळात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. शहराच्या गांधी मार्केट परिसरातील वाहतुकीवर त्याचा चांगलाच परिणाम झालेला आहे.

त्यामुळे गर्दीच्या दरम्यान या भागातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत होताना दिसत आहे. एकंदर लातूर शहरातील वाहनधारकांना या नव्या व्यवस्थेची सवय होईपर्यंत आणखी काही दिवस असे गोंधळाचे वातावरण कायम राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# विविध वृत्त...

## उष्णतेपासून जनावरांना वाचवा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ५ मे :** वाढत्या तापमानाची शक्यता व उष्णलहरींचा धोका लक्षात घेऊन पशु, कुक्कुटपालन करणे जोखमीचे झाले असून, पशुसंवर्धन विभागाने उष्णतेपासून बचाव करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. वाढत्या उष्णतेमुळे पशुधनावर होणारे विपरित परिणाम टाळण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

उष्णलहरींपासून पशु, कुक्कुटपालनाचे संरक्षण करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थांच्या प्रमुखांना प्रशिक्षण दिले असून, पशुपालकांना याबाबत माहिती देण्यास सांगितले आहे. पशुधनाला पुरेसे स्वच्छ आणि थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासह आहारात क्षार मिश्रणेव जीवनसत्वांचा समावेश करून दुभत्या जनावरांना संतुलित आहार देण्याचे आवाहन केले आहे. शेती किंवा वहनाच्या कामास वापरल्या जाणाऱ्या पशुधनाला सकाळी ११ ते सायंकाळी ४ या तीव्र उन्हाच्या काळात विश्रांती द्यावी. त्यांना सावलीत किंवा खेळती हवा असलेल्या थंड जागी बांधावे. गोठ्याचे छत उष्णता रोधक असावे किंवा छतावर गवत, पालापाचोळा टाकून त्यावर पाणी मारावे. शक्य असल्यास स्प्रिंकलरचा वापर करावा. खिडक्यांना सावलीची व्यवस्था करावी.

उष्णलहरी सुरू होण्यापूर्वी घटसर्प, फऱ्या व आंत्रविषार यासारख्या रोगांचे प्रतिबंधक लसीकरण व जंतनाशक औषधे पाजणे आवश्यक आहे. उन लागल्यास जनावरे धापा टाकतात. तोंडावाटे लाळ गळणे, अस्वस्थता वाढणे, अशी लक्षणे दिसून येतात. अशावेळी तात्काळ सावलीत किंवा थंड ठिकाणी जनावरे हलवावी. पशुंवर थंड पाणी मारावे. अश्ववर्गीय प्राण्यांच्या बाबतीत पायाकडून शरीराच्या वरील भागाकडे पाणी मारावे. तसेच जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. फिरती पशुवैद्यकीय पथके तातडीच्या सेवेसाठी तैनात ठेवली आहेत.

१९६२ कॉल सेंटरवरून सेवा

चारा व्यवस्थापन व पशुधनाच्या आरोग्याबाबत कोणत्याही मदतीसाठी स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. तसेच १९६२ कॉल सेंटरच्या माध्यमातून पशुसंवर्धनविषयक सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या पंप चालकांवर होणार कारवाई : राहुल कुमार मीना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ५ मे :** जिल्ह्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही, काही पेट्रोल पंप चालकांकडून विनाकारण पंप बंद ठेवले जात असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. ग्राहकांना इंधन नाकारून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा हा प्रकार सार्वजनिक हिताला बाधा आणणारा असून, याची गंभीर दखल घेत प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मिना यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांसाठी नियमावली जाहीर केली आहे. त्यांनी जिल्ह्यातील पेट्रोलपंप धारकांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेवून याबाबत सूचना दिल्या आहेत.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्यासह पेट्रोलपंप चालक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पेट्रोलपंप चालकांनी साठा उपलब्ध असताना कोणत्याही परिस्थितीत विक्री बंद ठेवू नये. तसेच ग्राहकांना इंधन देण्यास कोणत्याही परिस्थितीत नकार देऊ नये. इंधनाची मर्यादित विक्री करणे किंवा कारणाशिवाय अडथळे निर्माण करणे टाळावे. शासनाने ठरवून दिलेल्या विहित वेळेत पंप नियमित सुरू ठेवावेत. पंपावर दर्शनी भागात इंधनाचे दर स्पष्टपणे दिसतील असे फलक लावावेत. स्टॉक आणि विक्रीची नोंद रोजच्या रोज अपडेट असावी आणि तपासणी अधिकाऱ्यांना सर्व नोंदवह्या उपलब्ध करून द्याव्यात. साठा लपविणे किंवा मुद्दाम टंचाई निर्माण करणे हे नियमांचे उल्लंघन मानले जाईल. पंपावर सीसीटीव्ही प्रणाली २४ तास कार्यरत असावी आणि त्याचे रेकॉर्ड प्रशासनास उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना सर्व पेट्रोलपंप चालकांना यावेळी देण्यात आल्या.

यानुसार अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर विशेष पथके गठीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी, सहायक पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षक किंवा सहायक महसूल अधिकारी आणि सदस्य म्हणून संबंधित पुरवठा विभागाचे लिपिक-टंकलेखक यांचा समावेश करण्यात आला आहे. ही पथके आपापल्या कार्यक्षेत्रातील पेट्रोल पंपांची अचानक तपासणी करतील.

तपासणी दरम्यान जर एखादा पेट्रोल पंप चालक दोषी आढळला, तर त्यांच्यावर केवळ आर्थिक दंडच नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पेट्रोलियम नियम २००२, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५, भारतीय नागरिक सुरक्षा २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदींनुसार कडक कारवाई केली जाईल. या आदेशाची प्रत सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली आहे. जिल्ह्यातील तेल कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्सनाही या मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून देण्यात आली.

## व्हीएस पँथर्सच्या ७ व्या सामूहिक विवाह सोहळ्याची लातुरात जय्यत तयारी : विनोद खटके

**तभा वृत्तसेवा**




**लातूर दि. ५ मे :** व्हीएस पँथर्स युवा संघटन महाराष्ट्र राज्यच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून लातुरात येत्या दि. १० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सातव्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण झाल्याची माहिती व्हीएस पँथर्सचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

आपणही समाजाचे काही देणे लागतो, या भावनेने प्रेरित होऊन मागच्या सलग सात वर्षांपासून अशा प्रकारच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. आतापर्यंत २०० ते २२५ सर्वधर्मीय सामूहिक विवाह करून देण्यात आले आहेत.यावर्षीच्या विवाह सोहळ्यात एकूण ३५ वधू - वरांचे विवाह लावून दिले जाणार आहेत. यामध्ये मुल्सिम दोन, बौद्ध १८ तर हिंदू समाजातील १५ वधू - वरांचा समावेश आहे. वधू - वरांना मणी मंगळसूत्र, विवाहाच्या चा पेहरावांसह संसारोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात येणार असल्याचे विनोद खटके यांनी सांगितले.

हा विवाह सोहळा लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या भव्य मैदानावर रविवारी सायंकाळी आठ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ, लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खा. डॉ. शिवाजीराव काळगे, यांच्यासह माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यू पवार, माजी मंत्री आ. संजय बनसोडे, माजी मंत्री आ. अमित देशमुख, आ. रमेशआप्पा कराड, शिक्षक आमदार विक्रमबप्पा काळे, एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आदी मान्यवरांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. या सर्वधर्मीय विवाह सोहळ्यास हजारोंच्या संख्येने वऱ्हाडी मंडळी उपस्थित राहणार असून त्या सर्वांच्या सुरुची भोजनाची सोय करण्यात आली आहे . या सोहळ्यासाठी येणाऱ्या लोकांच्या वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था जुन्या रेल्वे लाईनलगतच्या विलासराव देशमुख रस्त्याच्या बाजूने करण्यात आली आहे. वाहतुकीचा खोळंबा होणार नाही, याची सर्वतोपरी काळजी आमच्या स्वयंसेवकांकडून घेतली जाणार असल्याचे खटके यांनी सांगितले. प्रतिवर्षाप्रमाणे होणाऱ्या या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यास लातूरकरांनी उपस्थित राहून वधू - वरांना शुभाशीर्वाद द्यावेत,असे आवाहनही विनोद खटके यांनी केले आहे.

याप्रसंगी व्हीएस पँथर्सचे प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के यांच्यासह संपर्क प्रमुख आनंद जाधव,मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे, रवि कुरील, विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रितम दंडे , कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ शहराध्यक्षअसद शेख,विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

लातूर : व्हीएस पँथर्स युवा संघटन महाराष्ट्र राज्यच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीदिनाचे औचित्य साधून लातुरात येत्या दि. १० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सातव्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण झाल्याची माहिती व्हीएस पँथर्सचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

आपणही समाजाचे काही देणे लागतो, या भावनेने प्रेरित होऊन मागच्या सलग सात वर्षांपासून अशा प्रकारच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. आतापर्यंत २०० ते २२५ सर्वधर्मीय सामूहिक विवाह करून देण्यात आले आहेत.यावर्षीच्या विवाह सोहळ्यात एकूण ३५ वधू - वरांचे विवाह लावून दिले जाणार आहेत. यामध्ये मुल्सिम दोन, बौद्ध १८ तर हिंदू समाजातील १५ वधू - वरांचा समावेश आहे. वधू - वरांना मणी मंगळसूत्र, विवाहाच्या चा पेहरावांसह संसारोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात येणार असल्याचे विनोद खटके यांनी सांगितले.

## मोदींच्या नेतृत्वाखाली भारत महासत्ता बनेल

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ५ मे : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारत महासत्ता बनेल असा विश्र्वास माजी या. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला आहे.

पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, पुद्दुचेरी या राज्याच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले. भाजपा नेतृत्वावरील टिकेला जनतेने मतपेटीतून सडेतोड उत्तर दिले आहे. भाजपासाठी हा दिवस एक ऐतिहासिक दिवस आहे. मतदारांनी विकास, प्रगती, स्थैर्य आणि शांततेसाठी मतदान केले आहे. हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आहे. या शताब्दी वर्षात पूजनीय शामाप्रसाद मूखर्जी यांच्या जन्मभूमित भाजपाचा विजय हा सर्वार्थाने ऐतिहासिक असल्याचे माताही त्यांनी व्यक्त केले आहे.

## मांजरा महाविद्यालयात महाराष्ट्रदिन साजरा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ५ मे :** येथील मांजरा महाविद्यालयात बुद्ध पौर्णिमा, कामगारदिन आणि महाराष्ट्र दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा. पी. टी. पवार होते. यावेळी डॉ. धर्मवीर बारसऴे, प्रा. नवनाथ भंडारे, प्रा. पूनम शिंदे, प्रा. अंजली हाम्पल्ले, मुक्ता दुधाळे, रामचंद्र जाधव, परमेश्र्वर शिंदे, पिराजी बोईनवाड यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूरमध्ये विद्यार्थ्यांचे सर्जनशील प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. ५ मे :** येथील दयानंद आर्किटेक्चर महाविद्यालय व इंटेरिअर डिझाईन महाविद्यालयाच्यावतीने गणेश हॉलमध्ये विद्यार्थ्यांचे प्रदर्शन सुरू आहे. याचे उद्घाटन आर्किटेक्ट अँड सिव्हिल इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष रमेश घोलप यांच्या हस्ते झाले.

यावेळी लातूर इंटेरिअर डिझाईन असोसिएशनचे अध्यक्ष प्रसाद बावगे, सचिव मुकेश राजमाने, आर्किटेक्टच्या प्राचार्याप्रीती पटवारी, दिनेश ढेकणे, पल्लवी मंत्री, विजयकुमार सुतार, पायल मुसमाडे, अभियंता मेघा सरवदे, किशोर शिखरे, साक्षी मलूरवार, डिझायनर रवी जोगदंड, नसरीन शेख, ग्रंथपाल वसुधा अंभोरे, अधीक्षक सतीश माशाळकर, हर्षद बेरकिले, चैतन्य फावडे उपस्थित होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आर्किटेक्चरल डिझाईन्स, विविध मॉडेल्स, इंटेरिअर डिझाईन प्रोजेक्ट्स व सर्जनशील कलाकृती सादर केल्या. हे प्रदर्शन ६ मेपर्यंत सुरू राहणार आहे. भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अनघा अंधोरीकर यांना होळकर पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. ५ मे :** येथील अनघा अंधोरीकर यांना शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत देण्यात येणारा २०२१-२२ चा पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्रदिनाच्या कार्यक्रमात येथील पोलीस मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात याचे वितरण करण्यात आले. अनघा अंधोरीकर यांनी विविध सामाजिक उपक्रम, महिला सक्षमीकरण, गरजू घटकांना मदत, समाजहिताच्या कार्यातून केलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल विविध क्षेत्रांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## गोरमाटी भास्या सब्दकोस चा आज प्रकाशन सोहळा

**तभा वृत्तसेवा लातूर, दि. ५ मे :** बळीराम रुपचंद जाधव लिखित गोरमाटी भास्या सब्दकोस पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्याचे बुधवारी आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार, ६ मे, २०२६ रोजी दुपारी ४ वाजता वाडा बँक्वेट हॉल, छत्रपती संभाजी महाराज चौक, लातूर-औसा हायवे, लातूर येथे पोहरादेवी संस्थानचे धर्मगुरु शेखर महाराज यांच्या अध्यक्षस्थानी असणाऱ्या कार्यक्रमात हा प्रकाशन सोहळा होणार आहे. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते पुस्तकाचे विमोचन होणार आहे. या कार्यक्रमास माजी प्राचार्य तथा ख्यातनाम साहित्यिक प्रा. डॉ. गणपत राठोड, सेवानिवृत्त तहसीलदार एल.टी. चव्हाण यांची प्रकाशन सोहळ्यास उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास समाजातील विविध स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,असे आवाहन करण्यात आले आहे

## डिजिटल युगात ग्रंथालयाकडे वळा; चांगल्या करिअरसाठी वाचन आवश्यक : वंदना काटकर

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. ५ मे :** डिजिटल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे युवक ग्रंथालयापासून दूर जात असून अभ्यासासाठीचा मौल्यवान वेळ मोठ्या प्रमाणात मोबाईलवर खर्च होत आहे. त्यामुळे जीवनात उत्तम करिअर घडवायचे असेल, तर ग्रंथ आणि ग्रंथालयाशी जवळीक निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी केले,

एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ग्रंथालय समिती व आयपीआर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक पुस्तक व कॉपीराईट दिना' निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संचालक प्रा. तेजस कराड, ओरल पॅथॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. वर्षा सांगळे, ग्रंथालय चेअरमन डॉ. महेश दडपे, प्राचार्य डॉ. सिंगारा वेलन, प्राचार्य स्वाती एवंदगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आज मोबाईल, सोशल मीडिया आणि विविध डिजिटल माध्यमांमुळे युवकांची माहिती मिळवण्याची पद्धत बदलली आहे. माहिती सहज उपलब्ध होत असली तरी त्याचा सखोल अभ्यास, चिंतन आणि विश्र्वेषण करण्याची सवय मात्र कमी होत चालली आहे. मोबाईलवर मिळणारी माहिती बहुधा क्षणिक आणि अपूर्ण असते, तर ग्रंथ वाचनातून ज्ञान अधिक व्यापक, सखोल आणि दीर्घकाळ टिकणारे मिळते, असे सांगून काटकर म्हणाल्या की, चांगले करिअर घडवण्यासाठी केवळ परीक्षा पास होणे पुरेसे नसून व्यक्तिमत्त्व विकास, विचारांची परिपक्वता आणि निर्णयक्षमता विकसित होणे आवश्यक आहे. हे सर्व गुण नियमित वाचनातूनच विकसित होतात, ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे संकलन नसून ते ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचे केंद्र आहे. येथे मिळणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी एकाग्रता विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरव अत्कृष्ट ग्रंथालय उपयोगिता पारितोषिक शिक्षक वर्गातून डॉ. स्फूर्ती जोशी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांमधून डॉ. अंजली वशिष्ठ आणि पदवीपूर्व विद्यार्थ्यांमधून आकांक्षा गिरी यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात निबंध व कविता लेखन स्पर्धा, तर पीकेसीएन महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच 'ग्रंथालय स्टार' हा वार्षिक पुरस्कार बीएससी नर्सिंग व जीएनएम वर्गातील विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी डॉ. वर्षा सांगळे यांनी कॉपीराईट विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले, अध्यक्षीय समारोपात प्रा. कराड म्हणाले की, ग्रंथालय हे वाचक आणि पुस्तक वांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. विद्यार्थ्यांनी लेखन करून त्याचे कॉपीराईट घेण्याचे आवाहन त्यांनी केले. संत ज्ञानेश्र्वरांच्या जीवनाचा संदर्भ देत त्यांनी 'ज्ञानेश्र्वरी' सारख्या अमूल्य ग्रंथनिर्मितीचा उल्लेख केला आणि विद्यार्थ्यांनीही चिरंतन कार्य करण्याचा प्रयत्न करावा, असे आवर्जून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पेशीमाम यांनी केले.

## धिरज देशमुख यांच्याकडून डॉ. आंबेडकर पुतळा सुशोभीकरण कामाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. ५ मे :** मुरूड येथे उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा सुशोभीकरण कामाची लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी दि. ४ मे रोजी पाहणी केली. आमदार म्हणून कार्यरत असताना त्यांनी या महत्त्वपूर्ण कामास मंजुरी देत आवश्यक असलेला २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता.

मुरूडच्या मध्यवर्ती ठिकाणी साकारत असलेले हे स्मारक भविष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा देणारे महत्त्वपूर्ण शक्तिस्थान ठरणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. पाहणीदरम्यान सुशोभीकरणाच्या कामामध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्याने संबंधित अधिकारी व ठेकेदारांच्या निदर्शनास त्या बाबी आणून देत आवश्यक सूचना करण्यात आल्या. लाखो अनुयायांची आस्था आणि प्रेरणास्थान असलेल्या या ठिकाणाचे काम अत्यंत दर्जेदार, सुबक व उल्लेखनीय व्हावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा राहणार असल्याचेही माजी आमदार धिरज देशमुख यांनी नमूद केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, अनंत कणसे, डॉ. दिनेश नवगीरे, उध्दव सवासे, दीपक पटाडे, ईश्र्वरप्रसाद चांडक, रामानंद जाधव, समाधान गायकवाड, जनक गायकवाड, नितीन जाधव, राजेसाहेब सवई, अमोल देडे, दीपक काळे, सारिकाताई फेरे, राणीताई खोडसे, ऋषीकेश मुटकुळे, निलेश फेरे, मुकेश सवासे, संजय अंधारे, शरीफ सय्यद, विरसेन भोसले, उत्तम चव्हाण, प्रशांत पिंपरे, शाम ईटकर, गौतम लांडगे, सुरज कांबळे, अमोल गाडे, चैतन्य पटाडे, सुभाजी कुंभार आदी उपस्थित होते.

## जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. ५ मे :** लातूर जिल्हा पोलीस दलाने अवैध धंद्यांविरोधात सुरू ठेवलेल्या कठोर मोहिम अंतर्गत दिनांक ३ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील भांबरी शिवारात घाड टाकत 'तिर्रट' नावाच्या जुगार अड्ड्यावर कारवाई करत पाच जणांना रंगेहात पकडले असून, २ लाख १७ हजार ६० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वातील पथकाने भांबरी शिवारातील एका शेतात नारळाच्या झाडाखाली बेकायदेशीर जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने दि. ३ में रोजी सायंकाळी ५.१० वाजण्याच्या सुमारास, वरून माहितीची शहानिशा करून सायंकाळी ५.४० वाजता संबंधित ठिकाणी धाड टाकण्यात आली.

छाप्यात पाच जन गोलाकार बसून 'तिर्रट' नावाचा जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्वरित सर्वांना ताब्यात घेत पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, मोबाईल हँडसेट, जुगाराचे साहित्य, मोबाईल, वाहन असा २ लाख १७ हजार ६० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईत शाबाज हमीद शेख (रा. वसवाडी पाखरसांगवी), इंजमाम धुरेखा पठाण (रा. जाफर नगर), सागर जयद्रथ जाधव (रा. खाडगाव रोड), अविनाश आनासाहेब बनसोडे (रा. पटेल नगर), आसिफ अय्युब उमाटे (रा. खाडगाव रोड) हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीररीत्या तिर्रट जुगार खेळत व खेळवत असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) अन्वये पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कारवाई पथकामधील पोउपनि अमर केंद्रे, पोलीस अंमलदार, साहेबराव हाके, अर्जुनसिंग राजपूत, रियाज सौदागर, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, प्रविण कोळसुरे यांनी केले आहे.

# टेंडर एकाच्या नावे अन् वाळू उपसा करतो दुसराच

## शिऊर येथील वाळू घाटावर मोठ्या प्रमाणात वाळू चोरी

**तभा वृत्तसेवा श्रीशेल्य बिराजदार**

**निलंगा दि. ५ मे :** महसूल प्रशासनाकडून लिलाव करण्यात आलेल्या तालुक्यातील शिवूर येथील वाळू घाटावरच्या वाळूची अनाधिकृत व्यक्तीकडून वाळू चोरी असून होत या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कडक कारवाई करावी अशी मागणी अधिकृत टेंडर वाचकांकडून तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

तालुक्यात अवैध वाळू तस्करी करून मोठ्या प्रमाणात पैसा कमावण्यचे प्रकार सध्या वाढले असून चोरट्या मार्गाने होणारे वाळू उत्खनन रोखण्यासाठी प्रशासनाकडून अनेकदा प्रयत्न करूनही कांहीच उपयोग होत नाही. मांजरा व तेरणा नदीपत्रातील वाळू चोरी ही बाब नित्याचीच झाली आहे. वाळू उपसा करण्याचे अधिकृत टेंडर सुटल्यानंतरही त्या वाळूवर अनाधिकृत व्यक्तीकडून 'डल्ला' मारत असल्याचा प्रकार शिऊर ता. निलंगा येथील वाळू घाटावर उघड झाला असून अधिकृत ठेकेदारानी थेट याबाबत तहसीलदाराकडे तक्रार केली असून याबाबत अद्याप कोणतीही कारवाई केली जात नसल्यामुळे माझे वाळू लिलावात भरलेले पैसे परत द्या अशी मागणी त्यांनी थेट जिल्हाधिकारी कडे केली आहे. लाखो रुपये अधिकृत टेंडर सुटल्यानंतर भरूनही वाळू मिळत नसेल तर काय उपयोग असा हताश सवाल त्यांच्याकडून केला जात आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला थेट केराची टोपली दाखवण्यात येत आहे. सध्या मोठ्या प्रमाणात निलंगा तालुक्यात वाळू चोरीचा प्रकार सुरू असल्यामुळे याला प्रशासनाचे अभय असल्याची उलट सुलट चर्चा सुरू आहे.

निलंगा तालुक्यातून मांजरा व तेरणा नद्या वाहतात या दोन्ही नद्यावर जवळपास २० ते २२ वाळू घाटाचे ठिकाण असून त्यामध्ये गिरकचाळ, शिरोळ, मानेजवळगा, औरादशहाजानी, शिऊर, सावरी, बामणी हे घाट अतिशय संवेदनशील आहेत. तरीही येथील वाळू चोरी थांबलेली नाही. याबाबत स्थानिक तलाठी, मंडळ आधिकारी व वाळू माफियांचे लागेबांधे असल्यामुळे सर्रासपणे चोरीचे प्रकार राजरोसपणे सुरू आहेत. शिवाय मांजरा व तेरणा घाटावरील वाळू चोरीबाबत अनेक वेळा वरिष्ठ पातळीवर तक्रारी करूनही त्याचा काहीच उपयोग होत नाही. या प्रकारामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. तरीही प्रशासनाला याचे गांभीर्य लक्षात येत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

## अधिकृत टेंडर धारकांनी केली तहसीलदाराकडे तक्रार

सध्या मांजरा व तेरणा या दोन्ही नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा असतानाही बोटीद्वारे (परवानगी नसताना) येथे बोटीद्वारे वाळू उपसा सुरू आहे. केवळ कागदोपत्री कारवाई दाखवण्यासाठी महसूल प्रशासनाकडून तीन-चार महिन्याला एक दोन बोटी उडवल्याच्या प्रकार सर्वश्रुत झाला आहे. शिऊर ता. निलंगा येथील घाट क्रमांक दोनचा शासनाकडून अधिकृत लिलाव जाहीर करण्यात आला असून पटेल ट्रेडर्स शिऊर यांनी सर्वोच्च बोली बोलल्याने त्यांना बावीस लाख २९ हजार ८०० रुपयांना बहाल करण्यात आला असून हि प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन पध्दतीने पूर्ण झाली आहे. मात्र धनेगाव ता. देवणी येथील कुमार रविंद्र पाटिल यांच्याकडून राजरोसपणे अवैध मार्गाने माझ्या लिलाव क्षेत्रातील वाळूची उचल करून विक्री करत आहेत. याबाबतची विचारणा केली असता नदी तुझ्या बापाची नाही.. तू टेंडर घेतला म्हणून काय झाले अशी दमबाजी करून वाळू घेऊन जात असल्याची तक्रार तहसीलदाराकडे केली आहे ही तक्रार देऊन महिना उलटला तरी अद्याप महसूल प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झाली नाही त्यामूळे माझे डिपॉझिट व भरलेले पैसे परत द्यावे अशी मागणी पटेल ट्रेडर्सचे मालक महामुद पटेल यांनी थेट जिल्हाधिकाऱ्याकडे केली आहे. ऑनलाइन पद्धतीने चलन भरून वाळू उचलण्याचा अधिकार फक्त मला असताना चोरट्या मार्गाने दमदाटी व अरेरावी पणा करत अवैधरित्या वाळूचा उपसा केला जात असल्याचे त्यांची तक्रार आहे. याबाबत अद्याप कोणतेही कारवाई झाली नाही

# संक्षिप्त...

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ५ मे :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ५ मे, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १९ मे, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## कै. नामदेवराव सटवाजी गायकवाड बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सन्मानित



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. ५ मे :** महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणात मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी आयोजित समारंभात पालकमंत्री, मा.ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते उदगीर येथील कै. नामदेवराव सटवाजी गायकवाड बहु. सेवाभावी संस्था उदगीर यांना सन २०२४-२०२५ चा जिल्हा युवा पुरस्कार देण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना,जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कासगावडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानवतेचा संदेश देणारा तेजस्वी दीप म्हणजे बाबासाहेब राहुल : केंद्रे



**तभा वृत्तसेवा**

लोहारा **दि. ५ मे :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लोहारा गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे बोलत होते.

ते म्हणाले की, समतेचा आणि मानवतेचा संदेश देणारा तेजस्वी दीप म्हणजे बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांनी दिलेल्या शिक्षण, स्वाभिमान आणि हक्कांच्या लढ्यामुळे समाजातील वंचित घटकांना नवे आयुष्य मिळाले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांचे विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे असून समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमास गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांनी बाबासाहेबांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प केला. यावेळी सरपंच महादेवी कांबळे व्यंकटराव पाटील विजयकुमार कांबळे दयानंद सोनटक्के प्रकाश हैबतपुर मोहन पाटील दयानंद सोनटक्के चंद्रकांत भारमोडे बबन धनबा उपस्थित होते

## अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या मेळाव्यात कामगारांच्या प्रश्नांवर मंथन

**तभा वृत्तसेवा**

लातूर **दि. ५ मे :** महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या परिश्रमातून कामगारांच्या हिताचे झालेले कायदे आजचे भाजपचे केंद्र आणि राज्यातील सरकार कामगार कायदे रद्द करून कामगारांना गुलाम करून त्यांची मुस्कटदाबी करत आहे. त्याविरोधात कामगारांनी पेटून उठण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र काँग्रेचे प्रवक्ते हनुमंत पवार यांनी लातूर येथे केले.

लातूर येथे अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या दगडोजीराव देशमुख सभागृहात आयोजित जिल्हा कामगार मेळाव्यात ते बोलत होते.

## रमेश पाटील यांच्या पुढाकाराने शेतकऱ्याच्या अडचणीवर तात्काळ उपाय योजना

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि. ५ मे :** तालुक्यातील चापोलीजवळील महादेववाडी येथे एका शेतकऱ्याचे चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गंभीर समस्येचे समाधान अखेर रमेश पाटील यांच्या पुढाकारातून तात्काळ करण्यात आले.शेतकरी विश्र्वंभर गोविंद कांबळे यांच्या शेतातून गेल्या चार वर्षांपासून विद्युत लाईन खालैन गेल्यामुळे शेतीचे कामे करणे अडचणीचे होत होते व मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याची हानी व नुकसान होत होती.या समस्येमुळे संबंधित शेतीक्षेत्र जमीन पडीक पडत होती, मात्र प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार होती.पण याकडे दुर्लक्ष होत होते.दरम्यान,ही बाब शेजारील गंगाधर बावचे यांच्या निर्दशनास आल्यानंतर त्यांनी तात्काळ भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचे गांभीर्याने दखल घेत रमेश पाटील यांनी त्वरित महावितरण (चडएइ) अधिकाऱ्यांशी संपर्क साधून संबंधित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



रमेश पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे अवघ्या दोन दिवसांत प्रशासनाने कार्यवाही करत विद्युत लाईनची समस्या दूर केली. त्यामुळे शेतकरी विश्र्वंभर कांबळे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

रमेश पाटील हे नेहमीच शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांवर तत्परतेने काम करत असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले व आहे.

त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

याबाबत दै.सोलापूर तरूण भारतच्या प्रतिनिधीशी बोलताना शेतकरी विश्र्वंभर कांबळे म्हणाले, की मी मागील चार वर्षांपासून अडचणीत होतो, मात्र कोणीच दखल घेत नव्हते. रमेश पाटील यांनी तात्काळ अधिकार्यांशी संपर्क साधून माझी मदत केली आणि शेतीतील अडचण दूर करून आमचे मोठं ओझं हलकं केलं.

त्यांच्या सारखं समाजाभिमुख नेतृत्व आमच्यासाठी आधार आहे.

## पोटच्या मतीमंद लेकीवर अत्याचार करणारा नराधम बाप जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. ५ मे :** रक्षणकर्ताच जेव्हा भक्षक बनतो, तेव्हा माणुसकी नेमकी कुठे शोधावी? असा संतप्त सवाल जळकोट तालुक्यातील माळहिप्परगा येथील घटनेने उपस्थित केला आहे. एका मतीमंद अल्पवयीन मुलीची हतबलता पाहून तिचा सांभाळ करण्याऐवजी, तिच्यावर वारंवार पाशवी अत्याचार करणाऱ्या तिच्या सख्ख्या नराधम बापाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या नराधमाच्या कृत्यामुळे ती निष्पाप मुलगी आता १९ आठवड्यांची गरोदर असून, या घटनेने संपूर्ण समाजात संतापाची लाट उसळली आहे..

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी जन्मतःच मतीमंद आहे. तिला जगाची समज नाही, स्वतःची व्यथा मांडता येत नाही, याचाच फायदा या नराधम बापाने घेतला. माहे डिसेंबर २०२५ पासून तो तिच्यावर सतत अत्याचार करत होता. पोटच्या पोरीला त्याने आपल्या वासनेची शिकार बनवले. जेव्हा मुलीच्या शरीरातील बदलांमुळे ती गरोदर असल्याचे उघड झाले, तेव्हा पीडितेच्या आईने दिनांक १७/०४/२०२६ रोजी रात्री २३.०० वाजता जळकोट पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

सुरुवातीला गुन्हा अज्ञात व्यक्तीविरुद्ध दाखल झाला होता, मात्र तपासात समोर आलेले सत्य ऐकून संपूर्ण जिल्हा सुन्न झाला आहे. , डी . वाय .एस.पी रायबोले यांच्या पथकाची मोठी कारवाई मुलगी मतीमंद असल्याने पोलिसांपुढे तपासाचे मोठे आव्हान होते. मात्र, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून विविध पथके तयार केली. व स्वताहाः या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून त्यांनी अत्यंत शिताफीने आणि कौशल्याने तपास करत या गुन्ह्यातील खरा गुन्हेगार हा मुलीचा बापच असल्याचे शोधून काढले. ३ मे रोजी या नराधम बापाला अटक करण्यात आली असून त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत.

बाप-लेकीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळे जनमानसात प्रचंड संताप आहे. ज्या हातांनी लेकीला आधार द्यायचा, त्याच हातांनी तिचे आयुष्य उद्ध्वस्त केले, अशा शब्दांत ग्रामस्थ आपली चीड व्यक्त करत आहेत.

अशा विकृत मानसिकतेच्या नराधमाला कठोरात कठोर शासन व्हावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात गु.र.न ९९/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६३ (६), ६४ (२)(आय), ६४ (२)(एम) आणि पोक्सो कायदा २०१२ चे कलम ३, ४, ५ (जे)(२), ५ (एल) अन्वये गुन्हा दाखल आहे. सपोनि एस. बी. माचेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करीत आहेत .

## पत्रकाराच्या मुलीच्या शिक्षणासाठी मदतीचे हजारो हात सरसावले!

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. ५ मे :** समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर केल्यास एखाद्या गरजू कुटुंबाचे आयुष्य कसे बदलू शकते, याचा प्रत्यय लातूर जिल्ह्यात आला आहे. अर्धांगवायूने आजारी असलेले पत्रकार भीमसेन सरकटे यांच्या कन्या मानसी हिच्या बी.टेक शिक्षणासाठी 'निलंगा नगरी' व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून आर्थिक मदतीचा ओघ सुरू झाला असून, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष जाधव यांनी मानसीला महाविद्यालयीन प्रवासासाठी नवीन स्कुटी देऊन एक मोठा आधार दिला आहे.

संभाजीनगर येथील एका दैनिकात आवृत्ती प्रमुख म्हणून कार्यरत असलेले पत्रकार भीमसेन सरकटे हे गेल्या काही दिवसांपासून अर्धांगवायूच्या आजारामुळे अंथरुणाला खिळून आहेत. सध्या ते संभाजीनगर येथे वास्तव्यास आहेत.घरातील कर्ता पुरुष आजारी असल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे. अशा परिस्थितीत त्यांची मुलगी मानसी ही छत्रपती संभाजीनगर येथील एका नामवंत महाविद्यालयात बी.टेकच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. मात्र, फी भरण्यासाठी पैसे नसल्याने तिच्या शिक्षणात मोठा अडथळा निर्माण झाला होता.सरकटे कुटुंबाची ही व्यथा वृत्तसंपादक महादेव कुंभार यांनी 'निलंगा नगरी' या व्हॉट्सप ग्रुपवर मांडली. ग्रुपचे डमिन पत्रकार माधव पिटले यांनी तात्काळ या विषयाची दखल घेत ग्रुपमधील सर्व सदस्यांना मानसीच्या शिक्षणासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रुपमधील सदस्यांनी भीमसेन सरकटे यांच्या खात्यावर मदतीचा वर्षाव केला. समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर केल्यास एखाद्या गरजू कुटुंबाचे आयुष्य कसे बदलू शकते, याचा प्रत्यय लातूर जिल्ह्यात आला आहे. अर्धांगवायूने आजारी असलेले पत्रकार भीमसेन सरकटे यांच्या कन्या मानसी हिच्या बी.टेक शिक्षणासाठी 'निलंगा नगरी' व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून आर्थिक मदतीचा ओघ सुरू झाला असून, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष जाधव यांनी मानसीला महाविद्यालयीन प्रवासासाठी नवीन स्कुटी देऊन एक मोठा आधार दिला आहे.

## समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९९:४७ टक्के

### विज्ञान मध्ये विशेष प्राविण्य ११६, प्रथम ७० तर कला शाखेत ४९ विद्यार्थी प्रथम



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. ५ मे :** तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी/मार्च २०२५६ च्या बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९९.४७ टक्के लागला आहे. विशेष म्हणजे ११६ विद्यार्थी विशेष प्राविण्यात तर ७० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तर कला शाखेत ४९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेतून राधा रामदास याचावाड हि ८८:०५ टक्के गुण घेत सर्व प्रथम आली आहे. यश किरण हाळीघोंगडे हा ८७:१७ टक्के गुण घेऊन व्दितीय आला आहे. तर समीक्षा उमाकांत मटके ही ८६:०५ टक्के गुण घेत तृतीय आली आहे. विज्ञान शाखेत एकूण १९० विद्यार्थी परिक्षेस बसले होते. पैकी ११६ विद्यार्थी विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झाले आहेत. ७० प्रथम श्रेणीत तर ०३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा शेकडा निकाल ९६:७२ टक्के लागला असून शामाबाई हानमंत केसाळे ही ७२:६७ टक्के गुण घेत प्रथम आली आहे. प्रतिक्षा अंतराम डोईफोडे ही ७१:५० टक्के गुण घेऊन द्वितीय आली आहे. तर सायली विनायक डोईफोडे ही ६९:६७ टक्के गुण घेत तृतीय आली आहे. कला शाखेत एकूण १२५ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून प्रथम श्रेणीत ४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ६६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ०३ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. एम.सी.व्ही.सी. (व्होकेशनल कोर्स) साठी एकूण २४ विद्यार्थी परीक्षेस बसले असून शेकडा निकाल ९५: ६५ टक्के लागला आहे. प्रथम श्रेणीत १६ तर द्वितीय श्रेणीत ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, सहसचिव प्रणयन चौधरी, संस्था सदस्य प्रयास चौधरी, प्रा. एम. व्ही. स्वामी, जेष्ठ प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण याच्यांसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## पंचायतराज मूल्यमापन समितीवर पत्रकार बिभीषण मद्देवाड यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. ५ मे :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या अंतर्गत पंचायत समिती पातळीवरील उत्कृष्ट ग्रामपंचायतला पुरस्कार दिला जातो. या ग्रामपंचायतीची पाहणी करण्यासाठी तालुकास्तरावर समिती गठित करण्यात येते, उदगीर पंचायत समितीमध्ये देखील गटविकास अधिकारी श्री मेडेवार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय मूल्यमापन समिती स्थापन करण्यात आली असून,



या समितीवर करमाळा तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीचे मूल्यमापन करणाऱ्या महत्त्वपूर्ण अशा समितीवर एकमतचे उदगीर तालुका प्रतिनिधी बिभीषण मद्देवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षत खाली तालुकास्तरीय मूल्यमापन समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून गटविकास अधिकारी श्री मेडेवार यांनी सदस्य म्हणून विस्तार अधिकारी पंचायत, विस्तार अधिकारी सांख्यिकी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, वरिष्ठ सहाय्यक पंचायत समिती यांचा या पथकामध्ये समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाच्या तालुकास्तरीय मूल्यमापनासाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती, उदगीर यांना पंचायत समिती, करमाळा जि. सोलापूर ही निश्रि्चत करुन देण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायतचे मूल्यमापन करणाऱ्या समितीवर पत्रकार बिभीषण मद्देवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, पंचायत समितीचे सभापती वनमाला मरलापल्ले, उपसभापती बापूसाहेब भोसले, अखिल भारतीय मराठी पत्रकार परीषदेचे विभागीय सचिव सचिन शिवशेट्टे, व्हि एस कुलकर्णी, रविंद्र हसरगुंडे, उदगीर तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष युवराज धोतरे, पत्रकार हल्ला विरोधी कृषी समीतीचे निमंत्रक अर्जुन जाधव, डिजिटल मिडीयाचे जिल्हा सचिव सिध्दार्थ सुर्यवंशी,रसुल दा पठाण, विनायक चाकुरे , सुनिल हावा, लक्ष्मण बेंबडे,विक्रम हलकीकर, इरफान शेख, तालुकाध्यक्ष बस्वेश्रृवर डावळे, महादेव रोडगे, विश्र्वनाथ गायकवाड, प्रभुदास गायकवाड, सुधाकर नाईक, मंगेश सुर्यवंशी, संदीप निडवदे, मनोहर लोहारे, शिवाजी शिंदे, हणमंत केंद्रे, नागनाथ गुट्टे, अनिल जाधव, श्रीधर सावळे, बालाजी कसबे,बबन कांबळे,आदिंनी अभिनंदन केले आहे.

## जागतिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून प्रगती केल्यास भारत महासत्ता बनेल : कव्हेकर

**तभा वृत्तसेवा**

लातूर **दि. ५ मे :** जगामध्ये विविध क्षेत्रात आश्चर्यकारक बदल घडत आहेत. ए.आय. विविध क्षेत्रात मानवापेक्षा मोठ्या गतीने परिवर्तन घडवत आहे. रोबोटेक, सौरऊर्जा, इलेक्ट्रिकल व्हेईकल बदलाचा स्वीकार भारत देश मोठ्या प्रमाणावर करत आहे. जगात सर्वाधिक तरुण व हुशार तरुण भारतात आहेत. त्यांच्या कार्यातून भारत महासत्ता बनेल, असे अभ्यासपूर्ण विचार माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी मांडले.

यावेळी ते शिवाजी विद्यालय बिटरगाव ता.रेणापूर जि.लातूर या शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण यांच्या हॉटेल वैष्णव, नवीन रेणापूर नाका, लातूर येथे आयोजित सेवापूर्ती गौरव सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला जेएसपीएम शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, शिक्षणाधिकारी संजय क्षिरसागर, उपशिक्षणाधिकारी सुशिल फुलारी, मुख्य लेखा अधिकारी शिक्षण विभाग संतोष धुमाळे, नगरसेविका आदितीताई अजित पाटील कव्हेकर, नगरसेविका सत्यवती चेवले, संगिता चव्हाण, जेएसपीएम समन्वयक बापूसाहेब गोरे, अप्पासाहेब पाटील, अनिरूध्द पाटील, विनोद जाधव, डॉ.वेदिका चव्हाण, वैभवी चव्हाण, हंसराज देशमुख, विष्णू पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## रस्त्याच्या वादातून मारहाण; चाकूने हल्ला करून तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

कळंब तालुक्यातील बोरगाव बु. येथे ये-जा रस्त्याच्या वादातून झालेल्या मारहाणीच्या घटनेत तिघे जखमी झाले आहेत. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी बापू संभाजी भोजणे, किरण बापू भोजणे, सुरज बापू भोजणे, मनोज प्रभू भोजणे, पांडुरंग प्रभू भोजणे व रघुनाथ संभाजी भोजणे (सर्व रा. बोरगाव बु., ता. कळंब)

यांनी दि. २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता फिर्यादी हनुमंत रामा माळी

(वय ६२) तसेच त्यांचे भाऊ मच्छिंद्र माळी व पुतण्या अजय माळी यांच्यावर हल्ला केला.

मुरूम टाकू नका, ये-जा करण्यासाठीचा रस्ता मोकळा ठेवा, असे सांगितल्याच्या कारणावरून आरोपींनी एकत्र येत शिवीगाळ केली व लाथाबुक्यांनी तसेच चाकूने मारहाण करून तिघांना जखमी केले, असे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेप्रकरणी हनुमंत माळी यांनी दि. ४ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# बोरी धरणातील पाणी ३२ टक्क्यावर; 'अल निनो'च्या छायेत टंचाईची भीती

▶▶ कॅनॉलमधून पाणी सोडणे तात्काळ थांबवण्याची मागणी... ▶▶ पिण्यासाठी साठा आरक्षित करण्याची गरज...

**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.५ मे -**

नळदुर्ग येथील बोरी धरणातील पाणीसाठा सध्या केवळ ३२.६८ टक्क्यांवर आला असून वाढत्या उन्हामुळे तो झपाट्याने घटत आहे. त्यातच यंदाच्या पावसाळ्यात 'अल निनो'च्या प्रभावामुळे कमी पावसाची शक्यता वर्तविली जात असल्याने भविष्यात पाणीटंचाईचे गंभीर संकट ओढवण्याची भीती व्यक्त होत आहे.



गेल्या वर्षी चांगला पाऊस झाल्यामुळे बोरी धरण तुडुंब भरले होते. मात्र त्यानंतर सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर, कॅनॉलद्वारे सातत्याने सोडले जाणारे पाणी आणि वाढत्या तापमानामुळे होणारे बाष्पीभवन यामुळे साठ्यात मोठी घट झाली आहे. विशेष म्हणजे पाटबंधारे विभागाने १ जानेवारी २०२६ पासून सिंचनासाठी कॅनॉलद्वारे पाणी सोडण्यास सुरुवात केली होती आणि चार महिने उलटूनही हा पुरवठा सुरूच असल्याने साठ्यावर अधिक ताण पडत आहे.

सध्याच्या परिस्थितीतही पाण्याचा बेसुमार उपसा सुरूच असून त्यामुळे धरणातील साठा चिंताजनकरीत्या कमी होत चालला आहे.

आगामी पावसाळ्यात अपेक्षित पावसाबाबत अनिश्चितता असून 'अल निनो' सक्रिय झाल्यामुळे सरासरी पाऊस होईल की नाही याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

बोरी धरणातून नळदुर्ग, तुळजापूर, अणदूर यांसह परिसरातील पाच ते सहा लहान गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. त्यामुळे भविष्यात या भागात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करणे आणि कॅनॉलद्वारे सोडले जाणारे पाणी तात्काळ बंद करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, नळदुर्ग शहरात सध्या आठ ते नऊ दिवसांआड पाणीपुरवठा केला जात आहे. धरणात तुलनेने पाणी उपलब्ध असतानाही ही परिस्थिती असल्याने साठा आणखी घटल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

भविष्यातील संभाव्य पाणीटंचाईचा धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

## कोल्हेगाव हादरले...
# कौटुंबिक वादातून गळा दाबून खून; आरोपीचीही आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

धाराशिव : तालुक्यातील कोल्हेगाव येथे कौटुंबिक वादातून घडलेल्या धक्कादायक घटनेत एका तरुणीचा गळा दाबून खून करण्यात आला असून त्यानंतर आरोपीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी श्रीकृष्ण तुकाराम टेकाळे (वय २७, रा. कोल्हेगाव) यांनी दि. ९ सप्टेंबर रोजी पहाटे ४.४५ ते सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान साक्षी श्रीकृष्ण टेकाळे (वय २२, रा. कोल्हेगाव) हिचा कौटुंबिक वादाच्या कारणावरून गळा दाबून खून केला.



यानंतर आरोपीने स्वतःच्या शेतातील बांधावरील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी फिर्यादी सतीश शंकर शिंदे (वय ३८, रा. वाखरवाडी) यांनी दि. ४ मे २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून ढोकी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०३(१) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास ढोकी पोलिसांकडून केला जात आहे.

## शिराढोण येथे केबल वायरची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

शिराढोण पोलीस ठाण्याच्या हद्दीत खामसवाडी येथील बी.यू. भंडारी एनर्जी प्रा. लि. शाखेतून डीसी केबल चोरीप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मार्च रोजी सकाळी ८ वाजण्यापूर्वी अज्ञात चोरट्यांनी ४ स्केअर एमएम डीसी केबलचे सुमारे २,००० मीटरचे तीन ड्रम तोडून सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान केले, तसेच अंदाजे ४,५०० रुपयांचे केबल साहित्य चोरून नेले. याप्रकरणी सुपरवायझर सागर चोपाटे (रा. सुर्डी बेगडा) यांच्या फिर्यादीवरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## प्रा.विशाल गरड यांना 'राष्ट्रीय गौरव पुरस्कार'



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ मे -**

महाराष्ट्रातील ख्यातनाम लोकव्याख्यानकार प्रा.विशाल गरड यांना गोवा येथे 'राष्ट्रीय गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या वतीने आयोजित या सोहळ्यात गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. गरड यांनी प्रबोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.

पणजी येथील कला अकादमी पणजी येथे झालेल्या या कार्यक्रमास गोव्याचे सामाजिक न्याय मंत्री सुभाष फळ देसाई, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत, तसेच संघटनेचे संस्थापक राजा माने यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. गरड यांनी हा सन्मान देशातील पत्रकारांना अर्पण करत पुढील काळातही प्रबोधन चळवळीत सक्रिय योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.

या सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातील पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोयता बाळगल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

परंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना कोयता बाळगल्याप्रकरणी एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ मे रोजी गगनगिरी पेट्रोलपंपाजवळ पिंपरखेड शिवारात युवराज फुलचंद कुदळे (रा. खानापूर) याच्या ताब्यात लोखंडी कोयता आढळून आला. संबंधित शस्त्र बेकायदेशीररित्या बाळगून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी ते जप्त केले. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## महावितरणच्या उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा लातूर परिमंडळात गौरव

▶▶ जयराज बाबर 'प्रधान तंत्रज्ञ' म्हणून सन्मानित; इतर दोन कर्मचाऱ्यांनाही मानाचा मुजरा...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.५ मे -**

भूम, परंडा आणि वाशी या तीन तालुक्यातील महावितरणच्या उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा लातूर परिमंडळ कार्यालयाकडून गौरव करण्यात आला. यामध्ये भूम येथील जयराज दत्तात्रय बाबर यांचा 'प्रधान तंत्रज्ञ' कामगार म्हणून विशेष सन्मान करण्यात आला असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

१ मे २०२६ रोजी लातूर परिमंडळ कार्यालयात आयोजित कार्यक्रमात धाराशिव, बीड आणि लातूर या तीन जिल्ह्यांतील उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध तालुक्यांतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महावितरण कर्मचाऱ्यांची निवड करून त्यांना गौरविण्यात आले.





या वेळी लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते जयराज बाबर यांना मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

बाबर हे सध्या पारगाव येथील कार्यालयात प्रधान तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असून त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला.

तसेच भूम उपविभागातील वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असलेले सोमनाथ लक्ष्मण मुळे आणि परंडा उपविभागातील जवळा निजाम येथे कार्यरत स्मिता दत्तात्रय अंधारे यांचाही उत्कृष्ट कर्मचारी म्हणून सन्मान करण्यात आला.

दरम्यान, जयराज बाबर यांच्या सन्मानानंतर भूम येथील श्री चौंडेश्वरी तरुण एकता मंडळ तसेच कोष्टी समाज बांधवांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी कोष्टी समाज ट्रस्टचे अध्यक्ष व नगरसेवक विठ्ठल बागडे, सचिव शंकर खामकर, नगरसेवक नवनाथ रोकडे, सदस्य शामराव वारे, अण्णा भागवत आदी उपस्थित होते.

## कळंब महावितरण ट्रान्सफॉर्मरला भीषण आग प्रकरण; 'रेडमॅटिक' यंत्र गायब असल्याचा संशय



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ मे -**

कळंब येथील महावितरण कार्यालयातील मुख्य ट्रान्सफॉर्मरला अचानक आग लागून मोठी खळबळ उडाली. आग विझविण्यासाठी आवश्यक यंत्रणा उपलब्ध नसल्याने तब्बल नऊ तासांनी आग आटोक्यात आली. या घटनेनंतर अग्निसुरक्षेच्या उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, २०२२ साली धाराशिव जिल्ह्यातील महावितरण कार्यालयांना 'रेडमॅटिक' स्वयंचलित अग्निशमन यंत्र (फायर बॉल) पुरविण्यात आले होते. कळंब येथेही हे बॉल उपलब्ध होते, मात्र घटनेच्या वेळी ते नेमके कुठे होते, याबाबत संशय व्यक्त होत आहे. हे यंत्र कार्यरत असते तर आग काही सेकंदांत नियंत्रणात आली असती, असे मत व्यक्त केले जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, हे स्वयंचलित 'रेडमॅटिक' यंत्र इलेक्ट्रिकल पॅनल, मीटर बॉक्स यांसारख्या आग लागण्याच्या धोक्याच्या ठिकाणी बसवले असता आग लागल्यावर काही क्षणांत सक्रिय होऊन पावडरच्या साहाय्याने आग विझवते. तमिळनाडूतील हजारो शाळांमध्ये हे यंत्र बसविण्यात आले असून विविध ठिकाणच्या प्रात्यक्षिकांमध्ये ते प्रभावी ठरले आहे, अशी माहिती उद्योजक पंकज शेळके यांनी दिली. नगरमधील एका रुग्णालयात अशाच यंत्रामुळे इलेक्ट्रिकल पॅनलमध्ये लागलेली आग काही सेकंदांत विझल्याचे उदाहरणही त्यांनी सांगितले. त्यामुळे पेट्रोल पंप, महावितरण कार्यालये, रुग्णालये, मॉल आदी ठिकाणी अशा यंत्रांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

घटनेदरम्यान महावितरण कार्यालयासमोर असलेल्या पेट्रोल पंपावरील एक फायर बॉल आणून आगीत टाकण्यात आला. मात्र आगीचा भडका मोठा असल्याने त्याचा अपेक्षित परिणाम झाला नाही, अशी माहिती पेट्रोल पंप संचालक स्वराज करंजकर यांनी दिली.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी महावितरणच्या कामकाजावरही नाराजी व्यक्त केली आहे. वीज पुरवठ्यातील अडथळे, तक्रारींना मिळणारा प्रतिसाद आणि कर्मचाऱ्यांची वर्तणूक याबाबत संताप व्यक्त करण्यात आला. बिल वेळेवर भरूनही तासन्तास वीज मिळत नाही, तसेच फोन केल्यावर कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही, अशी तक्रार मोहा रोड परिसरातील नागरिकांनी केली.

या सर्व पार्श्वभूमीवर कळंब येथील घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अत्याधुनिक अग्निसुरक्षा यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

## फरीदनगरमध्ये बोरवेल लोकार्पण; पाणीटंचाईवर दिलासा



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ मे -**

सिद्रा फाऊंडेशन व दयावान प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने डिकसळ परिसरातील फरीदनगर येथे उभारलेल्या बोरवेल प्रकल्पाचे लोकार्पण उत्साहात पार पडले.

या प्रकल्पामुळे स्थानिक पाणीटंचाईच्या समस्येवर मोठा दिलासा मिळाला आहे. या योजनेअंतर्गत सुमारे ६ हजार लिटर क्षमतेच्या टाक्या उभारून १२ ते १५ ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांची, विशेषतः महिलांची पाण्यासाठी होणारी गैरसोय कमी होणार आहे.

कार्यक्रमास सिद्रा फाऊंडेशनचे मौलाना शरीफ इब्राहिम नुराणी, मौलाना समीर नुरानी तसेच दयावान प्रतिष्ठानचे इम्रान मुल्ला, अभय गायकवाड यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाचे कौतुक करत तो समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

## गॅस शेगडी वापरल्याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी हातगाड्यांवर गॅस शेगडी निष्काळजीपणे वापरल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

४ मे रोजी समुद्रवाणी, बेंबळी व परिसरात ही कारवाई करण्यात आली. धनाजी हजारे, विजयकुमार मस्के, खंडु लांडगे, सतीश ढोबळे व अक्षय परीट यांनी सार्वजनिक ठिकाणी गॅस शेगडीवर अग्नी प्रज्वलित करत निष्काळजीपणा केल्याचे आढळून आले.

याप्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात स्वतंत्र पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## तुळजापूरात 'श्री दत्त दुर्गा महानुष्ठानम'; 30 ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ मे -**

श्री तुळजाभवानी देवीच्या पुण्यभूमीत दि.३० ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान श्री दत्त दुर्गा महानुष्ठानम या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छापूर्ती गणपती मंदिराच्या पाठीमागे राम रेसिडेन्सी, मलबा कदम डेव्हलपर्स येथे हा सोहळा पार पडणार आहे.




या अनुष्ठानामध्ये १००८ श्री गुरुचरित्र पारायण, पंचकुंडात्मक सहस्त्र चंडीयाग, कुंकुमार्चन, सहस्त्र सवाष्णी पूजन, कुमारिका पूजन, अन्नदान व पेयजल सेवा अशा विविध धार्मिक उपक्रमांचा समावेश आहे. तसेच जागरण-गोंधळ, भोंडला यांसारख्या पारंपरिक कार्यक्रम द्वारे संस्कृती संवर्धनालाही चालना दिली जाणार आहे. यापूर्वी श्री क्षेत्र गाणगापूर येथे नववे पारायण यशस्वीरीत्या पार पडले असून, दहाव्या पारायणासाठी तुळजापूरची निवड करण्यात आली आहे. याच कालावधीत 'शक्तिपीठ जोगवा यात्रा'चेही आयोजन करण्यात येणार आहे. गुरुतत्त्व प्रदीप यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून, भक्तांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन आध्यात्मिक उन्नती साधावी, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

कार्यक्रमाचा समारोप दि. ६ सप्टेंबर रोजी विशेष पूजा व आरतीने होणार आहे. या संपूर्ण सोहळ्यात भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वाहकाच्या प्रामाणिकपणामुळे हरवलेला मोबाईल परत

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ मे -**

बार्शी-कळंब मार्गावरील बसमध्ये प्रवासादरम्यान वैजनाथ कचरे यांचा मोबाईल हरवला होता. मात्र बसमधील वाहक सोनाली राजकुमार यादव यांना तो मोबाईल सापडला.

त्यांनी प्रामाणिकपणा दाखवत मोबाईल आगार प्रमुख विजय घोलप यांच्या ताब्यात दिला. घोलप यांनी संबंधित प्रवाशाशी संपर्क साधून कळंब आगारात बोलावले व मोबाईल सुरक्षितरित्या परत केला.

या घटनेमुळे वाहकाच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत असून एसटी कर्मचाऱ्यांबद्दल सकारात्मक भावना व्यक्त होत आहेत.

## बोलेरोच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यु

▶▶ धाराशिव शहरातील बार्शी नाका परिसरातील घटना; आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

बार्शी नाका परिसरात निष्काळजी वाहनचालकामुळे झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ओमकार नंदकुमार तौर (रा. आळणी, ता. जि. धाराशिव) हे दि. १५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजता एमएच २५ बीएच ०७७६ क्रमांकाच्या मोटरसायकलवरून गरड हॉस्पिटल, बार्शी नाका परिसराकडे जात होते.



दरम्यान, बार्शी नाका येथील गरड हॉस्पिटलसमोर समोरून येणाऱ्या एमएच २४ बीआर ६५८५ क्रमांकाच्या बोलेरो जीपच्या चालकाने वाहन हायगईने व निष्काळजीपणे चालवत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ओमकार तौर गंभीर जखमी होऊन मृत्यूमुखी पडले.

या घटनेप्रकरणी मयताचे वडील नंदकुमार तानाजी तौर (वय ४५, रा. आळणी) यांनी दि. ४ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०६ (१), २८१ तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १३४ (अ)(ब) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजाभवानीला सव्वा दोन किलोची चांदीची तलवार-ढाल अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ मे -**

हैदराबाद येथील श्री तुळजाभवानी देवींच्या भाविका पटोला सबिथा इंद्रा रेड्डी यांनी दि. ५ मे रोजी श्री तुळजाभवानी देवीला सव्वा दोन किलो वजनाची चांदीची तलवार व ढाल अर्पण करून आपली भक्ती व्यक्त केली.



रेड्डी या देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आल्या होत्या. यावेळी त्यांनी सुमारे सव्वा दोन किलो वजनाची चांदीची तलवार आणि ढाल अर्पण करून देवीप्रती आपली निष्ठा आणि श्रद्धा व्यक्त केली.

मंदिर संस्थानच्या वतीने त्यांच्या या भाविकतेचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थानचे कर्मचारी विकास वाणी व महेश गंजे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### भाजपच्या विजयाचा जल्लोष

**नळदुर्ग, दि.५ मे -**
देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल, आसाम व पडुचेरी येथे मिळालेल्या यशाबद्दल नळदुर्ग शहरात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. भाजप कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर कार्यकर्त्यांनी पेढे वाटप, गुलाल उधळण व फटाक्यांची आतषबाजी करत आनंद व्यक्त केला. याप्रसंगी दत्तात्रय दासकर, तानाजी जाधव, शशिकांत पुदाले, सिद्धेश्वर कोरे, प्रविण गायकवाड, शिवाजी गायकवाड, श्रमिक पोतदार, पद्माकर घोडके, धिमाजी घुगे, किशोर नळदुर्गकर, संजय विठ्ठल जाधव, स्वप्नील काळे, सागर हजारे, धनाजी गायकवाड, बबन चौधरी, अक्षय भोई, संदीप गायकवाड यांच्यासह भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.



### अध्यक्षपदी अशोक हुकीरे

**इटकळ, दि.५ मे -**
तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी अशोक लक्ष्मण हुकीरे, तर उपाध्यक्षपदी अशोक महाबोले यांची निवड करण्यात आली. २ मे रोजी सेक्रेटरी शशिकांत हांडगे यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया पार पडली. या सोसायटीअंतर्गत केशेगाव व देवसिंगा परिसरातील शेकडो शेतकरी सभासद असून पिक कर्ज, शेती योजना व विविध आर्थिक सहाय्याचे काम या माध्यमातून केले जाते. यापूर्वी माजी अध्यक्ष निशा बिराजदार व उपाध्यक्ष इस्माईल फकीर यांनी कारभार पाहिला होता. निवड प्रक्रियावेळी मल्लीनाथ महाबोले, नागनाथ पाटू, प्रदीप हुकीरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



### सुधाकर महाराज इंगळे यांची निवड

**धाराशिव, दि.५ मे -**
धाराशिव येथे झालेल्या बैठकीत वारकरी शिक्षण संस्था चालक संघाच्या अध्यक्षपदी हभप सुधाकर महाराज इंगळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शिंगोली सर्किट हाऊस येथे पार पडलेल्या या बैठकीत धाराशिव, बार्शी व सोलापूर भागातील संस्थाचालक सहभागी झाले होते. बैठकीत वारकरी शिक्षण संस्थांना एकत्रित करून शासनाकडून अधिक मदत मिळवण्यावर भर देण्यात आला. तसेच आचारसंहिता पाळणे, कीर्तन-प्रवचनासाठी अभ्यासक्रम तयार करणे व सहा वर्षांची नियमावली निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. विभागनिहाय प्रमुख नेमण्यावरही एकमत झाले.

### नळदुर्गमध्ये जुगार विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.५ मे -**
नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या पथकाने ३ मे रोजी जुगार विरोधी कारवाईत इटकळ परिसरात छापे टाकून



दोघांविरुद्ध गुन्हे नोंदवले. या कारवाईत सिद्धेश्वर भिमाशंकर हानुरे (रा. इटकळ) व सय्यद मंजूर सौदागर (रा. निलेगाव) यांच्याकडून प्रत्येकी १,१०० रुपयांसह 'श्री देवी मटका' जुगार साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# देशभरातील यशासह पोटनिवडणुकांत विक्रमी विजय; कार्यकर्त्यांत नवचैतन्य

## भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचे प्रतिपादन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

देशातील विधानसभा निवडणुकांचे तसेच महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला आहे. यासंदर्भात भाजपचे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रतिक्रिया नोंदवली.

पश्चिम बंगाल, पुदुच्चेरी आणि असम या राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेले यश हे विकासाभिमुख धोरणांवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे कुलकर्णी यांनी नमूद केले.

सुशासन, पायाभूत सुविधा विकास, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी संधी तसेच शेतकरी हिताच्या योजनांना मतदारांनी दिलेला पाठिंबा या निकालांतून स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी विजय मिळवला असून, बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत महायुतीच्या नेत्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी २ लाख १८ हजार ९३० मतांच्या विक्रमी फरकाने विजय संपादन केला आहे.

हा निकाल लोकशाही प्रक्रियेत जनतेच्या सक्रिय सहभागाचे द्योतक असल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

देशातील विविध राज्यांतील निकाल आणि महाराष्ट्रातील पोटनिवडणुकीतील यशामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून धाराशिव जिल्ह्यात संघटनात्मक काम अधिक वेगाने राबविले जाईल, असा विश्वास



त्यांनी व्यक्त केला. स्थानिक पातळीवर जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हा प्रभारी डॉ. अर्चनाताई चाकूरकर, शरण पाटील, अनिल काळे, नेताजी पाटील, सतीश दंडनाईक, विक्रम सिंह देशमुख, नितीन भोसले, प्रदीप शिंदे, साहेबराव घुगे, गणेश खरसडे, अस्मिता कांबळे, दिलीप भालेराव, प्रकाश आष्टे, संतोष बोबडे, प्रीती कदम, डॉ. सरोजिनी राऊत, विजय शिंगाडे, सिद्धेश्वर कोरे यांच्यासह सर्व मंडल अध्यक्ष, मोर्चा अध्यक्ष, आघाडी व प्रकोष्ठ संयोजक, जिल्हा व मंडल पदाधिकारी, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांच्या भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अखेर तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाच्या ताब्यात

### मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दिलासा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

मुंबई येथील मंत्रालयात आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या या निर्णयावर आज अधिकृत शिक्कामोर्तब झाले.

गेल्या काही दिवसांपासून या हस्तांतरणाबाबत चर्चा सुरू होती. अखेर मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर या प्रक्रियेला अंतिम रूप मिळाले असून, महाविद्यालयाच्या सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे महाविद्यालयात आधुनिक पायाभूत सुविधा, अद्ययावत प्रयोगशाळा, गुणवत्तापूर्ण अध्यापन व्यवस्था आणि नवीन शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध होणार आहे. शासनाच्या ताब्यात गेल्यानंतर निधी उपलब्धता वाढणार असल्याने संस्थेच्या सर्वांगीण विकासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेषतः तुळजापूर व परिसरातील ग्रामीण आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरणार आहे. कमी खर्चात दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षणाची संधी उपलब्ध होऊन तांत्रिक शिक्षणाच्या नव्या वाटा खुल्या होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, स्थानिक पातळीवर या निर्णयाचे स्वागत करण्यात येत असून, शिक्षण क्षेत्रातील जाणकारांनीही याला सकारात्मक पाऊल असल्याचे म्हटले आहे.

## 'प्रत्येक थेंब अमूल्य'; जलतारा प्रकल्प ठरतोय पाणीटंचाईवर प्रभावी उपाय...

# जिल्ह्यात जलसंवर्धनाच्या चळवळीला वेग; लोकसहभाग निर्णायक

**विपीन वीर**
**धाराशिव, दि.५ मे -**

वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि पाण्याचा वाढता अपव्यय यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाई गंभीर बनली आहे. दुष्काळग्रस्त धाराशिव जिल्ह्यात ही समस्या अधिक तीव्र असून, यावर मात करण्यासाठी जलतारा प्रकल्प हा प्रभावी उपाय म्हणून पुढे येत आहे. यासाठी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जलतारा खड्डे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोफत खणून देण्यात येणार आहेत.

जलतारा म्हणजे पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची संकल्पना. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश पाण्याचे संवर्धन, साठवण आणि शाश्वत व्यवस्थापन करून भविष्यातील पाण्याची गरज भागवणे हा आहे. ग्रामीण भागातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून असल्याने अनियमित पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो. त्यामुळे पावसाचे पाणी साठवणे आणि भूजल पातळी वाढवणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. या प्रकल्पांतर्गत विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्यामध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रणाली उभारणे, लहान-मोठे बंधारे बांधणे, शेततळी तयार करणे, नाल्यांचे खोलीकरण तसेच विहिरींचे पुनर्भरण (रिचार्ज) करणे यांचा समावेश आहे. या उपायांमुळे पाण्याचा साठा वाढून भूजल पातळी सुधारण्यास मदत होत आहे. जलतारा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध होण्याची शक्यता वाढली असून, शेती उत्पादनातही वाढ होत आहे. परिणामी ग्रामीण भागातील आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होऊन गावांमध्ये हरित वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

तथापि, या प्रकल्पाच्या यशासाठी केवळ शासनाचे प्रयत्न पुरेसे नसून लोकसहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाचे पाणी साठवणे आणि जलसंवर्धनाबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. जलतारा प्रकल्प हा भविष्यातील पाणी संकटावर मात करण्याचा प्रभावी मार्ग ठरणार आहे.

### जलतारा प्रकल्प म्हणजे काय?...

जलतारा या शब्दाचा अर्थच पाण्याचा थेंब असा आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, साठवणे आणि योग्य पद्धतीने वापरणे. हा प्रकल्प पाणी संवर्धनावर आधारित असून, भविष्यातील पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो.

### शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी लाभ...

जलतारा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे शेती उत्पादनात वाढ होते आणि आर्थिक स्थिती सुधारते. तसेच पिण्याच्या पाण्याची समस्या कमी होते. गावांमध्ये हरित वातावरण निर्माण होऊन पर्यावरण संतुलन राखले जाते.



## १०० कोटींचा पीक विमा रखडला; शेतकऱ्यांचा धरणे आंदोलन

### पैसे न मिळाल्यास १४ मे रोजी रस्ता रोको...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

प्रलंबित पीक विमा २०२० व २०२५ संदर्भात धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले असून, लवकरात लवकर विमा रक्कम वितरित करण्याची मागणी करण्यात आली.

खरीप २०२० मधील सुमारे १३४ कोटी रुपयांची रक्कम कोणतीही स्थगिती नसताना राज्य शासनाकडून रोखून ठेवण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी केला. उच्च न्यायालयाचा आदेश असूनही अद्यापपर्यंत ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली नाही, असे त्यांनी सांगितले. तसेच खरीप २०२५ मध्ये पीक विमा कंपनीकडून ५०४ पीक कापणी प्रयोग घेण्यात आले होते. त्यापैकी २१७ प्रयोगांवर आक्षेप नोंदवण्यात आले, ज्यामधील २०० आक्षेप फेटाळण्यात आले आहेत. उर्वरित १७ प्रयोगांबाबत विमा कंपनीने राज्यस्तरीय समितीकडे याचिका दाखल केली असून ती बाब विचाराधीन असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, कोणतीही स्थगिती नसताना शेतकऱ्यांना हक्काच्या विमा रकमेपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात आला. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जवळपास ६०० कोटी रुपयांची रक्कम प्रलंबित असल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान, १३ मेपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याची रक्कम जमा न झाल्यास १४ मे रोजी उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जगताप यांनी दिला.

## ढोकीत धाडसी घरफोडी; २.४३ लाखांचा ऐवज लंपास



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**

ढोकी येथील काढी गल्ली परिसरात पहाटेच्या सुमारास घरफोडीची घटना घडून २ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मन्नान हमीदखॉ पठाण (रा. काढी गल्ली, ढोकी) हे दि.४ मे रोजी पहाटे २.३० ते ५.३० वाजण्याच्या दरम्यान घराचा दरवाजा उघडा ठेवून झोपले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून रोख रक्कम १ लाख २५ हजार रुपये तसेच सोन्याचे दागिने असा एकूण २ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या घटनेप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## 'दैनिक तरुण भारत'च्या बातमीचा प्रभाव; २४ तासांत प्रशासन जागे!

# उमरगा उड्डाणपूल पुन्हा उजळला; अंधाराचा 'मृत्यूचा सापळा' अखेर हटला

**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.५ मे -**

सोलापूर-हैदराबाद या अत्यंत वर्दळीच्या महामार्गावरील उमरगा चौरस्ता येथील उड्डाणपूल अंधारात बुडाल्याची गंभीर बाब 'दैनिक तरुण भारत'मध्ये ३ मे रोजी ठळकपणे प्रसिद्ध होताच प्रशासनाची अक्षरशः धावपळ सुरू झाली. विशेष म्हणजे, बातमी प्रकाशित झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत म्हणजेच ४ मे रोजी पुलावरील बंद पडलेले पथदिवे पुन्हा सुरू करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून या उड्डाणपुलावर अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती. पुलाच्या एका बाजूला पथदिवे सुरू असताना दुसऱ्या बाजूला पूर्ण अंधार असल्याने वाहनचालकांना अचानक प्रकाशातून अंधारात प्रवेश करावा लागत होता. या असमतोल प्रकाशामुळे दृष्टीवर ताण येऊन अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला होता. दररोज हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या पुलावर अशी परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरत होती. विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकीस्वार, प्रवासी बस आणि जड वाहन चालकांसाठी हा अंधार अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' ठरत असल्याची भीती व्यक्त केली जात होती. अचानक अंधारामुळे



वाहनांवरील नियंत्रण सुटण्याची शक्यता वाढून प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

ही बाब 'दैनिक तरुण भारत'मध्ये प्रसिद्ध होताच नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. बातमीमुळे संबंधित यंत्रणा तातडीने सक्रिय झाली आणि बंद पडलेले पथदिवे दुरुस्त करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.

परिणामी, ४ मे रोजी संपूर्ण उड्डाणपुलावरील पथदिवे पुन्हा सुरू करण्यात आले असून, सध्या पुलावर सर्वत्र प्रकाश व्यवस्था सुरळीत सुरू आहे. रात्रीच्या वेळीही उजेडामुळे वाहतूक अधिक सुरक्षित झाली आहे. अचानक अंधाराचा धोका टळल्याने वाहनचालक व प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या घडामोडींमुळे माध्यमांच्या प्रभावी हस्तक्षेपाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

गंभीर प्रश्नाला वाचा फुटताच तातडीने कार्यवाही होऊन समस्या मार्गी लागल्याचे चित्र उमरगा येथे पाहायला मिळाले. तथापि, भविष्यात अशी अंधाराची वेळ पुन्हा येऊ नये, यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## धाराशिवात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्यावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ मे -**



शहरातील देशपांडे स्टँड परिसरात मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवणाऱ्या युवकावर पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आदित्य रामेश्वर तोडकरी (वय २४, रा. उपळा मा., ता. जि. धाराशिव) यांनी दि. ४ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे १.१५ वाजता एमएच २५ ई ४११ क्रमांकाची मोटरसायकल देशपांडे स्टँड येथील अंबिका पेट्रोल पंपाजवळ मद्यधुंद अवस्थेत चालवली.

यामुळे मोटार वाहन कायद्यातील कलम १८५ चे उल्लंघन झाल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सरकारतर्फे प्रथम खबर नोंदवून संबंधित युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.